
# श्री साईलीला

श्रीसाईबाबा संस्थान, शिरडीचे अधिकृत मासिक



साईनाथ वाचनालय

श्री साईनाथ वाचनालय
श्री साईबाबा संस्थान, शिर्डी.

जगा लावावे सत्पथी । हेचि साईलीलेची कृती ॥

श्री

# साईलीला

श्रीसाईबाबा संस्थान, शिरडीचे अधिकृत मासिक

: संपादक :
**श्री.क.हि.काकरे**
रिसिव्हर श्रीसाईबाबा संस्थान, शिर्डी

: कार्यकारी संपादक :
**डॉ.श्री.दि.परचुरे**
एम. ए. पी. एच. डी.
( इंग्रजी आवृत्ती )

**श्री.सदानंद चेंदवणकर**
( मराठी आवृत्ती )

**श्रीसाई वाक्सुधा**

(वर्ष ६० वे) किंमत दोन रुपये (अंक ८–९)

नोव्हेंबर-डिसेंबर १९८१

**भक्त अनुभव विशेषांक**
**खास दिवाळी अंक**

: कार्यालय :
" साईनिकेतन ", प्लॉट नं. ८०४-बी, डॉ. आंबेडकर पथ, दादर, मुंबई-४०० ०१४.
दूरध्वनी : ४४२३६१
वार्षिक वर्गणी रु. १०/- (ट.ख.सह) किरकोळ अंक १ रु. फक्त.



## श्रीसाई वाक्सुधा

संत सृष्टी माजीं उमाप ।
आपुला बाप तो आपुला बाप ।
साई मुखींचे हे करुणा लाप ।
कोरा स्वहृदय पटावरी ॥११९॥

म्हणोनि साई मुखींचें वचन ।
तेथेंच ठेवा अनुसंधान ।
अंती तोच कृपा निधान ।
तापत्रय शमन करील ॥१२०॥

तोच जाणे त्याची कळा ।
आपण पहावे कौतुक डोळां ।
काय अद्‌भुत तयाच्या लीला ।
सहज अवलीला घडती ज्या ॥१२१॥

दुसरा एक म्हणतो म्हणून ।
त्याचें सर्व घ्यावे ऐकून ।
मोडून धावे निजानु संधान ।
निजगुरु वचन विसरूं नये ॥१२२॥

यांतचि आहे परमकल्याण ।
यांतचि आहे भवभय तरण ।
यांतचि अवघें पोथी पुराण ।
जपतपा नुष्ठानाचें हें ॥१२३॥

—श्रीसाईसच्चरित–अध्याय ४५ वा

## दिवाळी शुभचिंतन

दिवाळी आणि नूतन संवत्सर
सर्व श्रीसाई भक्तांना,
सर्व श्रीसाईलीला वाचकांना
सुखाचे, समृद्धीचे
भरभराटीचे व उत्कर्षाचे
जावो ही
श्रीसाईचरणी प्रार्थना

—संपादक

श्रीसाईलीलेचा हा अंक नव्हें–डिसेंबर जोड अंक असल्यामुळे डिसेंबरचा अंक प्रसिद्ध होणार नाही. यापुढील अंक जानेवारी १९८२ मध्ये.

# दिवाळी अंकाचे मानकरी



१) संपादकीय
२) श्रीसद्‌गुरू अवधूतानंद महाराज
३) शिरडीतील दसरा उत्सव
४) ले. कर्नल मु. व. निंबाळकर
५) प्रा. र. श्री. पुजारी
६) डॉ. इंदूताई नाईक
७) डॉ. रा. सी. कापडी
८) श्री. गणपतराव सामंत
९) डॉ. सौ. मालती राहाटे
१०) श्री. मधुकर देशपांडे
११) ,, शंकर इनामदार
१२) श्रीमती मथुराबाई हिवारे
१३) ,, वसंत प्रधान
१४) ,, निळकंठ हामंद
१५) सौ. सुलोचना जोशी
१६) श्री. श्रीराम जोशी
१७) ,, मनोहर सावंत
१८) सौ. शोभना लाड
१९) श्री. पां. वा. भुतकर
२०) ,, दशरथ तळेकर
२१) सौ. प्रमिला वखारे
२२) श्री. प्र. द. पुराणिक
२३) ,, विजय हजारे
२४) डॉ. सौ. सुमती खानविलकर
२५) श्री. सुरेश सातपुते
२६) ,, शशिकांत नाईक
२७) संयोगिता कड्ड
२८) ,, अनंत हिंदळेकर
२९) ,, रमेश व्यवहारे
३०) कु. प्रतिभा भांबुरे
३१) श्री. रमेश चव्हाण
३२) श्री. अशोक म्हात्रे
३३) कु. वैशाली फणसे
३४) श्री. प्रभाकर नाईक
३५) ,, प्रकाश मोटे
३६) कु. रंजना गुप्ता
३७) श्री. गणेश नाईक
३८) प्रा. गुंडेराव पटवारी
३९) कु. रेखा दिघे
४०) सौ. लीनादेवी पंडित
४१) श्री. टि. जी. जाधव
४२) स्वामी श्री. संजयानंद
४३) कु. रेखा दिघे
४४) श्री. महादेव भिडे
४५) सौ. लता पाटील
४६) सौ. शितल आकलेकर
४७) श्री. गजानन निरखे
४८) सौ. शांता सरोदे
४९) सौ. सिंधु सुळीक
५०) सौ. आशालता मोहिते
५१) कमळाबाई कामेरकर
५२) वत्सला दवारकर
५३) रमेश व्यवहारे
५४) सौ. मंगल सांडभोर
५५) श्री. गोविंद नांदेडे
५६) सौ. विमल चव्हाण
५७) सौ. नीलम देशपांडे
५८) वामन वेंगुर्लेकर
५९) सौ. स्नेहलता दळवी
६०) सौ. ललिता पाठारे
६१) सौ. ललिता साटम
६२) श्री. सहाम [illegible]

नांदावे यासाठीच साईबाबांचा अवतार होता. हिंदू की मुसलमान यांचा त्यांनी कधी थांगपत्ता लागू दिला नाही ! कारण ? मी हिंदू असलो काय किंवा मुसलमान असलो काय, देवाच्या दरबारात मी सारखाच आहे, आणि प्रत्येक मनुष्य तेथे सारखाच आहे. मग तो कोणत्याही धर्माचा वा पंथाचा असो. असे असता आम्ही या जगातील मानवांनी निरनिराळे धर्म व पंथ कल्पून आपापसात भेदांच्या भिंती उभाराव्या व भांडणे करत आयुष्याचा अपव्यय करावा हे किती अनुचित व लांछनास्पद आहे हे श्रीसाईबाबांनी आपल्या चारित्र्यातून दाखवून दिले आहे.

श्रीसाईबाबांच्या शिकवणुकीशी ज्याचा संबंध आला त्यांच्या चटकन लक्षात येणारी महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्यांनी कधीही धर्मांतराचा धडा दिला नाही तर नेहमी धर्मैक्याचीच शिकवण ते प्रत्येकाच्या मनावर बिंबवित गेले. त्यांचे सारे जीवन हेच मुळी धर्मैक्याचे साधन होते. सर्व धर्मांचे–मगतो कोणत्याही धर्माचा असो–एकमेव साध्या म्हणजे ईश्वराची प्राप्ती. तो ईश्वर एकमेव सर्वव्यापी आहे. त्याच्याकडे कोणत्याही साधन मार्गाने जा. विविध साधने आहेत. त्यापैकी कोणत्याही साधनाच्या सहाय्याने तो सोपान साधता येतो. मग धर्मांच्या त्या साधनाच्या उच्चनीचते संबंधी वादविवाद केला कशाला ? वाद घालीत बसणे म्हणजे निव्वळ वेडाचार आहे. धर्मवेड म्हणतात यालाच. तुम्ही धर्मलंड होऊ नका, धर्मवेडे होऊ नका. सद्धर्माचे आचरण म्हणजे आचरणच करणारे व्हा सद्धर्म लक्षण ओळखा एकमेकांचे वाभाडे काढणे, एकमेकांचा कमीपणा दाखविणे दुसऱ्याचा धर्म हीन समजून आपणास अज्ञानामुळे वाटणाऱ्या आपल्याच श्रेष्ठ धर्माचा प्रचार किंवा त्यासाठी बळजबरीही करणे हा काय धार्मिकपणा का सद्धर्म झाला ? आणि अजूनही या सुधारलेल्या काळात आपण काय बरे पहात आहोत. ? हा विपरीत व हानिकारक प्रकार साईबाबांना बिलकूल संमत नव्हता. तुम्ही तुमच्या धर्माचारा नुसार वागा, तुमचे आचार तुम्ही सोडू नका परंतु त्याकडे नवदृष्टीने पहा त्यात सेवाभावाचे व बंधु भावाचे नवचैतन्य येऊ द्या. काय केले म्हणजे धर्म होतो व कसे वागले पाहिजे याचे संशोधन करा व त्याप्रमाणे वागा. जीवन सेवाभावी व परोपकारी बनवा. या उच्च तत्वाची कास धरण्याचे सोडून तुझा धर्म श्रेष्ठ की माझा धर्म श्रेष्ठ ? हा वृथा काथ्याकूट कशाला करता ? हेच त्यांचे नेहमी सांगणे असे. ते कुणाच्याही धर्म समजुती आड कधी आले नाहीत किंवा त्या समजुतीकडे त्यांनी कधी हीन दृष्टीने पाहिले नाही तुम्ही माझ्यावर श्रद्धा ठेवा. परंतु तुमच्या पूर्व श्रद्धेकडे पाठफिरवू नका किंवा ती कमी करू नका असे ते परोपरीने जाणवून देत असत. तुमचे जे काही धार्मिक विधी किंवा नित्य नियम असतील त्यात अंतर पडू देऊ नका बदल करू नका ज्या बाजूला, ज्या ग्रंथाकडे, ज्या पुण्य पुरुषाकडे तुमचा

# श्रीसाईबाबांनी दाखविलेला प्रकाश

संतचूडामणी भगवान श्रीसाईबाबांनी मंगळवार दिनांक १५ ऑक्टोबर १९१८ रोजी समाधी घेतली. समाधीस्थ होण्यापूर्वी बाबांनी भक्तांना उद्देशून म्हटले आहे.




“ जरी हे शरीर गेलो मी टाकून ।
तरी मी धावेन भक्तांसाठी ।।
नवसास माझी पावेल समाधी ।
धरा दृढबुद्धी माझ्या ठायी ।।
नित्यमी जिवंत जाणा हेचि सत्य ।
नित्य घ्या प्रचीत अनुभवे ।। ”

श्रीसाईबाबांच्या जीवन तत्वातील तीन महान तत्वे प्रत्येकाने आपल्या दृष्टी समोर ठेवण्यासारखी आहेत. समन्वय, सर्वभूती समता व ऐक्य ही ती तीन तत्वे मनुष्य कोणत्याही जातीचा कोणत्याही समाजाचा, कोणत्याही धर्माचा व देशाचा असो तो मानव आहे. सर्वांत-र्यामी वास्तव करणारा परमात्मा भिन्न आहे का?

श्रीसाईबाबांकडे जे जे कोणी नाना हेतूंनी आले त्यांच्याकडे त्यांनी भेदभावाच्या दृष्टीने केव्हाही पाहिले नाही. सुष्ट असो, दुष्ट असो, पापी असो, पुण्यवान असो, हिंदु असो, मुसलमान असो किंवा ख्रिश्चन वा पारशी असो, जो कोणी येईल त्याचे कल्याण करावयाचे हेच त्यांचे ध्येय होते. कोणी श्रद्धेने येत, कोणी भक्तिभावाने येत, तर कोणी उपाहासाच्या किंवा चेष्टेच्या हेतूने येत, परंतु त्यांची सर्वांकडे पाहण्याची दृष्टी प्रेमाची, महत्वाची व त्यांचे कल्याण साधणारी होती.

श्रीसाईबाबा हे अवतारी पुरुष होते. त्यांनी जीवनात समन्वय कसा साधावा सर्वांच्या सुखात सहभागी कसे व्हावे व सर्वांना सुखी करण्यासाठी कसे झटावे हे जीवनभर परोपरीने प्रगट केले आहे. ती समता, तो समन्वय ती करुणा व ती लोक-कल्याणाची इच्छा हृदयाशी बाळगून स्वतःला सदैव त्या प्रकाशात ठेवण्याचा प्रयत्न करणे म्हणजे श्रीसाईबाबांची भक्ती करणे होय. बाबांची ही शिकवण किती उज्ज्वल व उच्च कोटीची आहे. हिंदू वा मुसलमान या दोन समाजातील लोकात हाडवैर असू नये, या उभय धर्मीयांनी समन्वय साधावा. एकमेकाशी गुण्यागोविंदाने व प्रेमाने

ढा असेल तो मागे खेचून घेऊ नका. नव्या ज्ञान प्रकाशात पुढे चालू लागा का उदार मतवादी, व्यापक व सर्व पोषक असा त्यांच्या दृष्टीकोन होता. असे बाबांच्या शिकवणूकीचे महत्व सांगावे तेवढे थोडेच आहे.

## साई निकेतनमधील विजयादशमी

श्रीसाईबाबा संस्थान शिरडीच्या दादर येथील साईनिकेतन या कार्यालयात विजया- शमी उत्सव गुरुवार ता. ८ ऑक्टोबर ८१ रोजी दिवसभर साजरा करण्यात आला. मूर्तींचे दर्शन घेण्यासाठी सकाळी १० वाजल्यापासूनच भक्तांची येजा सुरु झाली ती सायंकाळी ६ वाजेपर्यंत होती. दुपारी १२–१५ वा. बाबांची आरती करण्यात ाली. त्यापूर्वी श्री. विजय हजारे व श्री. प्रभाकर कोळमकर संपादीत श्रीसाई कृपा साई साहित्य विषयक एकमेव दिवाळी अंकाचा प्रकाशन समारंभ 'भक्तीसंगम' सिकाचे संपादक श्री. सुधाकर सामंत यांच्या उपस्थितीत करण्यात आला. १२० नांच्या या सचित्र व वाचनीय अंकाची किंमत ६ रु. असून त्यात फक्त श्रीसाई- क्तांचेच श्रीबाबांविषयीचे लेख कविता आहेत. या अंकाच्या बरोबरच डोंबिवलीचे वी श्री. राधाकृष्ण गुप्ता उर्फ चेतन यांच्या साईमहिमा या साई गीतांची एक कॅसेट प्रकाशित करण्यात आली. सूरलोक कंपनीतर्फे ही हिन्दी साईगीतांची कॅसेट तयार रण्यात आली असून तिची किंमत ३० रु. आहे व ती श्रीसाईबाबा संस्थान पुर- कृत आहे. ती मध्ये बाबांवरील १० गीते आहेत. श्रीसाईकृपा अंक व कॅसेट यांचे काशन डॉ. श्री. दि. पुरचुरे यांनी केले तर कार्यक्रमासंबंधीचे प्रास्ताविक निवेदन ी. सदानंद चेंदवणकर यांनी केले.



श्रीसद्गुरु अवधूतानंद महाराज

साईभक्तांच्या गाठीभेटी...५४

# श्रीसद्गुरु अवधूतानंद महाराज

● साईनंद

मुंबापुरीमध्ये बंदर विभागात डॉकयार्ड रोड या नावाचे एक रेल्वेस्थानक आहे. सरकारी धान्याची प्रचंड गोदामे या विभागात आहेत. येथल्या रस्त्यावरून तर मालाची ने आण करणाऱ्या जंगी लॉऱ्या आणि ट्रक्स यांची वर्दळ वाहतूक रात्रंदिवस चालू असते. अशा या गर्दी व्यापाऱ्या विभागात एका सत्पुरुषाचे दर्शन घेण्यासाठी आणि आपल्या संसारसागरातल्या अडी अडचणी कथन करून त्यातून मार्ग काढण्यासाठी दर्शनोत्सुक भाविक मंडळी हरहमेशा येतअसतात. डॉकयॉर्ड स्टेशनाच्या पूर्वेला स्टेशनापासून सुमारे पाच मिनिटाच्या अंतरावर ' संतोक मॅनशन नावाची एक चार मजली इमारत आहे. या इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावर भाविकाना या सद्गुरुचे दर्शन घडते. त्या वंदनीय विभूतींचे नाव आहे श्री. वसंतकुमार संभाजी तावडे. ' अवधूतानंद महाराज ' या नावाने ते आपल्या भक्तमंडळीस परिचित आहेत.

श्री महाराज हे मूळचे सावंतवाडीजवळील पावनभूमी दानोलीचे. दानोलीचे सत्पुरुष श्री. शंकर नारायण साटम उर्फ साटम महाराज यांचे ते एकमेव चिरंजीव होत. हे ऐकून अनेकांना आश्चर्य वाटेल! महाराजांच्या मातोश्रीचे नाव सौ. काशीबाई (जनाबाई) महाराज अगदी लहान असतानाच साटम महाराजांचे अत्यंत घनिष्ट स्नेही श्री. संभाजीराव तावडे यांना दत्तक म्हणून त्यांनी बहाल केले आणि तावडे घराण्यात आल्यामुळे महाराजांना तावडे आडनाव सहाजिकच लागले. श्री. संभाजीराव हे मुंबईस कस्टम विभागात चांगल्या नोकरीवर होते.

छोट्या वसंत कुमारांचे प्राथमिक शिक्षण मुंबईतच झाले. दुय्यम शिक्षणासाठी त्यांनी गिरगावातल्या राममोहन हायस्कूलमधे प्रवेश केला व १९४३ साली ते मुंबई विद्यापीठाची मॅट्रीकची परीक्षा उत्तीर्ण झाले. लहानपणापासूनच त्यांचा कल जनसेवा करण्याकडे होता. अनाथ अपंगांची सेवा करावी, दुःखितांची दुःखे दूर करावीत, अडीअडचणीत सापडलेल्याना मार्गदर्शन करावे, चुकलेल्यांना धीर दिलासा द्यावा यासाठी त्यांची सततची धडपड त्यावेळी होती व आजही हीच परिस्थिती त्यांची कायम आहे. जनसेवा करता यावी म्हणून त्यांनी फिजिओथेरिपीचा शास्त्रोक्त अभ्यास केला, परीक्षा दिली व डी. टी. एच. ही त्या शाखेतील अधिकृत पदवी मिळविली.

श्री. तावडेजींना कलेची पण भारी आवड. विशेषतः भारतीय नृत्यशैलीत आपण प्रावीण्य मिळवावे या उद्देशाने त्यांनी नृत्यसाधना केली. भारत नाट्यममध्ये त्यांनी श्रीकृष्णन् कुट्टी व हेमा केसरकोडी या नृत्यविशारदांकडे पाठ घेतले, मणीपूरी नृत्यशैलीसाठी त्यांनी नवकुमार यांचेकडून संपूर्ण मार्गदर्शन करून घेतले तर कथ्यक-साठी त्यांनी श्री. मोहनलाल पांडे व जयलालजी यांना आपले गुरु मानले. चार भार-तीय नृत्यशैलीपैकी तीन प्रकारात त्यांनी असामान्य यश मिळविले. या निमित्याने युरोप-अमेरिकेची पण त्यांनी वारी केली. आपल्या नृत्याचे प्रदर्शन करव त्यांनी परदेशी कलाकारांसमोरही केले आणि वाहवा मिळविली पण नृत्यसाधनेतही ते फार काळ रमले नाहीत.

ईश्वरोपासना तर वसंतकुमार तावडे यांच्या रक्तातच भिनलेली आहे. सद्गुरु साटम महाराजांचे ते चिरंजीवच. महाराजांनी त्यांना अध्यात्म व ईश्वरोपासना यासाठी शुभाशिष दिले आहेत व ते फलदायी पण झाले आहेत. ईश्वरोपासनेतील तन्मयते-साठी ते मुंबई चौपाटीवर लो. टिळकांच्या पुतळ्याखाली सात वर्षे ध्यानस्थ बसत असत. याच काळात त्यांना मुंबईत सत्पुरुष श्रीअबदुल रहमान बाबा व हाजीमलंगचे दिव्यपुरुष श्रीअबदुल रहमान बाबा यांचे साक्षात्कार झाले व त्यामुळेच की काय त्यांच्या मुख कमलावर विलक्षण तेजाची आभा दिसू लागली. दैवी शक्तीचा संचार त्यांचे ठायी दिसून येऊ लागला. त्यांचा दिवसभराचा काही काळ विशिष्ट प्रकारच्या अवस्थेत जाऊ लागला. याच काळात त्यांना कणकवलीचे सत् पुरुष श्री. भालचंद्र महाराज, काटेलचे प. पू. श्रीगुलाब बाबा, पावसचे श्रीस्वामी स्वरुपानंद, संत श्री पाचलेगावकर महाराज, प. पू. राऊळ महाराज, गोव्यातील कुचेडीचे श्रीपेंढारकर बाबा, मानसरोवरातील १५० वर्षे वयाचे श्री ओंकारनाथ बाबा, पुण्याचे श्रीमामा-महाराज देशपांडे इ. दिव्यसंतांच्या भेटीचा दर्शनाचा अलभ्य लाभ झाला, व त्यांचेही त्यांना शुभाशिर्वाद लाभले. साक्षात् भगवान नृसिंह सरस्वतींनी त्यांना दृष्टांत दिला व त्यामुळे त्यांच्या आध्यात्मिक जीवनाला एक आगळेच महत्व प्राप्त झाले. अध्यात्म-क्षितिजावर ते यशस्वीपणे वावरू लागले. त्यांची भक्तमंडळी त्यांना अवधुतानंद महा-राज या सार्थ नावाने संबोधू लागली. श्री. तावडेजी श्रीदत्तात्रयाचे परमउपासक आहेत. गुरुचरित्राच्या पोथीची तर त्यांची १०० वर पारायणे झाली आहेत. आपल्या भक्तांसाठी ते दर गुरुवारी बसतात आणि काही सणासुदीच्या दिवशी तर भक्तांची एकच गर्दी त्यांच्या दर्शनासाठी उसळते. एखादया भक्ताचा अडचणीतला प्रश्न महाराजांनी सोडविला नव्हे तो सुटण्याजोगा आहे असे त्यांनी सांगताच जवळच उभ्या असलेल्या भक्तास ते श्री गजानन महाराजांची पोथी एकदम उघडून दिसेल तो श्लोक

वाचावयास पटकन् सांगतात] आणि आश्चर्याची गोष्ट त्या अचानक वाचलेल्या श्लोकाचा संदर्भ महाराजांनी उपाय म्हणून मघाशीच सांगितलेल्या गोष्टीशी अगदी तंतोतंत लागू पडतो. श्री साईबाबा व श्री गजानन महाराज नि श्रीसाटम महाराज यांचे ते परमभक्त आहेत. या संतांवर तसेच ज्ञानेश्वरी व तुकाराम गाथेवर ते अस्ख-लीत प्रवचने पण करतात. श्री तावडे महाराजांना सर्व मंत्रतंत्रांचे ज्ञानतर आहेच परंतु ईश्वरी नामस्मरणावर त्यांचा जास्त भर आहे. त्यांनी विदेही अवस्थेत आपल्या दूर-वरच्या भक्तांना दर्शने दिली आहेत. त्यांना सर्व आयुर्वेदीय औषधींचे पण ज्ञान आहे. श्रीसद्गुरुसमर्थ साटम महाराज भक्तमंडळ, मुंबई या संस्थेचे ते आजीव अध्यक्ष म्हणून नियोजित केले गेले आहेत.

श्री. तावडे महाराजांचा विवाह १९४७ साली मुंबईत झाला. त्यांच्या पत्नी या कुवल घराण्यातल्या. कु. माणिक कुवल व आताच्या सौ. प्रेमलता तावडे, दोन पुत्र व एक कन्या अशी अपत्य संपदा महाराजांना आहे. मोठा मुलगा कुमार शंकर हा ॲटोमिक इलेक्ट्रीकमधे नोकरीस असून कन्या कुमारी नंदा शिक्षिका आहे तर छोटा चारुहास सध्या शिक्षण घेत आहे.

महाराजांना कोणत्याही प्रकारचा लोभ, मोह नाही. सर्व भक्तांना ते सारख्याच आपुलकीने वागवितात. आपल्या लाखो भक्तांचे दुःख हरण करण्याचे पुण्य महाराजांना हयातभर लाभो हीच साईचरणी प्रार्थना!



श्री बाबांची उत्सव पालखी

भक्तांसाठी नवी माहितीपूर्ण लेखमाला–७

# शिरडीतील श्रीसाईबाबा पुण्यतिथी महोत्सव

☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆

– सदानंद चेंदवणकर
कार्यकारी संपादक श्री साईलीला
श्रीसाईबाबा संस्थान, शिरडी

● विजयादशमी उर्फ दसरा हा आम्हा हिंदूना मोठा मोलाचा आणि महत्त्वाचा शुभ दिवस आहे. प्राचीन काळापासून आमचे पूर्वज या दिवसाचे महत्व जाणून होते आणि कोणत्याही कार्याचा शुभारंभ करण्यासाठी याच दिवसाची निवड करीत असत. साडेतीन शुभ मुहुर्तापैकी हा दिवस एक शुभ मुहूर्त म्हणून समजला जातो. परिस्थितीवर विजय मिळवून देणारा असा हा. विजयादशमीचा शुभदिवस आहे, आणि श्री साईबाबांच्या भक्तांना तर या दिवसाचे महत्व आगळेच वाटत असते! विजयादशमी म्हणजे बाबांच्या महानिर्वाणाचा दिवस. मर्त्य देहाचा त्याग करून श्री बाबा सच्चिदानंद स्वरूपी विलीन झाले तो पवित्र दिवस म्हणजे विजयादशमी!

आज तब्बल ६२ वर्षे त्या घटनेला झाली. बाबा आज देहाने येथे नसले तरी आपल्या दिव्यत्वाने प्राणरूपाने सध्या आमच्यात वावरत आहेत. समस्त बाबा भक्तांना त्यांचे अस्तित्व पदोपदी जाणवत आहे. आपल्या भक्तांना सोडून बाबा कुठे आणि जातील तरी कसे? सर्व भक्तांच्या कल्याणासाठी त्यांनी मानवदेह धारण केला. माणसात ते वावरले. त्यांचे भले केले, चमत्कार केले व दाखवले. ज्या ज्या परीने भक्तांचे कल्याण करता येईल, त्यांना मार्गदर्शन करून त्यांचे शुभ करण्याचा मार्ग दाखविता येईल त्या त्या परीने आपले कार्य पाडून ते देहाने आपल्या दृष्टीआड झाले. पण असे जरी असले तरी ते आज आमच्यात वावरत आहेत, अदृश्य शक्तीने ते आपल्या सर्वांना मार्गदर्शन करीत आहेत. संकट प्रसंगी धावत येऊन आपल्याला संकटमुक्त करीत आहेत.

श्री साईबाबांचे महानिर्वाण १९१८ साली झाले. त्यावर्षी मंगळवार दिनांक १५ ऑक्टोबरचा दिवस नेहमीप्रमाणे उगवला. दुपारच्या आरती नंतर बाबांनी भक्त श्रीमंत बापूसाहेब बुटी, जोग, नानासाहेब निमोणकर, माधवराव देशपांडे उर्फ 'शामा' इ. मंडळींना घरोघर जेवावयास पाठवून दिले. ही सारी मंडळी नेहमी बाबांच्याबरोबर द्वारकामाईत जेवत असत. पण त्या दिवशी त्यांना अशा प्रकारे घरोघर पाठवून

१५–१०–१९१८ रोजी विजयादशमीच्या दिवशी २ वाजून ३५ मिनिटांनी त्यांनी महानिर्वाण केले. शिलंगणाचा दिवस बाबांनी असा साजरा केला. १९१९ पासून बाबांचा निर्वाण दिन प्रत्येक विजयादशमीस अखंडपणे साजरा होत असतो व या पुढेही तो कायमचा साजरा होत जाईल यात शंकाच नाही. यंदा शिरडीत झालेला उत्सव ही बाबांची ६३ वी पुण्यतिथी होय.

श्री बाबांचे पुण्यस्मरण म्हणजे बाबांच्या उच्च व मानवतावादी शिकवणूकीचे स्मरण, त्या शिकवणूकीचे जर का भक्तांना विस्मरण झाले तर बाबांचे भक्त म्हणवून घेण्यास भक्त कुठवर पात्र ठरतो याचा विचार ज्या त्या भक्तानेच करावयाचा आहे. बाबांची अनन्यभावे भक्ती म्हणजे रंजलेल्या गांजलेल्यांसाठी झटण्याची भक्तांची प्रवृत्ती, हिचे महत्व भक्ताने ओळखले पाहिजे. जो दुःखितांचे दुःख निवारण करण्यासाठी झटतो, जो भुकेलेल्यांना भाकर देतो जो संकटात सापडलेल्यास मुक्त करण्यासाठी आपल्यापरीने झटतो तोच बाबांचा खरा भक्त होय. यालाच म्हणतात सेवाभाव.

आल्या गेल्याचा आदर करी ।
तृषितांजल भुकेल्या भाकरी ।
उघड्यास वस्त्र बसाया ओसरी ।
देता श्रीहरी तुष्टेल ॥

या दिव्य शब्दातून हेच तत्वज्ञान गोवले गेलेले आहे. परोपकार तो हाच. माणुसकी ती हीच. परंतु बाबांचे हे तत्वज्ञान किती भक्तांच्या आचरणात येते. बाबांची भक्ती म्हणजे भूतमात्राची सेवा. हिचे आचरण ज्या प्रमाणात भक्ताकडून होईल त्या प्रमाणात भक्त भगवंताच्या कृपेस पात्र ठरतात. तेव्हा आपल्या गतकालीन जीवनाचे सिंहावलोकन करून बाबांनी दाखवून दिलेल्या मार्गाने भक्ताने यापुढील काळात वाटचाल करावयाची असते हे बाबांची पुण्यतिथी साजरी करताना भक्ताने लक्षात ठेवण्यासारखी गोष्ट आहे.

दरवर्षी शिरडीतील श्री बाबांचा पुण्यतिथी उत्सव तीन किंवा चार दिवस भक्त मंडळीकडून व संस्थानतर्फे थाटाने साजरा केला जातो. तो आश्विन शुद्ध नवमीला नवरात्रात सुरू होतो व एकादशीला दुपारी काला होऊन तो समाप्त होतो. नवमीपासून एकादशीपर्यंत तिथीप्रमाणे उत्सवपर्व कधी तीन तर कधी चार दिवसांचे असते. १९८१ साली ६३ वा पुण्यतिथी उत्सव चार दिवस होता.

आश्विन शु. नवमीस नेहमीप्रमाणे समाधी मंदिर सकाळी ५ वा. उघडले जाते ५–१५ ला काकड आरतीस सुरुवात होते. आरती संपल्यावर श्रींच्या एका मोठ्या

तसविरीची व हेमाडपंत लिखित श्रीबाबांच्या ‘श्रीसाईसच्चरित’ या पोथीची मिरवणूक समाधीमंदिरातून भक्तांच्या समवेत निघते. बाबांची पोथी प्रथेप्रमाणे संस्थानचे जे प्रचलीत न्यायालयधारक असतील ते हातात घेतात. गर्दीत पोथीला धक्का लागू नये किंवा रिसिव्हरसाहेबांना अडथळा वाटू नये म्हणून त्यांचे दोन्ही बाजूस सुरक्षासाठी भक्त असतात. या पोथीच्या पुढे बाबाची तसबिर घेतलेली भक्तमंडळी असतात. संस्थानचे सेवेकरी व पुजारी पण असतात. मिरवणूकीबरोबर बँडचे पथक असते. मिरवणूकीबरोबरची स्त्री पुरुष भक्त मंडळी “ मार्गे हळूहळू चाला मुखाने श्रीसाईनाम बोला ” अशाप्रकारचे पालुपद म्हणत असतात. समाधीमंदिरातील ही मिरवणूक गुरुस्थानात येते. तिथे आतमध्ये फक्त पोथीधारक, शिपाई व पुजारी एवढीच मंडळी जातात, व अन्य भक्त गुरुस्थान चौकात उभे राहातात तिथे विधीयुक्त अल्पशी पुजा व एक आरती होते, व ही मिरवणूक द्वारकामाईत जाते. तिथे पोथीची वाचन मालीका सुरु होते. बाबांच्या पोथीच्या पहिल्या अध्यायाचे वाचन स्वतः न्यायालयधारक करतात व तदनंतरचे एक एक अध्याय भक्तमंडळी क्रमाक्रमाने नंबर लावून दिवसभरात वाचन करतात. ज्या भक्ताने एक अध्याय संपवला असेल त्याला प्रसादादाखल श्रीफल दिले जाते. पोथीमध्ये एकूण ५३ अध्याय आहेत. द्वारकामाईत दिवस व रात्रभर ह्या पोथी वाचनाचा कार्यक्रम असतो.

दुपारी ४ ते ६ वाजेपर्यंत समाधी मंदिराचे समोरील प्रांगणात एका प्रसिद्ध हरीभक्त परायणशास्त्रींचा कथा कीर्तन प्रवचनाचा कार्यक्रम सादर केला जातो. भक्त मंडळी बहुसंख्येने या कार्यक्रमास हजर असतात. महिला भक्तांची बसण्याची व्यवस्था व्यासपीठाच्या उजव्या अंगास केली जाते. तर पुरुष भक्त डाव्या अंगास व मध्यभागी दाटीवाटीने बसतात. हा कार्यक्रम धुपारतीपर्यंत चालतो. संध्याकाळचे धुपारतीनंतर एका प्रसिद्ध गायक कलाकाराचा कार्यक्रम संस्थानतर्फे आयोजित केला जातो, व तो रात्री ९-१५ वाजेपर्यंत असतो. रात्री ९-१५ वाजता बाबांच्या पालखीची मिरवणूक समाधी मंदिरातून वाद्यांच्या गजरात व आतषबाजीच्या थाटात निघते व गावातून फिरून आल्यावर शेजारती होते व उत्सवाचा पहिल्या दिवशीचा कार्यक्रम संपतो.

उत्सवाच्या दुसऱ्या मुख्य दिवशी पुन्हा सकाळी ठीक ५ वा. मंदिर उघडले जाते. ५-१५ वा. काकड आरती होते व पुन्हा तसबीर व पोथीची मिरवणूक द्वारकामाईतून पहिल्या दिवसाप्रमाणेच निघते. पण ही मिरवणूक कालच्या दिवशी सुरू केलेल्या व दिवसरात्रभर भक्तांनी एक एक अध्यायाचे वाच सुरू करून समाप्त केलेल्या पोथीची ही मिरवणूक असते.

सकाळी ९ वाजता भिक्षा झोळीचा कार्यक्रम होतो. मा. रिसिव्हरसाहेब स्वतः झोळी घेऊन भिक्षेसाठी निघतात. ते इतर साईभक्तांना पण झोळ्या देतात. ही भक्त-मंडळी शिरडी गावात घरोघरी भिक्षेसाठी गेल्यावर सुवासिनीकडून त्यांचे स्वागत केले जाते. श्रींच्या निशाणाची पूजा आरती करून भिक्षा झोळीत गहू, ज्वारी, तांदूळ, सजुगरा ( बाजरी ) फळे, नारळ, पैसे अशी भिक्षा यथाशक्ती अर्पण केली जाते. समाधी मंदिरासमोरील प्रांगणात आमंत्रित केलेल्या ह. भ. प. शास्त्रीबुवांचा प्रवचनाचा कार्यक्रम सकाळी १० वाजता सुरू होतो व तो १२ वाजेपर्यंत चालतो. श्रींची माध्यान्ह आरती झाल्यावर रिसिव्हर साहेबांचे हस्ते पुजारी ब्राम्हणाना धोतर, उपरणी व सुवासिनी सेवेकऱ्यांना खण दिले जातात. पुण्यतिथी निमित्य इतर सेवेकऱ्यांना धोतरजोड व कपडा दिला जातो.

सायंकाळी ५ वाजता सीमोल्लंघन मिरवणूक निघते. ती वाजत गाजत खंडोबाचे देवळाजवळ जाते. येथे श्रींच्या निशाणाचे व शमीचे पूजन झाल्यावर सोने लुटण्याचा कार्यक्रम होतो व मिरवणुकीतील भक्तमंडळी खंडोबाचे व गावातील इतर देवदेवतांचे मंदिरात जाऊन तेथील मूर्तीचे दर्शन घेतात. देवाला तसेच आप्त मित्रमंडळींनाही सोने लुटण्याचा असा हा कार्यक्रम सायंकाळी होतो.

सायंकाळचे धूपारतीनंतर भक्तांच्या हजेरीचा कार्यक्रम श्रीबाबांच्या समोर व्यासपीठावर सुरू होतो; व तो रात्रभर चालतो. उत्सवाच्या मुख्य दिवशी मंदिर रात्र-भर उघडे असते. यादिवशी मंदिरात विजेच्या दिव्यांचा लखलखाट असतो. भक्तांच्या हजेरीचे क्रमवार कार्यक्रम बाबांसमोरील व्यासपीठावर सवाद्य चालू असतात. या कार्यक्रमासाठी ज्या भक्तांना संधी हवी असेल त्यांना एक आपला नाव, पत्ता किती वेळ कार्यक्रमासाठी हवा इ. संबंधीचे एक छापील माहितीपत्रक भरावे लागते. हे पत्रक शांतीनिवास या निवासस्थानाच्या तळाशी असलेल्या हेमाडपंत वाचनालयातील कर्म-चाऱ्यांकडे विनामूल्य मिळते, व ते योग्य प्रकारे भरून मंदिर व्यवस्थापक किंवा कार्य-क्रमाचे संचालक यांचेकडे कार्यक्रमापूर्वी द्यावे लागते. भक्तांच्या हजेरीचे कार्यक्रम चालू असताना मंदिरात श्रीबाबांच्या मूर्तीला १०१ प्रदक्षिणा घालण्याचे भक्तांचे कार्य-क्रम चालू असतात. काही भक्तर गुरुस्थानासभोवती प्रदक्षिणा घालतात.

रात्री ९–१५ वाजता श्रीबाबांच्या सजविलेल्या तसबिरीची अत्यंत सुशोभित केलेल्या रथातून मिरवणूक काढण्यात येते. या तसबिरीला बाबांचा चॉकलेटी रंगाचा जरीच्या किनारीचा लांब कोट घातला जातो, हा बाबांचा अती आवडता असा कोट

( पान ११६ वर )



धन्य श्रीसाई तुझें चरण । धन्य श्रीसाई तुझें स्मरण
धन्य श्रीसाई तुझें दर्शन । जें कर्म बंधन मोचक ॥
साई चरणी अत्यंत भक्ती । नयनीं कोंदो साई मूर्ती ।
साई दिसो सर्वां भूतीं । ऐसी ही स्थिती भक्तां येवो ॥

# शस्त्रक्रिया टळली

—ले. कर्नल मु. ब. निंबाळकर (निवृत्त)
१/१४ फाईव्ह स्टार अपार्टमेंटस
मंड गार्डन रोड, पुणे–४११००१

● २६ जून १९७८ ची. गोष्ट माझ्या सौभाग्यवतीच्या गळयावर जांभूळ एवढी गाठ दिसली. आधी वाटले टॉनसीलमुळे असेल. परंतु तिचे चुलते त्यावेळी आमचेकडे आलेले होते ते म्हणाले की हे दुसरेच काही दिसते व तुम्ही डॉक्टराना दाखवा, लगेच दुसऱ्या दिवशी मी सौभाग्यवतीला पुण्यातील मिलीटरी कमांडर हॉस्पिटलमध्ये घेऊन गेलो. तेथील शस्त्रक्रिया विशारदाने (Surgical Specealist) पाहताक्षणीच सांगितले की थायरॉईड ग्रंथी वाढल्याची (Nodulas Goitre) ही केस आहे व शस्त्रक्रिया करावी लागेल. योगायोगाने त्याचक्षणी एक महिला हीच शस्त्रक्रिया झाल्यावर घरी परत जात होती. तिला डॉक्टरानी पुन्हः हाक मारली व तिची शस्त्रक्रिया गळयावर कुठे झाली ते आम्हाला दाखविले.

निष्णात डॉक्टरांचा सल्लाच असल्याने मी शस्त्रक्रियेसाठी लगेच हो म्हणालो. त्यावर सर्व टेस्ट्स सुरू झाल्या व त्यात एक आठवडा गेला. ता. ५ जुलै रोजी सर्व टेस्ट पेपर्स घेऊन आम्ही जेव्हा शस्त्रक्रिया विशारदाकडे गेलो तेव्हा कळले की प्राणवायू (oxygen) उत्पन्न करणाऱ्या कंपनीत हरताळ असल्याने अत्यंत निकडीच्याच शस्त्रक्रिया घेण्यात येतात व सौभाग्यवतीची शस्त्रक्रियेची तारीख एक आठवड्यानंतर ठरविली जाईल.

शस्त्रक्रियेचे ऐकल्यापासून सौभाग्यवती फार घाबरून गेली होती, व प्रत्येक टेस्ट्च्यावेळी ती डॉक्टराना विचारत असे की फार त्रास तर होणार नाही ना ? तसेच ती रोज साईबाबांच्या तसबिरीपुढे बसून नियमीत गळयास उदी लावीत असे व अत्यंत भक्तीने बाबांची प्रार्थना करीत असे. तिची ही स्थिती पाहून मला फार वाईट वाटले व विचार करू लागलो की शस्त्रक्रिया टाळता येईल का ? म्हणून आधी आमच्या चांगल्या परिचयाच्या व आमच्या शेजारीच राहणाऱ्या शस्त्रविशारदाकडे मी सौभाग्यवतीला नेले व त्यांना सर्व टेस्ट्स पेपर्स दाखवुन विचारले की मिलीटरी डॉक्टर्स म्हणतात त्याप्रमाणे शस्त्रक्रिया केलीच पाहिजे का ? दुसरा औषधांचा वगैरे उपाय नाही का ? त्यावर ते अगदी निक्षून म्हणाले की शस्त्रक्रिया करणे हाच यावर

खात्रीचा उपाय आहे व तो तुम्ही टाळू नका हा रोग झालेल्या दुसऱ्या व्यक्तींकडे आम्ही तपास केला तेव्हा कळले की पुढे याचा फार त्रास होतो–वजन खूप वाढते किंवा अगदी कमी कमी होत जाते. काहींचे डोळेही सुजून बाहेर येतात वगैरे. तेव्हा आता शस्त्रक्रिया हाच उपाय आम्ही ठरविला.

यानंतर एके दिवशी मी श्रीसाईसच्चरिताचा रोज एक अध्याय वाचतो त्यात अध्याय १३ वा माझ्या वाचण्यात आला. त्यातील आळंदीच्या स्वामींची कर्णरोगाबद्दलची कथा वाचल्यावर माझ्या मनात विचार आला. "बाबा माझ्या सौभाग्यवतीला त्या स्वामींना दिला तसा 'अच्छा अच्छा करेगा' असा आशीर्वाद देतील का? स्वामींच्या कानाच्या सुजेप्रमाणे माझ्या सौभाग्यवतीच्या गळ्याची सूज जाऊन शस्त्रक्रिया टळेल का? असे झालेच तर चमत्कारच होईल. परंतु बाबांची कृपा झालीच तर काय अशक्य आहे?" असो. या विचाराबद्दल मी कुणालाच (सौभाग्यवतीला देखील) बोललो नाही.

एक आठवड्यानंतर म्हणजे १२ जुलै रोजी आम्ही पुन्हा शस्त्रक्रियेचे विचारण्यासाठी दवाखान्यात गेलो. डॉक्टर म्हणाले की, अजून प्राणवायूच्या उपस्थितीबद्दलची स्थिती सुधारली नाही परंतु मी विचार करतो. इतक्यात माझ्या माहितीतले एक डॉक्टर तिथे आले व त्या दोघांनी पुढच्या आठवड्यात सौभाग्यवतीची शस्त्रक्रिया करून टाकण्याचे ठरविले. आता मधल्या आठवड्यात बाबांच्या उदीमुळे म्हणा की कशामुळे म्हणा गळ्याची गाठ कमी कमी होत गेली होती. मला सारखे वाटत होते की, डॉक्टरांना सांगावे सौभाग्यवतीला पुन्हा नीट तपासा व शस्त्रक्रियेची खरोखरीच जरुरी आहे का ते पहा. परंतु डॉक्टराना आपण असे सांगितलेले आवडणार नाही म्हणून मी गप्पच बसलो. पण काय झाले कुणास ठाऊक डॉक्टरानीच आपल्या सहकाऱ्याला पुन्हा गाठ कुठे व कशी आहे हे पाहण्यास सांगितले आणि काय आश्चर्य! गाठ कुठे लागेच ना! दोघाही डॉक्टरांना आश्चर्य वाटले व म्हणाले, 'मग शस्त्रक्रिया कशाला करायची? थोडे दिवस गोळया देऊन पाहू या.' नंतर मला गोळया लिहून दिल्या व एक महिन्यानंतर तपासणीसाठी पुन्हा येण्यास सांगितले. हे ऐकल्यावर आम्हा दोघास किती आनंद झाला म्हणून सांगू? सौभाग्यवती तर हसावयासच लागली व मला एकदम अध्याय १३ तील आळंदीच्या स्वामींची कथा त्यावरून मला सुचलेला विचार आठवला.–

गेलो पुढील डॉक्टराकडे । नकळे बाबांना पडले साकडे ।
डॉक्टर पाही जो कानाकडे । सूज कोणीकडे लक्षेना ॥ १३–११७

# * पाच पैशांची सूट *

प्रा. र. श्री. पुजारी
रमानिवास, ९१२ सदाशिव पेठ,
पुणे ३०

● १ ऑक्टोबर १९७९ रोजी विजयादशमी होती. त्या दिवसापासून श्री बाबांच्या ६१ व्या पुण्यतिथी-वर्षास सुरुवात झाली. अशा महापर्व प्रसंगी. 'श्रीसाई-महात्म्य' ही तीन तासांच्या पारायणाची पोथी मजकडून श्रीबाबांनी तयार करवून घेतली. तिच्या प्रती घेऊन ३१ सप्टेंबर रोजीच शिरडीस मी हजर झालो. दुसरे सकाळी विजयादशमीस समाधीवर पोथी ठेवून स्टॉलवर पोथीच्या विक्रीसाठी मी बसलो.

श्रीबाबांनी पोथी मजकडून लिहवून इतकेच नव्हे तर छापवूनही घेतली! या बद्दल एकीकडे मनास आनंद होता; तर दुसरीकडे आपण ग्रंथकार असून पुस्तक-विक्रेत्याची भूमिका करीत आहोत या शरमेमुळे मन मेल्याहून मेले झाले होते. तरी पण मी मनाची समजूत घालीत होतो : हे कामही सेवेचे आहे. श्रीबाबांचे जोडणे राखणे येथे तू मनाने सेवा म्हणून मानलेस, तेथे त्यांचे गुणवर्णन असलेली पोथी विकण्याचे काम तू कमीपणाचे का मानावेस ? मुळीच मानू नयेस.

वस्तुतः त्या दिवशी पोथ्या विकण्यापेक्षा भक्तांना त्या वाटण्याचेच काम. मी करीत होतो. पुण्यास माझे घरी पोथ्यांचा एक गठ्ठा मी ठेवून आलो होतो. त्यातील प्रत्येक प्रतीवर 'श्रीसाईप्रसाद भेट' असे लिहिलेले होते. प्रसाद म्हणून पेढेही सोबत ठेवले होते. सकाळी नऊनंतर ती ती मंडळी माझ्या निवासस्थानी येऊन आपापली प्रत घेऊन जाणार होती.

इकडे शिरडीसही सकाळी नऊनंतर मी जवळ जवळ तेच काम करीत होतो. संस्थानचे विद्यमान, पदाधिकारी, माजी पदाधिकारी, संतसज्जन, इष्टमित्र यांना मी पोथ्या वाटीत होतो. मधून मधून स्टॉलवर गिऱ्हाइके येत होती. मोडीच्या व्यवहारात मी कच्चा आणि गोंधळ करणारा मनुष्य, म्हणून पोथी देण्याचे काम मी करीत होतो तर पैसे घेण्याचे काम माझे मित्र पुण्याचे छायाचित्रकार श्री. जगन्नाथराव कुलकर्णी करीत होते.

शस्त्रप्रयोग आवश्यकता। डॉक्टर म्हणे नलगे आता।
स्वामींची हरली दुर्धर चिंता। विस्मय समस्ता वाटला॥ ११८

माझ्या सौभाग्यवतीच्या बाबतीतही हीच गोष्ट तंतोतंत झाली. बाबा काय करू शकत नाही ?

—एकचि उपाय। साईबाबांचे धरावे पाय।
हाचि केवळ तरणोपाय। बाप माय तो एक॥ १३-५७॥
तीच कनवाळू सर्वांची आई। हाकेसरशी धावत येई।
कळवळून कडिये घेई। जाणे सोई लेकरांची॥ ५८॥

एक महिन्यानंतर म्हणजे १३ ऑगस्ट १९७८ रोजी आम्ही पुन्हा डॉक्टरांकडे गेलो. तपासल्यावर त्यांनी गाठ पुन्हा दिसली नाही म्हणून गोळयाच चालू ठेवण्यास सांगितले. काही दिवसानी आम्ही गोळयाही बंद केल्या व बाबांच्या कृपेने आज ३ वर्षे होत आलीत परंतु त्याचा काहीच त्रास नाही.

सर्वात आश्चर्य म्हणजे गाठ नाहीशी झाली तोपर्यंत कसलीच ट्रीटमेंट सुरू झाली नव्हती. गोळयाही नव्हत्या. तसेच एक्स-रे मध्ये अंथी सुजलेली स्पष्ट दिसत होती एवढेच नव्हे तर श्वास नळीसुद्धा त्यामुळे उजव्या बाजूस सरकलेली दिसत होती. त्याचा रिपोर्ट व फोटो अजून माझ्याकडे आहे. आमच्या शेजारचे शस्त्रक्रिया विशारद ज्यांचा मी सल्ला घेतला होता त्यांना मी शस्त्रक्रिया न करताच गाठ अदृश्य झाली हे सांगितले तेव्हा त्यांचा विश्वासच बसेना! खात्री करण्यासाठी ते सर्व पेपर्स पाहण्यास आमच्या घरी आले. सौभाग्यवतीचा गळा पुन्हा तपासला व काहीच न सापडल्याने आश्चर्य करीत परत गेले.

वरील घटनेवरून दोन गोष्टी मला पटल्या. पहिली म्हणजे श्रीसाईसच्चरित नियमित वाचले तर त्यातील वर्णिलेल्या कथेप्रमाणेच तंतोतंत अनुभव वाचकास लूहळू येतात. उदा. काकासाहेब दिक्षीतांप्रमाणे व वणीच्या काकाजींप्रमाणे साई-दर्शनासाठी शिरडीस जाण्याची ओढ लागली की वाटेचा मार्ग अगदी सुरळीत होणे, नानासाहेब चांदोरकरांप्रमाणे बाळंतीण अडली असता बाबांची आरती म्हटल्याबरोबर तिची सुटका होणे, अण्णासाहेब दाभोलकरांप्रमाणे अध्यात्मिक शंका उद्भवल्यास त्या दिवशीच्या अध्यायात तिचे निवारण होणे किंवा त्या कृतीचे दृढीकरण होणे वगैरे वरील अनुभव त्यातलाच एक दुसरी गोष्ट म्हणजे बाबांच्या उदीने कुठलाही रोग बरा होतो. मात्र निष्ठा आणि सबूरी पाहिजे. ☆

गिऱ्हाईक म्हटले की त्याच्या संस्कृतीप्रमाणे त्याच्या तऱ्हाही आल्याच सात रुपये किंमतीच्या पोथीवरही सूट–सवलत मागणे सुरू होते. मीही ते मागतील तेवढी सूट देत होतो. कोणी दोन रुपयांचीसुद्धा सूट मागितली ! तीही आम्ही दिली. मनात विचार होता की भक्तांना आज कोणत्याही कारणाने पोथी नाकारावयाची नाही. साहजिकच आर्थिक दृष्टया दुर्बळ भक्ताला पोथी फुकट देण्याचीही मनाची तयारी होती. त्याचप्रमाणे उधार–उसनवार या न्यायाने काही लोक पोथ्या घेऊनही गेले. त्यातील काहींनी पुन्हा तोंडही दाखविले नाही असो.

सांगण्याचे तात्पर्य असे की पोथीची विक्री त्याच दिवशी नव्हे तर पुढेही काही दिवस अशीच सुरू होती. त्यामुळे पोथ्या पुष्कळ खपल्या होत्या. परंतु हातातील रक्कम मात्र बेताचीच होती. तरीही मी नाराज नव्हतो. श्रीबाबांनी आपल्यासारख्या अति सामान्य भक्ताकडून फार मोठी सेवा करवून घेतली याच आनंदात मी होतो.

तो दिवस बहुधा गुरुवारचा असावा. गुरुवारचा मला उपास असल्यामुळे स्टॉलवर माझ्याशी भक्तिप्रेमाच्या गोष्टी करणारे भिन्न भिन्न प्रांतातील कोणीही भक्त त्यावेळी उपस्थित नव्हते. ते बहुधा भोजनास गेले होते. त्यामुळे स्टॉलवर मी अगदी एकटाच उरलो होतो. अशा वेळी धोतर, अंगावर पैरण, डोक्यास पांढरा रुमालवजा फेटा असा सर्व पांढरा पोशाख केलेली एक किडकिडीत व्यक्ती गिऱ्हाईक म्हणून माझ्यासमोर हजर झाली.

त्या व्यक्तीने पोथीची एक प्रत दोन्ही हातानी अलगद वर उचलली आधी छातीस लावली. नंतर मस्तकास लावली. असे तीन वेळा केले. हे करीत असताना ती व्यक्ती " छान आहे ! छान आहे ! छान आहे ! आनंद आहे ! आनंद आहे ! " असे तीन तीन वेळा म्हणाली. त्या व्यक्तीचे बोल लोण्यासारखे मृदू आणि खडी-साखरेसारखे गोड होते.

ती गिऱ्हाईक व्यक्ती मला म्हणाली, " आम्हाला पोथी घ्यायची आहे. देवा ! आम्हाला एक पाच पैशांची सूट द्या. "

मी म्हटले, " असे का म्हणता ? तुम्ही मागाल तेवढी सूट मी देईन. "

यावर ती व्यक्ती म्हणाली, " छे:! छे:! तसे नको. मला फक्त पाच पैशांची सूट द्या. मी तुम्हाला सात रुपये देतो. तुम्ही मला पाच पैसे द्या. म्हणजे व्यवहार पुरा झाला. "

मजकडे पाच पैशांचे नाणे नव्हते. म्हणून मी दहा पैशांचे नाणे त्या व्यक्तीस देऊ केले. ते तिने घेतले नाही. उलट खिशात हात घालून कोठून कोठून पैसे काढून आधी पाच रुपयांची एक नोट, नंतर एक रुपयाची एक नोट व सर्वांत शेवटी पंच्याण्णव पैशांची मोड माझ्या हाती ठेवली. मग पोथीची आपली प्रत मोठ्या प्रेमाने उचलून पुन्हा माझ्या छातीशी धरली. हे पाहून मी म्हणालो, " तुम्ही मला मोड दिली हे फार बरे झाले. मला येथे मोड लागते. "

ती व्यक्ती समाधीमंदिराच्या दिशेने मघाचेच शब्द उच्चारीत आनंदाने निघून गेली. मीही माझा पसारा आवरून गुरुस्थानासमोरील माझ्या खोलीत परत आलो.

नित्याप्रमाणे दुसरे दिवशी पहाटे स्नान वगैरे उरकून मी आधी समाधीमंदिरात गेलो. नंतर द्वारकामाईत गेलो. तेथील भक्तांची भक्तिभावना पाहून मी गहिवरलो. मनाशी म्हणालो, " माझ्यासारख्या भक्तिहीन माणसाकडून श्रीबाबांनी आपली पोथी लिहवून घेतली ! खरोखर संतांच्या कृपाप्रेमास सीमा नाही. "

श्रीबाबा ज्या पाषाणावर बसत, त्या पाषाणावर आता संगमरवरी श्रीपादुका कोरल्या आहेत. त्या श्रीपादुकांवर मी मस्तक टेकले आणि काय आश्चर्य, फुलांच्या पाकळ्यांसह काही तरी वस्तू माझ्या कपाळास चिकटली. ती वस्तू काढून, चष्मा लावून मी पाहातो तर पाच पैशांचे एक नाणे !

पाच पैशांचे ते नाणे मी द्वारकामाईतील पेटीत टाकणार तोच कोणी मला जणू रोखले ! त्यामुळे ते नाणे मी घेतले. पुडीत बांधले. पर्यायी नाणी पेटीत टाकून मी परतलो.

माझ्या ध्यानी आले की कालचे ते गिऱ्हाईक म्हणजे स्वतः श्रीबाबाच होते !

★

# बाबा! बाबा! ह्या मधमाशांपासून वाचवा!

—डॉ. इंदूताई नाईक
सीताकुंज, पुणे-मुंबई रस्ता
लोणावळा

● मे १९८१ ची गोष्ट आहे. आमची घरची सर्व मंडळी मुंबईहून ऋषीकेषला जावयास निघाली. जाताना बडोदा जयपुर उदेपूर हा मार्ग धरला. बराच प्रवास झाला होता. जयपूरचे अलीकडे ४०–४५ किलोमीटरचे अंतरावर आम्हाला दुपार झाली. तेव्हा सर्वानुमते फराळ करण्याचे ठरले. आम्ही एक चांगली झाडाखालची जागा पाहून फराळाचे डबे, पाण्याचे थर्मास काढून सतरंजी अंथरून फराळाची तयारी करू लागलो.

शेजारीच १०–१२ घरांची वस्ती होती. त्यातील काही मुले आमचेभोवती जमू लागली. तेव्हा माझ्या भाच्याने त्यांना " आम्ही इथे जेवण घेणार आहोत तरी उगाचच गर्दी करू नका. " असे सांगितले. त्यांनी न ऐकल्यासारखे केले म्हणून भाच्याने परत तेच पण जरा जोरात सांगितले, तेव्हा ती मुले गेली परंतु १०–१२ मिनिटांनी परत आली, आणि तीसुद्धा चेंडू खेळत आली. ह्यावेळी त्यांचेबरोबर दोन जरा मोठी मुले होती. आमच्यापैकी काहीचे जेवण व्हावयाचे होते म्हणून माझे आईने दम दिला की " जर चेंडू जेवणात पडला तर मार देईन म्हणून. झाले. त्याच क्षणाला त्या मुलानी चेंडू झाडावर फेकला आणि झाडावरील मधमाशाचे पोळे उठवीले. आमच्या हे लक्षात येण्या आधीच माशांनी आम्हा सर्वांवर हल्ला केला. सर्वांची पळापळ झाली. माशांनी चाऊन सर्वांना बेजार केले. बाकी सर्व त्या ठिकाणाहून दूर पळाले पण आई व मोठी बहिण पळू शकत नव्हत्या. हाताशी असलेल्या नॅपकीनने व पेपरने त्या दोघी माशांना हकलवीत व मारीत होत्या. डोक्या भोवती पदर गुंडाळून मी त्यांच्या मदतीस धावले. माशा त्रास देतच होत्या. पण माझे तोंडून आर्त स्वरात शब्द उमटले. " बाबा, काय हे तुमच्या लेकरांचे हाल का आमच्या नशिबी हा असा प्रसंग आला बाबा धावा आणि आम्हा सर्वांना वाचवा माशां पासून रक्षण करा "

आणि काय आश्चर्य सांगू त्या क्षणाला सर्व माशा कुठे आणि कशा गेल्या ते समजले पण नाही. हजारोनी घोंगावणाऱ्या माशा एका एकी नाहीशा झाल्या धन्य-बाबांची लीला. धन्य बाबांचे भक्ता वरील प्रेम.

बाबांचे गुण गात आम्ही पुढील प्रवासास निघालो. ☆

# बाबांचा प्रसादपूर्वक अनुभव

—डॉ. राजाराम सिताराम कापडी एम. बी. बी. एस.
कोल्हापूर,

● मी बाबांचा एकनिष्ठ भक्त आहे. १९१८ साली बाबांनी समाधी घेण्यापूर्वी त्यांचे प्रत्यक्ष दर्शन घेतलेला बाबांचा एक नम्र सेवक आहे, माझ्या ८६ वर्षांच्या आयुष्यात बाबांचे दर्शन झाल्यापासून मला पदोपदी अनेक अनुभव आले आहेत. त्यामुळे बाबा हे अद्वितीय संत आहेत. नव्हे प्रत्यक्ष परमेश्वर आहेत असे मी मानीत आलो आहे. मी नियमाने बाबांचा सच्चरित्र ग्रंथ वाचीत असतो. ज्या ज्या वेळी माझे मन दोलायमान होते त्या त्या वेळी सच्चरित ग्रंथात ४५ व्या अध्यायात वर्णन केल्याप्रमाणे मी कपाटात ठेवलेल्या बाबांच्या मूर्तीचरणी चिठ्या टाकून निर्णय घेतो.

मी लिहिलेल्या 'काकाचा पैसा' या नाटकाच्या आधारे लिहिलेली १॥ तासाची नाटिका 'पैशाचे झाड' गणेशोत्सवात माझ्या तरुण नातवंडे व आप्त मंडळी यांच्या सहाय्याने करण्याचे को. हौ. सोसायटीच्या गणेश मंडळाने ठरविले.

दोन महिने पात्रांची मांडणी करून तालीम (रिहर्सल) सुरू केल्या. मीच दिग्दर्शन करीत होतो. २ पात्रांची उणीव भासू लागली. काकाचे व हिरोचे काम करावयास योग्य माणसे मिळेनात. काकाची भूमिका मी तीस वर्षापूर्वी केली होती. आमच्या डॉक्टर लोकांच्या सहाय्याने काढलेल्या 'साईनाट्य मंडळा'तर्फे 'काकाचा पैसा' हे नाटक रंगभूमीवर अनेक ठिकाणी यशस्वी झाले होते.

मुलांनी मीच काकाची भूमिका करावी असा आग्रह धरला. एका पात्राची जरी भरती झाली तरी हीरोच्या भूमिकेला योग्य माणूस मिळेना. नाटकाची तारीख २९–९–८० ठरलेली होती. शेवटी नाटक रद्द करावे की काय अशा मनःस्थितीत मी आलो. अडचणीच्या प्रसंगी बाबा धावून येतात हा माझा पूर्वापार अनुभव होता नुकताच सच्चरित्र ग्रंथातील ४५ वा अध्याय वाचला होता. मी बाबांच्यापुढे चिठ्या टाकून कौल घ्यायचे ठरविले. एका चिठ्ठीत 'नाटक करावे' व दुसऱ्या चिठ्ठीत 'नको' असे लिहिले व एका बालिकेकडून चिठी उचलावयास सांगितले. नाटक करावे असा बाबांचा कौल मिळाला. नाटकात कामे करणाऱ्या सर्व मुलांमुलींना हुरूप आला. वाटेल ते झाले तरी नाटक करावयाचे असे नक्की ठरले आणि त्याच

दिवशी माझ्यातील एक कॉलेजकुमार ज्याने अनेक नाटकात निरनिराळ्या भूमिका केल्या होत्या असा जणू बाबांनी पाठविल्याप्रमाणे दत्त म्हणून उभा राहिला. त्याला विचारताच आठ दिवसात ती भूमिका करण्याचे मान्य केले. दिवसातून दोन तीन वेळा माझ्याकडे येऊन त्याने भूमिका समजावून घेतली.

नाटक ठरल्यावेळी शेकडो उपस्थित प्रेक्षकांच्या टाळ्यांच्या कल्लोशात यशस्वी रित्या पार पडले. एवढेच नव्हे तर कोल्हापुरातील एक शस्त्रकला विशारद डॉ. वझे एम. एस. आणि हृदयविकाराचे तज्ज्ञ सी. पी. आर. हॉस्पिटलचे सिनीअर डॉ. चिटणीस यांनी प्रसन्न होऊन प्रत्येकी एकावन्न रुपये रोख देऊन कलाकारांना प्रोत्साहन दिले. हा सुद्धा बाबांनीच प्रसादपूर्वक दिलेला अनुभव असे आम्ही मानतो.

●

Books on Saibaba are coming one after the other, yet

A Miraculous Festival of Lights in the Masjid of Sai Baba ! Oil lamps lighted with mere Water !

A Thrilling Account of Many such Miracles, Devotion, Spiritual Preaching of this great Saint of Shirdi !

# "A MISSION DIVINE !" Rs. 45/-

## " मशिदीत प्रगटला परमेश्वर ! " Rs. 36/-

A Novel on Sai Baba suspassing all books !
Postage Rs 4–50 each. No V. P. P.

**PRASHA NTI PRAKASHAN, 5 Vasant Apartments, 47 Kastur Park, Shimpoli Road, Borivali (W), Bombay 400 092.**

# श्रीसाई समर्थ

— श्री. गणपतराव सामंत, एम. ए.
व्यवस्थापक–" श्रीमहालक्ष्मी संस्थान "
मुंबई–२६

● श्रीसाईबाबांनी जे चमत्कार माझ्या जीवनात केले ते अगणित आहेत पण पण एक अगदी हल्लीचा चमत्कार येथे लिहीत आहे.

दि. १८ ऑगस्ट रोजी रात्री माझ्या मुलाने ( नाव–गोकुळ, वय पंचवीस ) मला शिरडीचा बेत सांगितला. दुसऱ्याच दिवशी सकाळी मोटरसायकलने आपण निघत आहोत, बरोबर समवयस्क आठ मित्र आहेत. पाच मोटारसायकली आहेत असे सांगितले. माझ्या होकाराची आवश्यकता नव्हती. कारण शिर्डीस जाण्यासाठी मुहूर्त पाहावयाचा नसतो हे माझे तत्त्वज्ञान. सर्व मित्रमंडळी निघाली. आदले दोन दिवस पाऊस नव्हता. पण त्याच दिवशी निघावयास व पावसास सुरुवात झाली. कसारा घाटापर्यंत सर्व ठीक. तेथे चहापाणी झाल्यावर प्रवासास सुरुवात झाली. सर्वांनी मोटारसायकली जोरात सोडल्या. ९० कि. मी. वेगाने प्रवास सुरू झाला व अचानक एका वळणावर माझा मुलगा गोकूळ व त्याचा मित्र घाटात कोसळले. गोकूळने तीन–चार गोलांट्या खाल्ल्या. कारण तो मागे बसला होता. चालवणाऱ्यास थोडासा मार बसला पण गोकूळला बराच मार लागला व कसारा येथे टाके मारून घ्यावे लागले. तशाच परिस्थितीत पाऊस असताना प्रवास सुरू झाला व नासिक येथे विश्रांति घेऊन माझा मुलगा शिरडीस पोचला. तेथे हॉस्पिटलमध्ये ट्रीटमेंट मिळाली. जागेची सोय झाली व दोन दिवस श्रीसाईबाबांचे मनसोक्त दर्शन घेऊन गोकूळ मुंबईस आला. घाटात काळ आला होता पण श्रीसाईप्रेरणा वेगळीच होती.

पावसाच्या दिवसात मोटरसायकलवरून इतक्या लांब प्रवास करण्यास कोणताच बाप मुलास परवानगी देणार नाही पण मी परवानगी दिली कारण तो शिर्डीस चालला होता व त्याचे हित करणे, रक्षण करणे श्रीसाईबाबांकडे होते.

गोकूळने नंतर एक आठवडा विश्रांति घेतली. जखम अजून आहेच पण श्रीसाईबाबांनी त्याला त्याच्या व्यवसायात चांगलाच आर्थिक हात दिला.

दुसरी महत्त्वाची घटना. १५ ऑगस्ट ८१ रोजी माझे एके ठिकाणी मुख्य पाहुणा म्हणून भाषण होते. त्या भाषणाच्या ओघांत मी एका व्यक्तीविषयी असे उद्‌गार काढले की, 'हा लाखांचा पोशिंदा जगो.' मी श्रीसाईबाबांकडे नवस करत नाही. काही मागत नाही पण वरील व्यक्तीविषयी मी बाबांस म्हटले त्या व्यक्तीस न्याय द्या. लाखो लोक त्या व्यक्तीस मानतात. साधारण माझ्या भाषणानंतर दोन दिवसांनीच त्या व्यक्तीची निर्दोष म्हणून हायकोर्टाने मुक्तता केली एवढेच नव्हे तर दुसऱ्या एका गुन्ह्याबाबत दोन दिवसापूर्वीच सुप्रीम कोर्टाने राज्य शासनाचे अपील फेटाळून लावले. शासनापेक्षा दैवी शक्ती श्रेष्ठ ठरलेच. या घटनेबद्दल मला एवढेच सांगावयाचे आहे की, बाबांनी माझे म्हणणे ऐकले. न्याय मिळवून दिला. वरील व्यक्तीचे नाव देणे इष्ट नव्हे पण साईभक्त तारतम्याने ओळखू शकतील.

अढळ श्रद्धा असल्यावर सर्व काही शक्य होते याबाबत माझे आणीबाणीतील उदाहरण या अगोदरच प्रसिद्ध झाले आहे. आज व्यवस्थापक तोहि श्रीमहालक्ष्मी संस्थानचा या नात्याने अनेक भक्तांचे संबंध येतात व त्यांची श्रद्धा पाहून धन्यता वाटते. श्रद्धा ही एकेठिकाणीच केंद्रित करणे आवश्यक आहे. पावणाऱ्या देवांकडे धाव घेण्याची आवश्यकता नाही. सामुदायिक प्रार्थनेने वातावरण भारून जाते व अशा ठिकाणी परमेश्वर असतो हे मी शिरडीत व येथेही अनुभवतो आहे. मंत्र–तंत्र, ज्योतिष, करणी या गोष्टींच्या मागे गेल्यास त्रासच होतो, बुद्धीवादातून जी श्रद्धा निर्माण होते तीच खरी श्रद्धा. त्या ठिकाणी अंधश्रद्धेला स्थान नाही. एकंदर स्फोटक परिस्थिती पाहिल्यावर मन विषण्ण होते पण आपली दृढ श्रद्धा असल्यास आपली 'साईमाय' सर्व संकटातून आपणास तारून नेईल यात संशय नाही.

★

# जेथे जातो तेथे । तू माझा सांगाती

—श्री. मधुकर भीमाशंकर देशपांडे
३३ कसबा पेठ, पुणे ११

जेथें जातो तेथे । तू माझा सांगाती
नित्य ती प्रचिती । येई मज ॥

माझ्या थोरल्या सूनबाई सुरतला होत्या. त्या सात महिन्याच्या गरोदर होत्या. त्याच वेळी त्यांना त्यांच्या जाऊबाई दुर्दैवाने अपुऱ्या दिवसांच्या बाळंतीण झाल्याचे समजल्यावर त्यांच्या मनानी धसका घेतला. श्रीसाईबाबा आपले रक्षण कर्ते आहेत याची जाणीव त्यांना यापूर्वी अनेकवेळा आलेली होती तरी सुद्धा त्यांच्या मनीनी थोडा धसका घेतला आणि पति जगदीश व पुत्र चि. अजिंक्य यांजबरोबर त्या पुण्यास आल्या. पुण्यास पहिले बाळंतपण ज्या ठिकाणी झाले होते तेथे त्यांची परत जाण्याची तयारी नव्हती. कारण जाऊबाईंचा अनुभव समजला होता. शेवटी श्रीसाईबाबाच मार्ग दाखवितात. श्री. अवधूत जोशी या एका साई भक्तानेच मार्गदर्शन केले आणि सांगितले की, 'खडकमाळ आळी जवळ डॉ. पुरंदरे पतीपत्नी यांचे हॉस्पिटल आहे, ते माझ्या परिचयाचे आहेत. तेव्हा तुम्ही तेथे चौकशी करा, मीही प्रयत्न करतो आणि त्याप्रमाणे आम्ही त्यांचे हॉस्पिटल मध्ये गेलो. डॉक्टरांना सर्व परिस्थिती निवेदन केली. त्यांनी सूनबाईंना तपासले आणि चार दिवस पूर्ण विश्रांती घेऊ द्या नंतर पाहू काय करावयाचे ते 'असा सल्ला दिला' डॉ. पुरंदरे पतीपत्नी दोघेही धार्मिक प्रवृत्तीचे आहेत हे समजल्यावर माझ्या श्रद्धाळू मनाला मोठा दिलासा मिळाला. त्या चार दिवसात डॉ. सौ. पुरंदरेबाई दिवसाकाठी ४–५ वेळा तपासून चौकशी करीत आणि धीराचा सल्ला देत, डॉक्टरांना मी म्हणालो, 'डॉक्टरसाहेब, ही केस संपूर्ण तुमचे ताब्यात दिली आहे. आपणच सर्व निर्णय घ्यावयाचे आहेत. 'त्या वेळातच माझ्या सौभाग्यवतीने मी लिहिलेली 'श्रीसाईमहिमामृत' ही पोथी सौ. डॉक्टर बाईना दिली. त्यापूर्वी त्यांनी श्रीसाईबाबांचे नाव फक्त ऐकले होते, त्यांची पोथी वाचली नव्हती. अगर त्या शिर्डीकाही गेल्या नव्हत्या त्यादिवशी रात्री सौ. डॉक्टरबाईनी पोथी सर्व वाचली आणि दुसरे दिवशी मी हॉस्पिटलमध्ये गेल्यावर मला माडीवर त्यांचे राहाते घरी घेऊन गेल्या आणि म्हणाल्या, 'मी काल रात्री

# श्रीसाई कृपा

—डॉ. सौ. मालती राहाटे
सामान्य रुग्णालय मु. पो. जि. भंडारा

● मी ता. २८-६-८१ ला तुमसरला लग्नाला गेले होते. ता. २९ ला स. ८-३० वाजता दवाखान्यात मला कामावर रुजु व्हायचे होते. तुमसरवरून ७ वाजता सुटलेली बस १० कि. मी. अंतरावर मोहाळी गावी थांबली. तेथे हलबा कोष्टी लोकांचा जी. आर रद्द करण्याबद्दल 'बंद'चा कार्यक्रम होता. आमची बस बंद पडली. इतर बरीच वाहने थांबली होती. तेथून मागे पुढे कोठेही जाण्याला काहीच साधन नव्हते. दवाखान्याची वेळ चुकणार होती.

आता बाबांच्या सबुरीचा अवलंब करण्यापलीकडे माझे जवळ काहीच नव्हते. मी बाबांना म्हटले 'बाबा तुम्ही मला केव्हाही पोहोचवा. पण माझ्या गैरहजेरीमुळे दवाखान्यात काही भानगडी किंवा गैरसमज होऊ नये.'

१० वाजता पोलीस ऑफीसरनी सांगितले की, भंडाऱ्याला जाणाऱ्या प्रवाशांनी पोलीस स्टेशन जवळ थांबावे. तेथे भंडाऱ्यावरुन येणारी बस तुम्हाला भंडाऱ्याला नेईल. १०-४५ वाजे पर्यंत आम्ही थांबलो. बस नाही. इतक्यात एस टी डेपो भंडाऱ्याचे एक अधिकारी छोटी गाडी घेऊन परिस्थितीचा आढावा घेण्याकरीता तेथे आले, होते. ते परत भंडाऱ्याला जात होते. मी सहज त्यांना विचारले. त्यांनी होकार दिला व भंडारारोड पर्यंत पोहोचवले. डॉक्टर तुमची आवश्यक सेवा असते म्हणून मी तुम्हाला आणले, अन्यथा या बंदच्या ड्यूटीत कोणाला नेता येत नाही. पुढील प्रवास दुसऱ्या बसने करण्याची माझी सोय पण करून दिली. मी दवाखान्यात ११-१५ वाजता पोहचले व पुढील कामाला लागले. माझ्या बरोबर अडलेले लोक एक वाजता भंडाऱ्याला पोहोचले.

बाबांनी ती स्पेशल गाडी माझे करीताच पाठविली, त्या अधिकाऱ्याला तशी प्रेरणा दिली व मला लवकर पोहचवून दिले. त्या सर्वव्यापी बाबांना माझे कोटी कोटी प्रणाम!

'ब्रह्मचैतन्य 'च जन्माला येणार आहेत असे वाटते. यावर सूनबाई आनंदाने हसल्या. कारण लग्नाआधी तेच त्यांचे आवडते दैवत होते.

आणखीन एक गोष्ट सांगायची म्हणजे इतर हॉस्पिटलपेक्षा या हॉस्पिटलचे दर जास्त आहेत असे काहींनी सांगितले होते. परंतु ती वेळ पैशाकडे पाहाण्याची नव्हती. डॉक्टरांच्या आपुलकीच्या वागणूकीमूळे हा विचारही आम्हाला शिवला नाही. सूनबाई बाळंतीण झाल्यावर 'दसऱ्याचे दिवशी तुम्ही पेशंटला घेऊन जाऊ शकता, तब्येत ठीक आहे. मी ड्रेसिंगसाठी येत जाईन, काळजी करू नका' असा सल्ला दिला. डॉक्टरांना मी काय बिल झाले आहे असे विचारताच ते म्हणाले, 'अहो दादा, पैशाची काय एवढी काळजी करता, आमचे पैसे बँकेतच आहेत. तुमच्या मुलाला सरकारकडून जेव्हा पैसे मिळतील तेव्हा ते द्या. आम्हाला काही घाई नाही.' मी म्हणालो, डॉक्टरसाहेब तुमचे म्हणणे बरोबर आहे, पण आमच्या साईबाबांच्या दृष्टीने हे योग्य नव्हे. श्रमिकाला मोबदला हा मिळालाच पाहिजे असे त्यांचे महान तत्त्व होते. आम्ही त्यांचे पाईक आहोत त्याप्रमाणे मला आचरण केले पाहिजे, असे म्हणून मला योग्य वाटले तेवढे पैसे त्यांच्या पुढ्यात ठेवले आणि बिल झाल्यावर बाकीचे देईन असे सांगून निरोप घेतला. मी ठेवलेल्या पैशाकडे डॉक्टरांनी पाहिलेही नाही. जाता जाता मला म्हणाले, 'दादा, तुमच्याबरोबर शिर्डीला येणार.

या तीन शब्दातच तिन्ही लोक व्यापून राहिलेल्या श्रीसाईबाबांची आठवण झाली नाही तरच नवल!

तुम्ही दिलेली 'श्रीसाईमहिमामृत' ही पोथी वाचली, ती मला फार आवडली आणि मी तुमच्याच बरोबर शिर्डीला श्रीबाबांच्या दर्शनाला येणार आहे आणि यासाठीच तुम्हाला वर घेऊन आलेले आहे. " या त्यांच्या उद्‌गाराने मी गहिवरून गेलो आणि 'अवश्य जाऊ' असे सद्‌गदीत होऊन आश्वासन दिले. आणि त्या दिवसापासूनच आम्ही म्हणजे कोणी त्यांचे अत्यंत जवळचे असे आप्त आहोत अशा रीतीने उभयता डॉक्टरांनी आमचेशी अत्यंत प्रेमाने, आपुलकीने वागून आमच्या मनातील सारी व्यथा, भीती चुटकीसरसी नष्ट केली. 'तुम्ही काळजी करू नका' या त्यांच्या धीराच्या सल्ल्याने आमच्या सर्वांचा मानसिक ताण कमी झाला अर्थात अशी बुद्धी देणारे श्रीसाई याशिवाय दुसरे कोण असू शकणार !

विश्रांतीचा सल्ला चार दिवसावरून वाढत वाढत तो जवळजवळ एकवीस दिवस झाला आणि डॉक्टरांनी सांगितले की, नववा महिना सुरू होताच आपण काय करावयाचे ते ठरवू. आणि सुदैवाची गोष्ट म्हणजे नववा महिना लागला आहे असे त्यांना समजताच त्यांनी आदले दिवशी उद्या सकाळी सीझरिंग करावयाचे आहे असे सांगितले. उभयता डॉक्टरांच्या प्रेमळ वागणूकीने सूनबाईंना आणि आम्हाला आता कशाचीच भीती राहिली नाही. त्या रात्री मधेच डॉ. सौ. पुरंदरेबाई उठल्या आणि डॉक्टरांना म्हणाल्या, 'मी पेशंटकडे जाते.' डॉक्टर म्हणाले, सकाळी सीझरिंग करावयाचे आहे. आता जाई कशाला ? पण ते सौ. डॉक्टरबाईंना मानवले नसावे. त्या रात्री खाली येऊन सूनबाईंचे जवळील कॉटवर झोपल्या. इतकी तळमळ, इतकी आपुलकी आणि प्रेम हल्लीच्या जमान्यात पहावयाला मिळणे अत्यंत कठीण आहे. साईबाबांनीच तशी त्यांना प्रेरणा दिली असणार हे नक्की--

सकाळी सीझरिंग झाले आणि शनिवार दि. ११ ऑक्टोबर १९८० रोजी सूर्योदयाला सूनबाई बाळंत होऊन त्यांना दुसरा मुलगा झाला. या विक्रमी बालकाला 'विक्रम' याशिवाय दुसरे नावच आमचे लक्षात आले नाही.

आदले दिवशी रात्री मी जेव्हा दवाखान्यातच गेलो तेव्हा सूनबाईंशी गप्पा मारीत असताना अचानक मला 'अंजनी गर्भ संभूतो वायुपुत्रो महाबल ! कुमारो ब्रम्हचारिच तस्मै श्रीहनुमंतेयनमः' हे मी लहानपणी पाठ केलेले आणि कित्येक दिवस आठवण्याचा प्रयत्न करीत असतानाही जे आठवत नव्हते ते स्तोत्र आठवले आणि एकामागून एक एक ओळ्या माझ्या मुखातून निघाल्या. मी सूनबाईला म्हटले 'आजचा दिवस फार चांगला दिसतोय मला. हे मारुतीस्तोत्र मी आज अनेक वर्षे आठवीत होतो पण ते मला येत नव्हते आज ते आठवले आहे. मी गमतीने म्हणालो

# आमुचा वाटाड्या साई !

– श्री. शंकर इनामदार
२६, शंकरपुरा पेठ, महाजन वाडा
जुन्नर, जि. पुणे ४१०५०२

● जीवनात पुष्कळदा असे प्रसंग येतात की त्यावेळी ठाम निर्णय घेणं ही एक समस्या होऊन बसते. ज्या गावी जायचं असतं त्याची दिशा माहीत असावी पण रस्ता ठाऊक नसावा आणि क्रमीत असलेल्या मार्गाला मधेच फाटे फुटलेले दिसले म्हणजे जसा संदेह निर्माण होतो तसं जीवनात अनेकवेळा होतं. वाट पुसूं म्हटलं तर जवळपास तसा वाटाड्या कुणीच नसतो. फाटे फुटलेल्या ठिकाणाहून आपण जो मार्ग अवलंबू तो बरोबर असेल का ? दिशाभूल होऊन आपण कुठं भलतीकडेच जाणार नाही ? या द्विधा मनःस्थितीत असताना भोवऱ्यात सापडल्यासारखी स्थिती होते. परिस्थिती नेईल तिकडे जात राहायचं. परमेश्वरावर हवाला ठेवायचा. या खेरीज आपल्या हाती काहीच नसतं. इच्छित स्थळी व्यवस्थित पोहोचलो तर परमेश्वराची कृपा. नाहीतर आपलं दुर्दैव !

बाबांनी माझ्या जीवनात काही चमत्कार आणि काही साक्षात्कार घडवून आणल्यापासून बाबांवर माझी इतकी जबर श्रद्धा बसली आहे की जीवनमार्गात मी त्यांनाच माझा साथीदार बनवून टाकलं आहे. मार्गाला फाटे फुटले, दिशाभूल होण्याचा प्रसंग निर्माण झाला की मी बाबांनाच वाट पुसतो. ते दाखवतात त्याच वाटेनं बेगुमानपणे जाऊ लागतो आणि इच्छित स्थळीच हमखास पोहोचतो. बाबांना विचारून अवलंबिलेला मार्ग चुकीचा असूच शकत नाही याची खात्री असल्यामुळं तो आक्रमीत असता मनात कसलीच धागधुग नसते. उलट ती वाटचाल अतिशय प्रसन्न मनानंच होत राहाते.

आमच्या घरी धुणं भांडी वगैरे काम करणारी मोलकरीण अतिशय सालस आणि तितकीच इमानी. काम नीटनेटकं आणि मन लावून करणारी आणि कुठल्याही वस्तूला कधीही हात न लावणारी. दुपारी कधी कुठं घराबाहेर जायचं असलं तर शेजाऱ्यांजवळ घराची किल्ली ठेवून आम्ही खुशाल निघून जायचो. किल्ली ठेवायचो ती मोलकरणीसाठीच. आमच्या गैरहजेरीत ती यायची. शेजाऱ्यांकडून किल्ली घ्यायची. आपलं काम उरकल्यावर पुन्हा कुलूप लावून किल्ली शेजाऱ्यांकडे ठेवून निघून जायची. पण कधीही इकडची वस्तू तिकडं झाली नाही.

अशा या आमच्या इमानी मोलकरणीला पैशांची जरूर पडली. तिनं आमच्या जवळ पाचशे रुपयांची मागणी केली. तिच्या मुलीच्या लग्नासाठी तिला पैसे हवे होते. दरमहा पन्नास रुपये देऊन ती आमच्या पैशांची परत फेड करणार होती. मी विचारात पडण्याचं पाहून ती म्हणाली–

'माझ्याजवळ एकांदा सोन्याचा डाग असता तर त्यो इकून म्या पैसं उभं केलं असतं. पर योक ह्या डोरल्या शिवाय दुसरं काय बी नाय. हे डोरलं मी तुमा जवळ ठिवते. तुमचं समदं पैसे फिटलं म्हंजी परत द्या डोरलं '

मी अधीकच विचारात पडलो.

'लक्ष्मी, तू उद्या ये. उद्या सांगतो नक्की.'

लक्ष्मीचं डोरलं ठेवून घेऊन तिला पैसे देणं आम्हां पतिपत्निंना योग्य वाटत नव्हतं. तिला तिच्या मुलीच्या लग्नासाठी मदत उरायलाच हवी या बद्दल आम्हा उभयतांमध्ये दुमत नव्हतं. शे पन्नासाचीच बाब असती तर प्रश्न नव्हता. पण पाचशे रुपयांची मागणी म्हणजे विचार करायला लावणारीच गोष्ट होती. आता आमच्या पुढं प्रश्न होता तो–डोरलं ठेऊन घेऊन पैसे द्यावेत का केवळ विश्वासावरच द्यावेत ! रात्री झोपेपर्यंत आम्ही कुठल्याही एका निर्णयाप्रत पोहोचू शकलो नाही. सकाळी उठल्यावर मी दोन चिठ्या लिहिल्या. एकीवर लिहिलं ' डोरलं ठेवून घ्यावं ' दुसरीवर लिहिलं 'केवळ विश्वासावर पैसे द्यावेत.' बाबांच्या तसबिरीपुढे दोन्ही चिठ्या घडी घालून ठेवल्या. बाबांना म्हटलं 'बाबा, तुम्ही द्याल तो निर्णय शिरसावंद्य' पत्नीला बोलावलं म्हटलं–'उचल यातीला एक चिठ्ठी' पटकन् तिनं एक उचलून माझ्या हातात दिली. चिठ्ठी होती–' केवळ विश्वासावर पैसे द्यावेत.'

मी पैसे दिले. लक्ष्मीच्या मुलीच लग्न पार पडलं. तिला आहेर म्हणून पन्नास रुपये आम्ही वेगळे दिले. बाबांनी निर्णय दिला तो इतका बरोबर की लक्ष्मीनं दरमहा पंचवीस रुपये न चुकता प्रामाणिक पणे दिले. आमच्याकडून मिळणारा पंचवीस रुपये पगार तिनं दहा महिनेपर्यंत घेतला नाही आणि अशाप्रकारे आमची परतफेड पूर्ण केली.

आम्हाला फिकीर मुळीनाही–आमुचा काटाळ्या साई !

★

# श्रीसाईबाबा आणि सुटकेस

—श्रीमती मथुराबाई हिवारे एम. ए.
घर नं. १–८–२५ सिंगारबाग
बीदर ( कर्नाटक )

● १९७८ सालची जानेवारी उजाडली अन् आम्ही शिरडीस प्रस्थान केले. त्यानंतर दोन वर्षांत बाबांच्या चमत्काराचे आणि प्रचितीचे अनेक अनुभव पाहावयास मिळाले. आम्हा सर्वांना शिरडीचे वेडच लागले. शिरडीची बस जरी दिसली तरी तिच्याकडे आम्ही आदराने, आत्मियतेने पाहात असू असेच एकदा माझे पती शिरडीस आम्हाला कोणालाही न नेता एकटेच गेले. बाबांचे दर्शन घेऊन, पुष्कळसा प्रसाद व मोठाले सहा बाबांचे फोटो ( फ्रेमसहित ) घेऊन आपल्या गावी परत निघाले बसमध्ये सुटकेस, फोटो वगैरे वर ठेऊन स्वतः सीटवर बसले. नगरच्या बसस्थानकावर बस थांबली व हे लघवीसाठी खाली उतरले. त्याचवेळी एक चोर ह्यांची सुटकेस घेऊन बसमधून खाली उतरत होता व हे लगबगीने वर चढत होते. पण सुदैवाने व बाबांच्या कृपेने ह्यांची नजर सुटकेसकडे गेली व हे झटकन त्या चोराला पकडून हटकले ' ए ही सुटकेस का नेतोस ? '. तेव्हा तो चोर हमाल असल्याचा बहाणा करून ही सुटकेस साहेबांची असे म्हणून खोटेच साहेब, साहेब म्हणून ओरडत पळकाढू लागला. पण बाबांनी ह्यांना अशी कांही स्फूर्ति दिली की ते त्याच्या शर्टाला धरून ' कोणरे तुझा साहेब ' म्हणून हिसका देताच ती सुटकेस थांबल्या जागीच टाकून त्याने पळ काढला व ह्यांची सुटकेस ह्यांना परत मिळाली म्हणण्यापेक्षा ती बाबांनी मिळऊन दिली असे म्हणणे योग्य होईल. कारण ह्यांचा स्वभाव फारच विचित्र आहे. जर ती सुटकेस गमावली असती तर ते घरी परतलेच नसते, व मिळेपर्यंत भटकले असते. पण बाबा आपल्या दरबारी येणाऱ्या भक्तांची काळजी घेतात हेच खरे व अशा प्रसंगामुळे भक्त अनंत उपकाराच्या जाणीवेने नत मस्तक होतात हेच खरे.

अनंता तुला ते कसे रे स्तवावे ।
अनंता तुला ते कसे रे नमावे ॥

# माझ्या जीवनातील साक्षात्कारी अनुभव

–श्री. वसंत वामन प्रधान
श्री गणाधिराज को. ऑ. हाऊसिंग सोसायटी,
बि. नं. २, ब्लॉक नं. ९२
मिठागर रोड, मुलुंड ( पूर्व ) मुं. ४०००८१

● सत्तेचाळीस सालावीक ही घटना. त्यावेळी सर्वसामान्य प्रवासी (खाजगी– वैयक्तिक मोटारी वगळता मुंबईहून शिरडीला रेल्वेनेच प्रवास करीत असत. मुंबई ते मनमाड व मनमाड ते कोपरगाव असा रेल्वेचा जो आजही उपलब्ध आहे, तोच केवळ प्रवास करावा लागे, कारण एस.टीच्या बसेस त्यावेळी नव्हत्या. मनमाड ते शिरडी किंवा कोपरगाव ते शिरडी असा खाजगी बस वाहतूकीचा प्रवास असे. शिरडीहून रतीचा प्रवास करतेवेळी रहाता या गावाच्या दिशेकडून येणारी खाजगी बस शिर- डीच्या सडकेवर उमे राहून गाठावी लागे. क्वचित प्रसंगी येणारी बस जर संपूर्ण रलेली असेल तर मात्र बैलगाडीनेच प्रवास करावा लागे किंवा टांगे मिळत. त्या ळापर्यंत पूर्वी बरीच वाटमारी एकटा दुकटा प्रवासी गाठून होत असे. कधी कधी टमारी करणारे शस्त्रधारी असत. एकूण दिवस मावळल्यावर टांगा किंवा बैलगाडीने वास करणे सुरक्षित नसे. हे विस्तृत विवेचन करण्याचे कारण ह्या अशा प्रवासाचा बंध मी लिहित असलेल्या घटनेशी असल्यामुळे त्याची पार्श्वभूमी समजणे आवश्यक. वी कोपरगावातून शिरडीकडे जाणारी सडक गोदावरी नदीच्या पात्राजवळ उतरती वून नदीच्या पात्रात अगदी कंबरभर पाण्यावर दगडी पूल वाहतूकीकरता होता व वसाळयात जेव्हा नदीला पूर येई तेव्हा तो पूल पाण्याच्या किती खाली असेल हे गणे कठीण आहे. कारण नदीवरील प्रवासी वाहतूक बैल, म्हशी, गाड्या, साय- ली, सुद्धा मोठ्या तराफ्यातून होत असे. त्याला मोठा लोखंडी पिळदार साखळदंड से व दोन्हीकडील किनाऱ्यापासून बस वाहतूक होत असे. कोपरगावच्या गोदावरी दीचे पात्र ओलांडल्यावर शिरडीच्या दिशेकडे जाणाऱ्या सडकेवर बरेच अंतर ल्यांनंतर अगदी सडकेच्या कडेला लागूनच एक कोनाडेवजा परंतु फार उंच असे शांबरी देवीचे मंदीर आहे व ते ठिकाण अत्यंत निर्जन असे. ( अलीकडील नवीन झाल्यापासून रस्त्याचे वळण बदलले आहे व प्रस्तुत लेखकाला सांप्रतच्या नव्या व्यतिरिक्त परिस्थितीची कल्पना नाही. ) आतील देवीची मूर्ती फारच उंच भव्य सुंदर आहे त्या देवीच्या ठायी माझे मन आकर्षित झाले व जाता येता मी मनो- भावे नमस्कार करीत असे.

एकदा मी, माझी मातोश्री, पत्नी, व मुले यासह शिरडीस गेलो असता दसऱ्याच्या उत्सवा नंतर आम्ही बैलगाडीने शिरडीहून संध्याकाळी कोपरगाव स्टेशनकडे निघालो रेल्वेची गाडी मनमाडकडे जाणारी रात्री फार उशीरा असे. मनाची धारणा अशी होती की दिवस मावळण्यापूर्वी देवीच्या देवळाजवळ गाडी पोहोचली की देवीचे दर्शन घेवून पुढे स्टेशनकडे मार्गस्थ होवू. परंतु प्रत्यक्षात बैलांच्या फार हळू चालण्यामुळे रस्त्यात देवळाजवळ जाण्यापूर्वीच काळोख पडला व काही दिसेनासे झाले गाडीवाला सराईत असल्यामुळे धिमे धिमे गाडी हाकीत होता. आपल्याला आता काळोखात देवीचे दर्शन होणार नाही म्हणून मन निराश झाले कारण माझ्या कल्पनेप्रमाणे सांजवातसुद्धा वाऱ्यापुढे टिकणारी नव्हती कारण देवळाला फक्त तीन भिंती होत्या दरवाजा नव्हता. दरम्यान गाडीवाल्याबरोबरच्या संवादात तो वाटमारीचे भयप्रद वर्णन सांगू लागला व आम्हाला देवीच्या दर्शनाची निराशा व प्रवासातील भीती याने मन व्याप्त झाले. आम्ही सर्वांनी श्रीसाईबाबांचा धावासुरु केला, गाडी देवळाच्या आसपास आली व आम्हाला रस्त्याच्या मधोमध पाच सहा मोठे आडदांड उंच पुरुष अगदी पांढरा शुभ्र पोषाख इतका सफेद की धोब्याकडील परीट घडीचे कपडे असावेत असे वाटले. काळोखात पांढरे पोषाख उठावदार दिसले. ते सर्व गाडीवाल्यापुढे येवून थांबले व गाडी अडविली, आमच्या अंगाला दरदरून घाम सुटला. त्यातील एकजण माझेजवळ येऊन म्हणाला बाईजखाली उतरा व देवीला दिवा लावा. मला काहीच अर्थबोध होईना व गाडीवाला सुद्धा म्हणाला साहेब जरा थांबू या मनाचा समतोल सांभाळून मी खाली उतरलो, व त्या माणसाने गोडेतेलाची बाटली व काड्याची पेटी पुढे केली, ते घेऊन मी देवीच्या पुढील दगडी द्रिव्यात तेल ओतले नुकतीच विझलेली वात होतीच ती मी प्रज्वलीत केली. पुढे लगेच दुसरा मनुष्य हातात नारळ घेऊन पुढे आला व म्हणाला दादा देवीला नारळ फोडा व प्रसाद वाटून घ्या त्या म्हणण्याप्रमाणे मी नारळ फोडला देवीला थोडे खोबरे अर्पण केले व मी थोडे घेवून बाकी सर्व त्याना देवूकेले त्यावर तो म्हणाला एक कवड तुम्ही घ्या हे सर्व आटोपल्यावर मी त्याना विचारले तुम्ही दिवा का लावला नाही त्यावर ते म्हणाले असे कसे होईल आम्ही हरीजन लोक आम्ही देवळात कसे जाणार असे म्हणून व सुहास्यमुद्रेने राम राम म्हणत ते निघून गेले. आम्ही शिरडीहून निघते वेळी देवीच्या दर्शनाची अपेक्षा ठेवली होती, परंतु देवीला नारळ किंवा तत्सम असे काहीच घेतले नव्हते केवळ नमस्कारच करून जाणार होतो. परंतु साई माऊलीचे संकल्प पुरे करण्याकरिता हरिजन रुपात ती नटली व देवीजवळ दिवा लावून घेतला आणि वर प्रसादाला नारळ दिला. प्रकाशाशिवाय देवीचे दर्शन कसे घेऊ शकलो असतो. देवीचे दर्शन रिक्त हस्ते घेणे योग्य नव्हते याची मला जाण दिली. काळोखात शुभ्रपांढरा पेहराव उठावदार दिसला. हातात बाहजूक काठी घेतलेले

धिप्पाड हरीजन माझी मार्गप्रतीक्षा करणारे माझ्या जीवनाच्या अंतीम प्रवासात मला साथ करतील काय? श्रीसाईनारायणा तुला ओळखण्याचे मला ज्ञान नाही. बुद्धीला अगम्य असा तू टांगेवाला, टांगा, घोडे, आणि फराळासहीत. बापूगीर गोसाव्याला नाना साहेब चांदोरकराकडे नेलेस व संकट निवारण केलेस–साईसतचरित्र अध्याय ३३ पुढील ओव्या–वाटेल तैसावेषघेती ॥ मानेल तेथे प्रकट होती ॥ भक्त कल्याणार्थं कुठेही फिरती ॥ शिष्यभावार्थी पाहिजे ॥ १४० ॥

जगच्चालक श्रीसाईसमर्थामाझी एकच विनंती मला मार्ग दाखवा

# साईंनी नोकरीस लावले!

–श्री. निळकंठ सां. हामंद
५३, ३ रा कामाठीपुरा,
मुंबई ४०० ००८

● मी एक साईभक्त आहे. जवळ जवळ गेल्या ३२ वर्षांचा माझा साई-भक्तीचा परिपाठ आहे. बाबांनी मला जवळ केले आहे अशीच माझी भावना झाली आहे. ती जशी त्यांच्यावरील भक्तीपोटी आहे तशीच आलेल्या काही अनुभवामुळे आहे.

हे अनुभव आहेत. माझा दोन नंबरचा मुलगा चि. प्रदीप याच्या बाबतचे १९५५ साली मी सहकुटुंब बाबांच्या दर्शनासाठी शिर्डीला आलो होतो. चि. प्रदीप फार तर वर्षभराचा असेल. तेवढा असतानाच त्याच्या आईने त्याला बाबांच्या पायावर घातले. तेव्हा ते केले ते बाबांच्यावरील आमच्या निश्चल भक्तीमुळेच. या मुलाच्या पुढच्या आयुष्यात त्याला काही अडचणी उद्‌भवणार आहेत आणि बाबा त्या अडचणीतून त्याला पार व्हायला सहाय्यभूत होणार आहेत असं आमच्या मना-तही यायचं कारण नव्हतं. चि. प्रदीप ११ वीत पोचला आणि शिक्षणाच्या महत्वाच्या वर्षीच त्याचं अभ्यासातून लक्ष उडालं. आम्ही समजावून सांगण्याचाही उपयोग होईना ज्योतिषशास्त्राचा काही आधार घेण्याचा प्रयत्न केला, तर अधिकच निराशा पदरात

पडली. चक्क त्या मंडळींनी त्याच्या शिक्षणात खंड असल्याचे सांगितले. तेव्हा शेवटचा प्रयत्न म्हणून आम्ही साईबाबांना मनापासून साकडे घातले व त्याला योग्य तो मार्ग दाखविण्याची त्यांना विनंती केली. परिणामी दुसऱ्या वर्षी त्याने फॉर्म भरला. परीक्षेपूर्वी १५ दिवस मनापासून अभ्यास केला आणि तो दुसऱ्या वर्गात पास झाला. आमचे सर्व उपाय हरले पण साईबाबांनी मात्र त्याला सावरले असाच या अनुभवातून निष्कर्ष काढावयाचा नाही का !

त्यानंतर त्याने पुढचे शिक्षण नाकारले. तेव्हा त्याच्या एका मित्राने पंच ऑपरेटरचा कोर्स करण्यास त्याला सांगितले. व त्याने तो केला. त्याच्या मावशीच्या आग्रहानुसार नोकरीसाठी अर्ज केला. अगदी सहज म्हणून एका साध्या कागदावर केलेल्या अर्जानेच त्याला नोकरी मिळवून दिली. आता याच्याशी साईबाबांचा काय संबंध असे कोणी म्हणेल. आमच्या पुरता तरी आहे. मला आठवतं नेहमीप्रमाणे १९७५ साली तेव्हा आम्ही बाबांच्या दर्शनासाठी शिर्डीस गेलो होतो. गुरुवारी बाबांची पालखी, आरती वगैरे सर्व कार्यक्रमात सहभागी झालो. समाधानाने झोपलो. आणि पहाटे स्वप्न पडले. मी माझ्या सौभाग्यवतीस तिथेच सांगितले. आम्ही घरी पोहोचलो त्याचवेळी चि. प्रदीप बाहेर निघाला असे दृश्य स्वप्नात मी पाहिले होते. त्या दृश्यात कुठे निघालास असे त्यास विचारता कामास निघालो असे त्याने उत्तर दिले. या स्वप्नाची मुंबईस पोहोचताच प्रचिती आली. दुसऱ्याच दिवशी सकाळी पोस्टमन आला. तेव्हा त्याने चि. प्रदीपच्या नावाचे पत्र माझ्या हातात दिले. ते पत्र म्हणजेच चि. प्रदीपने एका साध्या कागदावर नोकरीसाठी केलेल्या अर्जाचे उत्तर होते. त्यानंतर योग्य ती परीक्षा वगैरे होऊन त्याला दोन महिन्यात नोकरीही मिळाली.

म्हटले तर वरचे दोन्ही अनुभव इतरांच्या दृष्टीने योगायोग ठरू शकतील. पण मात्र आमच्या दृष्टीने बाबांची आमच्या कुटुंबावर उदार दृष्टी आहे अशीच आमची भावना आहे.

श्री साईबाबांस आमचे त्रिवार वंदन.

☆

# आर्त हाकेला बाबांनी ओ दिली

२६।

सौ. सुलोचना मधुकर जोशी
द्वारा म. ना. जोशी (खे ५७)
नानाजी शास्त्री वाडा, खरे टाऊन,
धरमपेठ, नागपूर.

● गुरुवार दि. १० जून १९८१ रात्री ११ ची वेळ. मोठा मुलगा मनोज (वय १८ वर्षे) पहिल्या झोपेतून बाहेर जाण्यासाठी उठला. उठताना छातीत दुखणे सुरू झाले. जाऊन आला तरी दुखतच होते. वाटले वायू-विकार असावा. शेकून दिले. दुखणे कमी होईना. हे घरी नव्हते. ११॥ वाजता हे एका सीमान्तपुजनावरून परत आले. १२ वाजता दुसरा दिवस सुरू होईल म्हणून बाईबाईने बाबांच्या सच्चरित्राचे नित्याचे वाचन (रोज एक अध्याय) संपवले. १२–१२॥ वाजले पण दुखणे वाढतच होते शेवटी नाईलाजाने डॉक्टरचे दार ठोठावले व एक गोळी घेवून आले. गोळी झोपेची होती. ११॥–२ वाजता झोप लागली. सकाळी ९ ला उठला तर दुखते म्हणतच. डॉक्टरकडे नेले. त्यांनी थंडी व सर्दीचे आहे असे निदान करून औषध दिले. दिवसभरात आराम नाहीच. संध्याकाळी त्यांनी पुन्हा औषध बदलले झोपेची गोळी दिलीच. तिने रात्री पुन्हा झोप लागली ! शनिवार उजाडला तो दुखणे कायमच. त्यात फरक नाही. पुन्हा डॉक्टरांनी तपासले, विचारले व्यायाम वगैरे एकदम सुरू केला काय ? तो म्हणाला गुरुवारी सायंकाळी रोमन रींगवर लोंबकळताना उजवा हात निसटला व झटका बसला होता पण त्याचा त्रास झालाच नाही झोपी जाई पर्यंत ! निदान बदलले. ' डायफ्रॅमच्या स्नायूला झटका बसला आहे ' बरे वाटेल हळूहळू. (Muscle catch म्हणतात त्याला). औषध, शेकणे, मलम लावणे सुरूच होते. काहीच आराम पडत नव्हता म्हणून दुपारी हे आपल्या मित्राकडे गेले. ते होमियोपॅथ आहेत. त्यांचे पण म्हणणे पडले की (Muscle catch) निदान योग्य आहे. त्यांनी औषध योजना सुरू केली. रात्रीपासून आराम नाहीच उलट दुखणे वाढतच गेले. झोपेच्या गोळीने डोळयावर सतत झापड व ओळख पटणेही कठीण होवू लागलेले. रविवारी दुपारी होमियोपॅथ घरी आले व पूर्वीच्याच निदानाची पुष्टी केली. रात्री त्यांनी एक औषध दिले. झोपेची गोळी बंद केली. वेदनांची तीव्रता बघवेनाशी झालेली दुपारपासूनच. रात्री ते आणखी वाढले.

रविवार आषाढी एकादशी त्याचा वाढदिवस! पण वेदनांनी सगळेच त्रस्त होतो. उदी व बाबांचा धावा सुरवातीपासून सुरूच होते. मध्यंतरी 'मन चिंती ते वैरी न चिंती' प्रमाणे अंगारे धुपारे पण केले. रविवार-सोमवार मध्य रात्री तर त्याच्या वेदना असह्य होत्या. रात्रभर डोळ्याला डोळा नव्हता. एकीकडे त्याची निरर्थक समजावणी व एकीकडे बाबांच्या पायाशी रडणे ह्यातच रात्र संपता संपेना. पहाटे ३॥–४ वाजता त्याचा किंचित डोळा लागला तेव्हा स्वप्नात त्याची आजी (माझी दिवंगत सधवा आई) फोटो रुपात दिसली व म्हणाली, 'आई जवळ आहेना, घाबरु नकोस, सगळे बरे होईल.' लगेच जाग आली. तो भीत होता. त्याने स्वप्न कथन केले. अगोदर दोन्ही रात्रीं पण आजीचा फोटो स्वप्नात फक्त दिसला होता. भीती वाटत होती की आजीने आपल्याला पाहीलेही नाही व मग स्वप्नात दिसते का! आम्ही त्याला समजावले की ती देवरुपच आहे. तिने सांगितले की सगळे बरे होईल म्हणुन. मग आता बरे वाटेल. काळजी करू नकोस. पण तो घाबरतच होता. इकडे त्याचवेळी मला त्याच्या पायथ्याशी त्याच्या उजवीकडे कोपऱ्यात शुभ्र पांढऱ्या वेषातील श्री बाबांची उभ्या मूर्तीचे (सुर्योदयाच्या तांबूस ढगांच्या पार्श्वभूमीसह) दर्शन घडले. एकदम हायसे वाटले. त्याचा पुन्हा डोळा लागला व आम्ही सकाळ झाली म्हणुन भराभर एकेक काम उरकू लागलो. ८ वाजता तो उठला. जरा बरे वाटते म्हणाला. आम्हालाही बरे वाटले. होमियोपॅथीच्या ६–७ मात्रा, अजून पोटात जायच्या होत्याच दिवस भरात! ९ ला पहिली मात्रा दिली. दुखणे वाढण्याची कुरकूर सुरु झाली. त्याचा विश्वास ढळू लागला. काही बाही बोलू लागला. कसे होईल? सकाळी १०॥ वाजता २ री मात्रा दिली. दुखणे बळावतच चालले. रात्रीचीच तीव्रता पुन्हा जाणवू लागली. १२–१२। वाजता ३ री मात्रा द्यायची होती. वेदनांनी कहर सुरू केला. त्याचे वडील घरीच होते. म्हणाले होमियोपॅथला ही परिस्थिती सांगून येतो. त्यांचा विचार घेतो औषध बदलायचे की चिकित्सापद्धतच बदलायची, किंवा आणखी वेगळे काही करायचे वगैरे. नंतरच १२। ची मात्रा ते म्हणतील ती देवू. असे म्हणून ते २०-२५ मिनिटात येतो म्हणून ११॥। ला त्यांच्या कार्यालयात त्यांना भेटायला गेले.

पाऊस होताच. इकडे १२॥ वाजता दुखण्याची पराकाष्ठा झाली. काय करावे सुचेना. दवाखान्यात भरती करावे की काय? नाना विचारांचे थैमान मनात सुरू झाले. हे घरी नाहीत काय होईल? तिकडे त्यांची वेगळीच मनःस्थिती. मित्र कार्यालयात नाहीत. सुटीवर आहेत, म्हणून मग त्यांच्या घरी गेले. तर घराला भले मोठे कुलुप. सगळीच निराशा! बिचारे!! बाबांचा मनोमन धावा करीत घराकडे परत लागलेले!! १ चा अंदाज होता. वेदना असह्य होत्या. कळवळणे विव्हळणे पाह-

वत नव्हते. सुचेना काय करावे. त्याला थोडे ओंजारणे गोंजारणे व कधी कधी रागावून शांत करणे (मनाविरुद्धच!) सुरू होते. वेळ जाता जात नव्हता. वडील घराच्या वाटेवर होते.

इतक्यात शेजारी रेडिओवर गाणे लागले, 'साईबाबा बोलो ऽऽ' त्याच्या आवडीचे गाणे! मी म्हटले बघ तुझ्या आवडीचे बाबांचे गाणे लागले आहे म्हणतो का तू? बाबांचे नाव घे दुःख कमी होईल. पण फायदा नव्हता. त्याच वेळी इकडे मी बाबांशी (फोटोशी) बोलू लागले. (मनोमन) भांडू लागले, 'तुम्ही सगळ्यांच्या मदतीला धावून जाता, सगळ्यांचे चांगले करता, आम्हीच मग काय गुन्हा केला म्हणून आम्हाला असा त्रास देता, भाऊ मानते मी तुम्हाला. तुम्ही बहिणीला असा त्रास देता?' त्याने मांडीवर मान ठेवली होती माझ्या. भांडण सुरूच होते. गाणे वाजतच होते. मी अगदी चिडून गेली होती. त्याला मांडीवरून ढकलून दिले व बाबांना म्हणाली, 'न्यायच आहे नं त्याला तुझ्या मनात मग आता माझ्या समोरून घेऊन जा. मी इथेच बसली आहे. सगळी दुःख दाखविलीस हेही दाखव. दाखवायचं असेल तर! होऊन जाऊ दे तुझ्या मनासारखं!! गाणे संपत आले होते. शेवटचे कडवे सुरू होते.

आऽऽणि काय लीला बाबांची! त्याला प्राणांतिक कळ आली. हात पाय मान डोकं अगदी ताठ झाले. छाती झटक्याने वर उचलली गेली. जवळजवळ फूटभर वर उचलली गेली. डोळे, चेहरा, लाऽऽल झाले होते. तोंडाने तो अगतिक ओरडला, 'साऽईऽबाऽऽबा!' मी त्याच्याकडे पाहायला वळली मनात चऽऽर्र झालं. वाटलं जे होवू नये ते शेवटी झालेच! संपलं सगळं! त्याला आता सरळ करावं म्हणून डोक्याखाली हात घातला व उचलायला गेली तो, तो मला एकदम बिलगला व म्हणाला, आई! मी बरा झालो. माझं दुखणं संपलं. मला काही होत नाही. मी उठून दाखवतो. तो ताठ उठून बसला! हात पाठीकडे नेवून दाखवले. काहीच त्रास नव्हता. माझा आनन्द!...वर्णन काय करू? भाऊ शेवटी धावून आला होता. वेड्या बहिणीवर दया केली होती त्याने! मी स्वतःला दोषी ठरवू लागली! उगीचच मी त्याला दोष लावला. त्याच्याबद्दल शंका घेतल्या. वाईट वाटत होतं. मुलगा परत मिळाल्याचे अश्रु डोळ्यातून वाहत होते तेवढयात त्याचे वडील घरी पोहोचले. पुढे काय वाढून ठेवले आहे ह्या चिंतेत! पाहतात तो सगळेच अघटित. डॉक्टर भेटले नाही कारण डॉक्टरांची जरूरच नव्हती. डॉक्टरांचा डॉक्टर माझा माऊराया आपलं काम करून गेला होता. आम्ही मनोजला विचारलं, तू 'साईबाबा' म्हणालास, तेव्हा काय झाले होते तर तो म्हणाला की 'कोणीतरी आपल्या छातीतून काहीतरी ओढून

काढल्य व एकदम आराम पडला ! ' बाबा डॉक्टरच ते ! त्यांना प्रसंगी रोग्याच्या वेदनाकडे दुर्लक्ष करूनही वेदना असह्य होतील हे समजूनही वेदना मुक्तीसाठी करडा जीव करणे भागच होते ! त्यावेळची प्राणांतिक कळच आराम देऊन गेली !! गुरुवार ते सोमवार ५ दिवस तळमळणाऱ्या जीवाला एका क्षणात आराम पडला ! धन्य त्यांची किमया ! त्यांच्या शिवाय हे होणे नाही !

गाणे सुरू होण्यापासून संपेपर्यंतचे ३ मिनटाचे वर्णन करायला तरी वेळ लागला ! पण एक क्षण त्यांना पुरे होता ! बाबा तुमची लीला अगाध आहे. तुम्हीच वादळ निर्माण करता. मनाला श्रद्धेला हेलकावे देता. कसोटी बघता. चिड-वता व तुटायला लागले की सोडून देता. कसोटी पाहता ! बाबा आम्ही किती झालं तरी तुझीच लेकरं ! वर फेकता तेव्हा भीती वाटते. पडतो की काय ! धावा सुरू होतो. श्रद्धा ढळते. तोच अलगद झेलून घेता ! बाबा ! श्रद्धा कायम ठेवा ढळू देऊ नका सदैव आपलेच चरणाशी ठेवा ! आमच मन चंचल म्हणून प्रसंगी शंका कुशंका घर करतात पण तो आपल्या भक्ताला अंतर देत नाही. ' कृतांताच्या दाढेतून काढीन मी निजभक्ता ओढून ' हेच खरे ! बाबा अशीच कृपा ह्या बहीणीवर सदैव असू द्या ! हीच इच्छा !!

# श्रद्धेचा प्रभाव

—श्रीराम केशव जोशी
गोरेगावकर चाळ नं. १ खोली नं. २८
सेंट्रल सिनेमाजवळ मुंबई नं. ४

● मी श्री. श्रीराम केशव जोशी प्रथम २१–७–१९५३ रोजी श्रीक्षेत्र शिर्डी येथे गेलो. मला साधारणतः १८ ते २० वर्षे पोटात दुखणे, गॅस धरणे व कोणताही पदार्थ खाल्ला की तो अगदी आंबट होऊन २ तासात पोटात कुजून लगेच उलटी येई. आतापर्यंत ज्यानी ज्यानी जे जे डॉक्टर सांगितले ते सर्व उपाय करून हताश झालो. जीवाला अगदी वैतागून गेलो. मी शास्त्रीहॉलमध्ये स्वदेशी इलेक्ट्रिक क्लॉक कंपनीत २५ वर्षे नोकरी केली. आता मी घड्याळ रिपेरिंगची कामे स्वतःच घरी

करतो. कारण माझ्या या शारीरिक त्रासाने मला नोकरी करणे शक्यच नव्हते. माझे सौभाग्यवतीचे आजारात अडीच ते तीन हजार रुपये आतापर्यंत खर्च केले. आता ती बरी आहे. परंतु तापातच हात गेला आहे. आता मी मुख्य विषयाकडे वळतो. मी ह्या मार्गाला कसा लागलो ? मी पूर्वी जात्या नास्तिक होतो. आमचे मेहुणे विनायक रामचंद्र धैसास ह्यांचे मंडळींनी आमचे मंडळींना स्तवनमंजिरी वाचावयास दिली व तीहि आवडीने रोज वाचू लागली. परंतु त्याचा माझेवर काही परिणाम झाला नाही. नंतर ते एकदा आम्हाला वसईजवळ पापडीला सामंत म्हणून एक बाबांचे भक्त आहेत. तेथे स्वखर्चाने घेऊन गेले. त्याचे ते लिंबू वगैरे मंत्रतंत्र पाहून मनाला बरे वाटले नाही. नंतर वडाळ्याला एका फकीराकडे गेलो. तेथे सर्व तऱ्हेचे लोक जातात. त्यांचे अंगात संचार वगैरे होतो. तेथे गेलो. परंतु मला ते सर्व थंडलबाच वाटले. आणखी एक दोन अशी ठिकाणे मला लोकांनी सांगितली. परंतु ह्या बुवा लोकांवरून माझा विश्वास उडाला. कारण गुण मुळीच नाही. थोड्याच दिवसांनी धैसास यांनी दिलेल्या स्तवनमंजिरीवर माझी भावना वाढू लागली. ती मी वाचू लागलो. बाबांची तसबीर मी घरी आणली व पुजेला लावली. पुष्कळांनी मला शिर्डीला एकदा तरी जाणेस सांगितले. परंतु माझे मन गुण अजिबात नसल्याने पुन्हा विटू लागले. हणमंतराव ( माझे प्रिय मित्र ) यांनीहि मला शिर्डीस जाणेबद्दल फारच आग्रह करू लागले. आता सध्या मी शिर्डीला जाण्याच्या अगोदर एक वर्षे वरील गॅस, आम्लपित्त यांनी फारच बेजार व कमजोरही झालो होतो. मी मुंबईचे प्रसिद्ध डॉक्टर श्री. साठे यांचेकडे गेलो. त्यांनी मला फ्री तपासले व लवकरच मला जे.जे. हॉस्पिटलमध्ये ॲडमिट केले. शेवटी माझ्या पोटाचा रोग अल्सर ठरून ऑपरेशन करणेचे निश्चित झाले. माझे घरात जबाबदार कोणी नाही व पत्नीचा हात तापात गेलेला आहे. या सबबीवर मी ऑपरेशन पुढे ढकलले व डॉक्टरांचे सल्ल्याप्रमाणे वागू लागलो. नुसता भात व पेजेवर दिवस काढू लागलो. खर्च झेपेनासा झाला व शेवटी दूध व पेजही पचेनाशी झाली. काळजीने झोप नाहीशी झाली. मग शेवटचा उपाय शिर्डीस जाणेचा ठरला. पण जाणार कसा ? जवळ पैसा नव्हता. नंतर मी बाबांची मनापासून प्रार्थना करू लागलो की मला शिर्डीला आपल्या पायापाशी यायची फार इच्छा आहे. पण ते घडणार कसे ?

असेच काही दिवस गेले. एकदा श्री. महाडेश्वर यांचेकडेही मी असे बोललो. ते म्हणाले–तुमची इच्छा जर तशी मनापासून असेल तर तसे निश्चित घडेल. ते त्यांचे बोल थोड्याच दिवसात खरे ठरले. १ महिन्याचे आत मला कैवल्यधामचे एक रंगकाम मिळाले, व ठरविल्याप्रमाणे मी त्याचे पैसे मिळविल्यावर लोकांचे देणे दिले. नंतर दुसरे काम वनमाळी हॉल दादरचे मिळाल्यावर नक्की जाण्याचे ठरविले

ही वेळ माझ्या पैशाच्या दृष्टीने फारच भयंकर होती. आता जमणार कसे ? नंतर मी निर्धार केला. एका कामाचे ॲडव्हान्स पैसे आले व मी लगेच तसाच २१–७–५३ रोजी शिर्डीस निघालो. २२, २३ ला राहून २४ ला मुंबईत परत आलो. तेथे तेथे आषाढीचा उपास पडला. काय करणार ? कारण काही खाल्ले की रक्त पडेपर्यंत उलटी होई. परंतु आश्चर्य हे की तेथे दुपारी फराळ केला. मग भरपूर उदी पोटात घेतली. उलटी झाली नाही. नंतर एक मित्र भेटले. त्यांनी तर मला रात्री ११ आण्याचे जेवणाचे कुपन आणले, त्यांचे आग्रहावरून खूपखूप खाल्ले. उलटी होण्याची फार भिती वाटू लागली. सारखा उदी खाऊ लागलो. सर्व पचून सकाळी पुन्हा भूक लागली. सर्व व्यवहार पूर्ववत चालू आहे. बाबांची मनापासून प्रार्थना केली. त्यावेळचा माझा आनंद वर्णन करणे कठीण आहे. कारण १५–२० वर्षा-नंतर माझ्या पोटात अन्नाचा तो वास होता. जशी बाबांची इच्छा. हा आनंद माझ्या कुटुंबातील माणसाना मिळावा अशी प्रार्थना केली मी बाबांचेजवळ. ती त्यांनी ऐकलीही. तेव्हापासून पैशांची माझी चणचण बरा कमी झाली. सर्व खर्च भागून जर माझ्याकडे ७५ रु. शिल्लक राहिले तर मी सर्व मंडळींना घेऊन शिर्डीला येईन असे बाबांना मनोमन सांगितले. मग त्यांचे इच्छेनुसार १ महिन्याचे भर पावसात म्हणजे ११–८–५३ ला बाबा शेंबेकर व आम्ही सर्वजण निघालो. तेथे गोकुळअष्टमी दहीकाला वगैरे करून म्हणजे ५–६ दिवसानंतर परत आलो. माझी तब्येत जी पहिल्या खेपेला म्हणजे आषाढी एकादशीला सुधारली ती अद्यापपर्यंत चांगली आहे. नंतर मी बाबांचे पुण्यतिथीला ता. १६–१० ला निघून १७–१०–५३ ला पोहोचलो. (विजयादशमी) आता माझे सर्व ठीक चालले आहे. आर्थिक परिस्थितीत पूर्वीपेक्षा कितीतरी पटीने चांगली आहे. बाबांचे कृपेने सौभाग्यवती २८–१२–५३ ला पहाटे बाळंतीण झाली व मुलगी झाली. आता फक्त हात सुधारणेबद्दल बाबांची प्रार्थना करीत आहे.

★

# श्रीसाईबाबांची कै. नागेशराव सावंत कुटुंबियावर असलेली कृपा दृष्टी

—श्री. मनोहरपंत सावंत
उन्मेश ८२ क, प्रभादेवी रोड, वरळी मुं. २५

● आमचे वडिल कै. नागेशराव आत्माराम सावंत हे शिर्डी येथे सन १९२४ पासून नित्याने जात असत त्यांनी श्री. साईबाबांना प्रत्यक्ष पाहिले नाही. पण त्यांची बाबां विषयीची भक्ती अवर्णनीय होती. मी त्यांचा मोठा मुलगा व माझ्या नंतर आणखी दोन भाऊ व तिन बहिणी पैकी एक बहिण मी सुमारे १२ वर्षाचा असताना वारली माझा जन्म १९२४ चा असल्या कारणाने मला श्री बाबांच्या शिर्डी येथे जाण्याचा योग गेली ५७ वर्षे येत आहे. प्रथम वर्षातून एक वेळा दर दसऱ्याला जात असु गेली काही वर्षे वर्षातून अनेक वेळा शिर्डीला जाण्याचे पुण्य लाभते. श्रीसाईबाबांची आमच्या वडिलांमुळे आमच्या सर्व घराण्यावर अतिशय कृपा दृष्टी आहे. कै. नागेशरावांची श्रीसाईबाबा विषयीची भक्ती अतिशय नितांत अशी होती. पोलीस खात्यातील आपली अधिकाराची जागा सांभाळून प्रथम साईबाबा संस्थानचे कमिटी सदस्य त्यानंतर ट्रस्टी व शेवटी मॅनेजींग ट्रस्टी अशी पदे त्यांनी भूषविली.

माझ्या आयुष्यात श्रीसाईबाबांचे अनेक लहान मोठे अनुभव आले. त्यांची कृपा आमच्यावर किती आहे हे शब्दात उतरविलेच पाहिजे असे नाही व म्हणून आता पर्यंत माझे अनुभव कधीच कोणाला सांगितले नाहीत किंवा कोठे छापले नाहीत पण परवाच साईलीला मासिकाचे संपादक श्री. सदानंद चेंदवणकर यांची भेट झाली. मी त्यांना या पूर्वी पाहिल्याचे स्मरत नाही पण ते स्वतः म्हणून मला भेटण्यास आले असताना मला अतिशय आनंद झाला. जणु काय आमचे वडिलच मला भेटल्याचे समाधान लाभले. त्यांच्या भेटीमुळेच अलीकडे आलेला अनुभव छापावा असे वाटले.

माझा मोठा मुलगा हेमंत हा परदेशात एका इलेक्ट्रिक कंपनीत मुख्य इंजिनीअर म्हणून गेली ५ वर्षे काम करीत आहे. त्यांची पत्नी सौ. शोभा प्रथम बाळंतपणासाठी हिंदुस्थानात आली. दादर येथील एका खाजगी दवाखान्यात तिला प्रसूती-

साठी ठेवले होते वेळ संध्याकाळची मी माझ्या ऑफिसमधून परस्पर तेथे आलो माझी पत्नी, आमचे व्याही कष्टम ऑफिसर श्री. राणे त्यांची पत्नी वगैरे जवळची सर्व आप्त माणसे हॉस्पिटलमध्ये जमलो होतो. बराच वेळ झाला पण प्रसूती होईना काही अडचण झाली असावी असे वाटले. संध्याकाळचे ६ । वाजले मला काय वाटले कोणास ठाऊक पण श्री बाबांकडे दुर्लक्ष झाल्यासारखे वाटले. अशा अडचणीच्या प्रसंगी मी माझ्या पत्नीला घरी जाऊया असे म्हणालो. आमचे व्याही श्री. राणे यांना या माझ्या वागण्याचे आश्चर्य वाटले. कारण मुलीचे वडिलच ते मी त्यांना म्हटले भाऊ तुम्ही घाबरू नका मी घरी पोहोचल्यानंतर १५ मिनिटातच सौ. शोभा सुखरूप बाळंत होईल असे भविष्य मी वर्तविले त्यांनाही माझ्या या विधानाचे आश्चर्य वाटले.

हॉस्पीटल कडून, आम्ही जवळच राहातो. १० मिनिटातच आम्ही घरी पोहचलो स्नान केले व नेहमीसारखे संध्याकाळचे देवा समोरील निरंजन पेटवून श्रीसाई बाबांच्या चरणी प्रार्थना केली व निरंजन खाली ठेवले. पांचव्या मिनिटालाच हॉस्पीटल मधून घरी टेलिफोन आला की सौ. शोभा दोन तीन मिनिटापूर्वीच सुखरुप प्रसूत झाली व तिला मुलगा झाला. केवढा हा श्रीसाईबाबांच्या विषयीचा विश्वास व केवढी ही त्यांची कृपादृष्टी लगेच माझ्या मुलाला त्याला मुलगा झाल्याचे वृत्त बहारीन येथे कळविले. म्हणजे प्रसुत झाल्या पासून केवळ ४५ मिनिटातच ते त्यास समजले.

☆

## भाळी लाविता उदीचे टिळे । देखुनीया महाकाळ पळे ।

—सौ. शोभना दत्तात्रय लाड
१७८, वखारभाग सांगली.

● माझ्या मोठ्या मुलाच्या बाळंतपणाच्या वेळी मी अडले होते. तेव्हा मी बाबांना बोलले होते, "बाबा, यातून तुम्ही माझी सुटका केलीत तर होणाऱ्या बाळाला मी तुमच्या पायावर घालीन." बाबांच्या कृपेने माझी सुटका झाली. तेव्हा आम्ही खूप दिवस शिर्डीला जायचे योजीत होतो. पण योग येत नव्हता. शेवटी आम्ही एकदाचा हिय्या केला आणि स्पेशल गाडी करून शिर्डीला गेलो.

नवस फेडण्यासाठी हट्टाने मी शिर्डीला गेले खरी, पण बाबांना बहुधा ते पसंत नसाव किंवा तिथे त्यांची सेवा करताना माझ्या हातून काही तरी चुकले असावे. कारण तेथून आल्यावर मी आजारी पडले. माझा पाय दुखू लागला. औषधपाण्याबरोबर उदी घेतच होते, साई महात्म वाचन करीत होते. तरी बरे वाटेना. आज पर्यंत मी बाबांची पित्याप्रमाणे सेवा करीत होते आणि बाबा देखील नेहमी आमच्यावर संरक्षणाचे छत्र धरत होते. पण बाबा आता माझ्या बद्दल इतके निष्ठूर का झाले होते. कोण जाणे ! मी बाबांना सारखी विनवीत होते, " बाबा, आमचे काय चुकले ते आम्हाला दाखऊन द्या " त्यानंतर माझ्या मोठ्या मुलीच्या स्वप्नात येऊन बाबांनी 'नारळ दे ' असे सांगितले. नारळ दिल्यावर मला हळूहळू बरे वाटू लागले तोच माझा हात दुखू लागला. त्याला उदी लावल्यावर तो दुखायचा कमी आला. परंतु पाठोपाठ येणाऱ्या या आजारामुळे माझ्या मुलांची बाबांवरची श्रद्धा ढळू लागली. तेव्हा मी माझ्या मुलांना म्हणाले, " तुम्हाला आरतीतल्या त्या ओळी माहित आहेत ना, 'जया मनी जैसा भाव, तया तैसा अनुभव' त्यांच्या उदीचा औषध म्हणून केव्हा उपयोग होतो माहीत आहे ! श्रद्धा असेल तेव्हा ' त्यानंतर त्याचा साक्षात्कार लवकरच आला.

माझा हात बरा होऊन ८-१५ दिवस झाले असतील नसतील तोच माझे डोळे एकाएकी लाल झाले. कारण तर काहीच नव्हते. गुरुवारी डॉक्टरांकडे गेले पण डॉक्टर भेटले नाहीत. घरी आल्यावर आरती झाली. डोळ्यांवर उदी लाऊन मी झोपले. परंतु डोळ्यांची लाली कमी होईना. या काळात मी दोनदा डॉक्टरांकडे गेले. डॉक्टर भेटले नाहीत. शेवटी मी बाबांना सांगितले, " बाबा, तुमच्या उदीचे औषध असताना मला डॉक्टरांच्या औषधाची जरुरी नाही. " आणि मी त्यांना काढलेल्या निरांजनातील तेल सकाळ संध्याकाळ डोळयात घालू लागले वरुन उदी लावीतच होते. आणि काय आश्चर्य पहा ! बाबांच्या औषधामुळे आठच दिवसात माझे डोळे पूर्ववत झाले.

बाबांच्या उदीमुळे आमचे आजार पळून गेले. " भाळी लाविता उदीचे टिळे । देखुनीया महाकाळ पळे । " याची प्रचीती आली. ही सगळी बाबांचीच कृपा.

*

# साईचिया दासा........

—श्री. पां. वा. भुतकर
२३ । १६७५ अभ्युदय नगर,
काळाचौकी, मुंबई ३३

७ नोव्हेंबर ८० मधील एक उदास संध्याकाळ ! त्या दिवशी रात्री ७॥ वाजता अस्वस्थ मनाने कार्यालयातून घरी आलो. दुपारपासूनच थोडी चक्कर आल्यासारखे वाटत होते. कसेबसे थोडे जेवण घेतले व रात्री १०॥ च्या सुमारास डॉक्टराकडे गेलो. डॉक्टरांनी तपासल्यानंतर गंभीर चेहरा करून मला ताबडतोब रुग्णालयात दाखल होण्याचा सल्ला दिला. माझा रक्तदाब कमालीचा वाढला होता. नंतर आणखी एका डॉक्टरांचा सल्ला घेतला त्यांनीही रुग्णालयात दाखल होणे चांगले असा अभिप्राय व्यक्त केला.

रात्री ११॥ वाजता माझ्या एका मित्राला बोलाऊन घेतले. मी माझी पत्नी व मित्र असे तिघेजण टॅक्सीने के. ई. एम् रुग्णालयात गेलो. रुग्णालयातल्या डॉक्टरांनी आमच्या डॉक्टरांची चिठी पाहिली. रक्तदाब तपासला व रुग्णालयात दाखल करून घेतले त्यावेळी रात्रीचे साडेबारा वाजले होते. डॉक्टरांनी तपासून मला एक इंजेक्शन व गोळ्या देऊन स्वस्थ पडून रहाण्यास सांगितले.

दुसरे दिवशी माझ्या भाच्याला ही बातमी कळताच तो बहिणीसह रुग्णालयात हजर झाला व माझ्या हातात उदीची पुडी ठेवली. ती नंतर मी माझ्या उशीखाली ठेविली.

के. ई. एम्. रुग्णालयात मला वार्ड क्रमांक १२ मध्ये ठेवण्यात आले होते. मी तिथं असताना त्या वार्डातील एक दोन माणसं घरी दररोज मृत्युमुखी पडत असत हे पाहिल्यानंतर तिथं स्वस्थ चित्त वाटत नसे ! तिसऱ्या दिवशी माझ्या शेजारील कॉटवरील गृहस्थ माझे देखत तडफडत मरण पावला. त्या रात्री मला झोप लागलीच नाही. रात्रभर शेजारच्या कॉटवरील गृहस्थ नजरेसमोर येत होता. रात्री साधारणपणे २।। ते ३ च्या दरम्यान थोडीशी गुंगी आली. थोड्याच वेळात माझ्या डोक्यावर कोणीतरी हात ठेवला. मी मान वर करून पाहिले तोच साईबाबांची कृपाळू मूर्ती माझ्या डोक्यावर हात ठेवून बसलेली दिसली. त्यांचे डोळे कारुण्याने भरलेले होते. माझ्याकडे ते कृपाळू दृष्टीने पहात होते. मी त्यांना झटकन नमस्कार करतो न करतो तोच ते म्हणाले, 'अरे वेड्या, तू घाबरतोस कशाला ? हा काय मी तुझ्या उशाशीच बसून आहे !' लगेच मी जागा झालो त्याचवेळी माझ्या लक्षात आले की उदीची पुडी माझ्या उशाचीच आहे.

त्या दिवसापासून माझ्या दुखण्याला उतार पडला. साईकृपेने माझी तब्येत आता चांगली आहे. साईचिया दासा नसे भय चिंता !

# ....तरी मी धावेन भक्तांसाठी !

—श्री. दशरथ रामजी तळेकर
जे/९ मुकेश मिल कंपाऊन्ड
ना. भा. सावंत रोड, कुलाबा, मुंबई–५

● तो दिवस डिसेंबर महिन्यातील होता. ता. ३१ रोजी मी माझ्या घरी येण्यासाठी व्हि. टी. (बोरीबंदर) च्या बसस्टॉप वर बस ची वाट पहात उभा होतो. रात्रीचे साडेआठ वाजून गेले होते. बऱ्याच वेळानंतर १३७ नंबरची बस आली पण वारुळातील मुंग्यांच्या गर्दी प्रमाणे बस माणसांनी फुल भरलेली होती. मी उभा होतो त्या स्टॉपवर दोन-चार माणसे उतरली. परंतु कंडक्टरने आम्हा एकालाहि आत घेतले नाही. बेल मारून त्यांनी गाडी पुढे नेली. त्याबरोबर आम्ही दोन-चार प्रवासी बसच्या पाठीमागून सिग्नल पर्यंत धावत सुटलो. बस सिग्नल नसल्यामुळे उभी राहिली. आम्ही दोघे तिघे पटापट आत शिरलो. कंडक्टरने आम्हाला हेरले. तो गर्दीतून वाट काढीत दरवाजापर्यंत आला व आम्हाला खाली उतरण्यासाठी सांगू लागला. कंडक्टरच्या म्हणण्याप्रमाणे दोघेजण खाली उतरले. मी मात्र कंडक्टरला विनंती करीत व महत्वाची कामे सांगत बसमध्ये दरवाजातच उभा राहिलो. 'तुम्ही सुद्धा खाली उतरुन घ्या' हा सारखा घोशा कंडक्टरने लावला होता. मी माझ्या महत्वाच्या कामांचा पाढा कंडक्टरकडे वाचीत होतो. पण तो काही एक ऐकण्यास तयार नव्हता. दोघांची बोलाचाली चालू असतानाच सिग्नल मिळताच गाडी सुरू झाली. पुढचा बस स्टॉप आला तरी आमची बोलाचाली चालूच होती. शेवटी स्टॉप येताच मी कंडक्टरच्या म्हणण्याप्रमाणे खाली उतरलो.

स्टॉपवर उतरणारी माणसे सुद्धा उतरली. जवळ जवळ अर्धी बस रिकामी झाली. आता आपल्याला कंडक्टर निश्चितच बस मध्ये घेईल म्हणून आनंदात होतो. बस स्टॉपवर रांगेत उभी असलेली माणसे बस मध्ये चढली. त्यांच्या पाठोपाठ शेवटी मी सुद्धा बस मध्ये चढलो. परंतु मला बस मध्ये घेण्यास कंडक्टरने पुन्हा नकार दिला. आता मात्र मला चीड आली होती. मी त्याला म्हणालो, 'बसमध्ये अजूनहि बरीच जागा शिल्लक आहे मी आता स्टॉपवरुन नियमाप्रमाणे बसमध्ये चढलो आहे. रांगेतील सर्व माणसे चढल्यावर मी शेवटी चढलो आहे. आता मात्र तुम्ही मला घेतलेच पाहिजे. तरीही कंडक्टरने मला विरोध केला. आता मात्र मी जिद्दीवर आलो. मी बस मधून खाली न उतरण्याचा निर्णय घेतला, आणि मी, 'खाली उतरणार नाही तुम्हाला

काय करायचे ते करा' असे सांगून गप्प उभा राहिलो. गाडीतील इतर प्रवाशांनी कंडक्टरची समजूत घातली पण छे ! त्या अरेरावी कंडक्टरवर त्याचा काहीच परिणाम झाला नाही.

पाच दहा मिनिटे बस तशीच उभी होती. शेवटी कंडक्टरहि त्याचा हेका सोडायला तयार होईना. शेवटी त्यांनी ड्रायव्हरला बस तशीच फलटनरोड पोलिस स्टेशनला नेण्यास सांगितली. ड्रायव्हरने बस परत माघारी वळवून पोलिस स्टेशनला आणली. आम्ही सारेजण पोलिस स्टेशनला गेलो. मी माझी बाजू सब इन्स्पेक्टर बारगीर यांना सांगितली. मी पत्रकार आहे मला काही महत्वाच्या कामासाठी घरी लवकर जाणे अवश्य होते व बसमध्ये जागा असूनहि कंडक्टर बसमध्ये मला घेण्यास तयार नाही म्हणून सांगितले. कंडक्टरने आपली बाजू भक्कम करण्यासाठी इन्स्पेक्टर बारगीर ना सांगितले की 'यांनी मला मारण्याची धमकी दिली.' अशी पुस्ती जोडली. आता मात्र मला कंडक्टरच्या साफ खोटे बोलण्याची खूप चीड आली. मी लगेच रागाने म्हणालो, 'तुमच्या सारख्या खोटे बोलणाऱ्या व मग्रूर कंडक्टरना खरोखर पायाखालीच तुडविले पाहिजे. स्वतःच्या मालकीची बस समजूनच तुम्ही प्रवाशांजवळ अरेरावीपणा दाखविता. माझे हे रागाचे बोलणे ऐकून सब-इन्स्पेक्टरनी मलाच दम देण्यास सुरुवात केली. तुम्ही पत्रकारच खूप मग्रूर असता. वगैरे वगैरे...

नंतर त्यांनी कंडक्टरला जाण्यास सांगितले. मला दिड तास बसविल्या नंतर, 'तुम्ही २५ रु. डिपॉझिट भरा नाहीपेक्षा दोन दिवस आत मध्ये राहा.' असे सांगितले. मी सब इन्स्पेक्टरची खूप समजूत काढली पण व्यर्थ ! माझ्या जवळ फक्त दहा रुपये होते. घरुन पैसे आणावयास सांगण्यासाठी घरी संपर्क साधण्याचे कोणतेच साधन नव्हते. मित्रांना फोन करून सांगावे तर आपल्या इज्जतीचा सवाल. कारण 'पोलिस स्टेशन मध्ये जाणे' म्हणजे सर्वांच्या दृष्टीने कमीपणाची गोष्ट. हवालदाराने माझा हात पकडून 'पोलिस कस्टडीत' नेले. फलटन रोडमधील पोलीस कस्टडी म्हणजे अंधार कोठडीच. चारी बाजूंनी पूर्ण बंद. समोर फक्त एकच दरवाजा. तोहि बंद. आत हवा येण्यास भिंतीला छोटे झोक. आतली लादी काळपटलेली. कोपऱ्यात ठिकठिकाणी घाण साचलेली. या खोलीत आधीच चौदा पंधराजण मुक्कामाला होते. कोणी उघडे होते, कोणी लुंगी लावलेले होते. कुणी मारामाऱ्या करून आत आले होते. कोणी पाकीटमार होते. मी आत जाताच सर्वांनी माझ्याकडे नजर लावली. त्यांनी माझी आस्थेने चौकशी केली. रात्रभर मी बेचैन होतो. घरी कळविण्यास काहीच मार्ग नव्हता. शिवाय दुसऱ्या दिवशी सकाळी गुरुवार होता उद्या 'साईस्तोत्राचे वाचन' होणार नाही. या बेचैनीत रात्र जागून काढली. दुसऱ्या दिवशी सकाळी

नवीन वर्षाचा नवा दिवस उजाडला. या दिवशी कोर्ट बंद आमचा मुक्काम आणखी एक दिवस वाढणार म्हणून सकाळीच सांगण्यात आले. मी आणखी अस्वस्थ झालो. सकाळ विचारात गेली. दुपारी आम्हाला पलटन पोलीस स्टेशन मधून 'भोईवाडा' या मोठ्या कस्टडीत ठेवण्यासाठी गाडीने नेण्यात आले. आपण संध्याकाळपर्यंत नक्कीच मोकळे होऊ अशी मला दुपारपासूनच आशा लागली होती. भोईवाडा कस्टडीत गेल्यावर एका भिंतीवर कोळशाने 'साईबाबांचे चित्र' कुणीतरी रेखाटलेले होते. माझी नजर बाबांच्या त्या चित्राकडे गेली. मी बाबांकडे निरखून पाहिले आणि मी त्यांची मनोमन प्रार्थना केली की, 'बाबा! आज काहीही करून मला मुक्त करा. तुमची आज गुरुवारची पूजा व 'साईस्तोत्र वाचना'त खंड पडेल तेव्हा आज तर माझी सुटका झाली नाही तर मी तुम्हाला मानणार नाही.' असे मोठ्या निर्धाराने व निश्चयाने बाबांना सांगून टाकले. संध्याकाळ झाली, रात्रीचे नऊ वाजले. माझा साई-बाबां .वे विश्वास उडत '.लला होता. दहा वाजले आणि दोन हवालदार आमच्या खोलीच्या बाहेर हातात कागद घेऊन आले. त्यांनी चौघांची नावे वाचली. त्यात माझेही नाव होते. मी हरखून गेलो. भिंतीवरील साईबाबांच्या नजरेला एक नजर दिली आणि मनातून बाबांना नमस्कार करून मी कस्टडीच्या बाहेर पडलो.

तिथून आम्हाला पलटन रोड पोलीस स्टेशनला आणण्यात आले. नंतर माझी जामिनावर मुक्तता करण्यात आली. मी बाहेर आलो पण मी पोलीस स्टेशनमध्ये बंद आहे ही माहिती घरी समजली कशी? याचे मला आश्चर्य वाटू लागले. तेव्हा नंतर मला समजले की पलटन रोड पोलीस स्टेशन मधून सबइन्स्पेक्टरनी आमच्या विभागातील शिवसेनेचे माजी नगरसेवक श्री. जे. जे. पालव यांच्या घरी फोन करून तुमच्या कुलाब्यातील तळेकर नावाचे शिवसैनिक आमच्या पोलीस स्टेशनमध्ये अट-केत आहेत. त्यांना दोनशे रु. च्या जामीनावर सोडण्यात येईल असा निरोप देऊन ठेवण्यात आला होता. त्याचवेळी श्री. पालव यांना डिलाईल रोडहून आमच्या गावा-कडील एक सामाजिक कार्यकर्ते श्री. आत्माराम शिंदे भेटावयास आले होते. त्यांना माझे नाव समजताच जामीनावर सोडविण्याची सारी व्यवस्था त्यांनी केली. मला हे ऐकून फारच नवल वाटले. कारण मला बंद करणाऱ्या सब इन्पेक्टरनीच माजी नगर सेवक यांना फोन करून माझ्याबद्दल कळविले होते. ही सद्‌बुद्धी त्यांना अचानक कशी सुचली! याचे उत्तर एकच – 'साईबाबा.'

रात्री अकरा वाजता मी घरी आलो आंघोळ करून नेहमीप्रमाणे बाबांची पूजा करून साईस्तोत्राचे वाचन केले, व बाबांचे चिंतन करीत शांत मनाने झोपी गेलो. भक्तांनी मला भक्तीभावाने सांगितलेले काम मी कधी केले नाही असे कधी होणार

नाही असे बाबांनी म्हटले आहे ते उगाचच नाही. आजच्या परिस्थितीत सुद्धा साईबाबांच्या थोरवीची व संकटात भक्तांना मदत करण्याच्या परोपकारी वृत्तीचे अनुभव व प्रचिती लाखो भक्तांना लाखो वेळ येत आहे, व यापुढेही येत राहील यात तिळमात्र शंका नाही. ' जरी हे शरीर गेलो मी टाकून तरी मी धावेन भक्तांसाठी असे जे बाबांचे वचन आहे. ते वचन सत्य करण्यासाठी बाबा आजही भक्तांच्या हाकेला धावतात म्हणून बाबांना माझे लाख लाख प्रणाम ☆

# पूज्य बाबा मी आणि कन्याकुमारी

—सौ. प्रमिला मधुकर वखारे
१२।२१२ बी. पी. टी. स्टाफ क्वार्टर्स
रेनॉल्डस रोड, वडाळा, मुं. ३७

● गेल्या मार्च महिन्यातील पूज्य बाबांच्या प्रचितीची ही चित्त थरारक कहानी. अजूनही तो प्रसंग आठवला म्हणजे अंगावर शहारे येतात व भक्तीभावाने विनम्र होऊन बाबांच्या तसबिरीपुढे हात जोडून त्यांच्या चेहऱ्याकडे मी बघत बसते. जणू काही बाबा माझ्या मनाशी बोलत असतात. मार्च १९८० मध्ये यांच्या ऑफी-सने बी. पी. टी. ट्रॅव्हल क्लब नावाची नवीन प्रवासी संस्था सुरू केली व पहिली ट्रीप गितांजली नावाच्या नवीन लक्झरी बसने कन्याकुमारी, तिरूपती, उटी, पेरियारलेक अशी दक्षिण भारतातील जवळ जवळ ३०–३५ ठिकाणे व शहरे बघून ही सहल २१ दिवसांनी परत मुंबईस येणार होती. या सहलीला मला जाता येणार नाही याची मला पूर्ण कल्पना होती कारण दोन्ही मुलांच्या परीक्षा एप्रीलच्या पहिल्या आठवड्यात होत्या, आणि ही ट्रीप १३ एप्रील रोजी परत येणार होती. सहलीचे आयोजक श्री. गवाणकर यांचे मित्र असल्याने त्यांनी आम्हाला आग्रहाने येण्यास सांगितले. दक्षिण भारतात सर्व मोठ्या शहरात या सहलीसाठी उत्कृष्ठ जागा आरक्षित केल्या होत्या. सबंध सहल खूप मजेत व आनंददायी होणार होती. पहिलीच ट्रीप असल्याने आयोजकांनी खूप मेहनत घेतली होती. अर्थात्‌च या सहलीला जावं असं खूप मनात होते. लगेच मी बाबांच्या तसबीरी पुढे नम्रपणे प्रार्थना केली की बाबा तुमच्याशिवाय माझी नितांत श्रद्धा आहे. अशक्य गोष्टी तुम्ही शक्य करून दाखवता. माझ्या

मनातील स्वप्न खरं करून दाखवा मी अनन्य भावे तुमची सेवा करीन. यांची सहल २३ मार्चला निघणार होती. हे पण नाराज झाले. एकट्याने सहलीला जाण्यात मजा नसते. यांच्या मित्रांनी आधीच जागा रिझर्व्ह केल्यामुळे जागा भरल्या गेल्या बहुतेक जोडपीच जास्त होती. यांचे पण शेवटी शेवटीच जायचं ठरलं म्हणून शेवटची सीट मिळाली. मला सहलीला जायची इच्छा आहे हे माझ्या लहान दिरांना व जाऊबाईंना कळले. ते बदलापूरहून वडाळ्याला आले व म्हणाले विकास शुभांगिला आम्ही सांभाळू तुम्ही दोघे ट्रीपला जा. परंतु बसच्या जागा पूर्ण भरल्यामुळे आता जागा नाही असे त्यांना सांगितले. त्यांनाही वाईट वाटले. मनातल्या मनात मी बाबांना प्रार्थना करीत होतेच. भावजी व जाऊबाई आल्यामुळे मुलांचा प्रश्न आता सुटला होता. आम्ही परत येईपर्यंत ते मुलांना सांभाळणार होते. बाबांना मी कळकळीची विनंती केली की बाबा माझी मनोकामना सफल होऊ दे. माझं चित्त कशातच लागत नव्हतं सारखा बाबांचा धावा मनात करीत होते. कारण अशी सुवर्ण संधी पुन्हा मिळाली नसती. 'साईलीला' मासिकात हजारो भक्तांचे चमत्कारीक अनुभव मी वाचीत आले. अशक्य घटनाही बाबा शक्य करून दाखवतात. त्या कालावधीत बाबांवर माझी दृढ श्रद्धा बसली व बाबांनी माझी विनंती ऐकली. ट्रीप जायच्या आदल्या दिवशी संध्याकाळी हे घरी आले ते आनंदाची बातमी घेऊनच. यांच्या शेजारच्या सीटवरील मित्राचं जाणं रद्द झालं होतं व एक सीट रिकामी झाली होती. यांनी लगेच ती रिझर्व्ह केली. मला ते ऐकून किती आनंद झाला हे शब्दात सांगता येणार नाही. माझ्या परमपूज्य बाबांनी माझी इच्छा पूर्ण केली होती. ट्रीप सुरू होऊन एकविस दिवसांनी परत येईपर्यंत बाबा आमच्या पाठीशी होते. त्यांचे अस्तित्व आम्हाला जाणवायचे माझा लहान बाळ राघवेंद्र पण ट्रीपला माझ्या जवळ होता. घाईघाईत बाबांच्या उदीची पुडी मी आरशावरच विसरले. औषधापेक्षा बाबांच्या उदीवरच माझी श्रद्धा आहे. पोट दुखणे, गरगरणे, मळमळणे इ. आजारावर तात्काळीचा उपाय म्हणजे उदी. माझ्या बाळाला पोटात दुखायला लागलं. चालत्या बसमुळे त्याला त्रास होत असावा. मिस्टरांनी उदी पाण्यातून द्यायला सांगितली. पण मी ती पुडी घरीच विसरले होते. तेवढ्यात आमच्या बाजूचे श्री. दिक्षित यांनी मला बाबांची उदी दिली. श्री दिक्षित पतिपत्नी साईभक्तच निघाले. त्यांच्या सहवासात बाबांच्या कृपेने वेळ मजेत गेला. आमच्या गितांजली बसचे ड्रायव्हर श्री. बाबुराव पण साईभक्त निघाले. माझ्या मांडीवर बाळ आहे हे बघून ते मला म्हणाले ताई बाळाला मी पाठीमागे गादी टाकून देतो तिथे तो छान झोपेल. आमच्याच सीट मागे एक लहान गादी मावेल अशी छान जागा होती. तिथे माझा बाळ छान झोपायचा उठून बसला की मागच्या काचेतून गंमत बघत बसायचा. श्री. दिक्षितही

त्याला खेळवायचे. सर्वांना तो आवडायचा. लहान बाळ बरोबर असूनही मला त्याचा कसलाही त्रास झाला नाही. क्षणोक्षणी बाबा माझ्यावर लक्ष ठेवून होते असेच मला वाटते. तिरूपतीला पण श्री. बालाजीचे दर्शन मिळणे कठीण असते पण आम्हाला काहीही पैसे खर्च न करता अगदी शांततेने व छान दर्शन झाले. ट्रीपला कसलाही त्रास झाला नाही की गैरसोय झाली नाही. श्री. बाबुराव उत्कृष्ट बस चालक, बसमध्ये स्तोत्रे, आरत्या, अभंग आनंदी वातावरण यामुळे २१ दिवस कसे निघून गेले ते कळलेही नाही. माझ्या मनातील स्वप्न बाबांनी खरं करून दाखवलं. प्रवासातही बाबांच्या अस्तित्वाची जाणीव अनेकदा झाली. बाबांनी मला किती अनुभव दिलेत म्हणून सांगू ! एकेक अनुभवाची एक कथा होईल. कधीपासून हे लिहिण्याचं ठरवते आहे पण बाबांनीच आता हे लिहून घेतले. बाबांविषयी भक्ती भावाने लिहिणे ही सुद्धा सेवाच आहे. माझे मनोरथ पूर्ण केल्याबद्दल बाबांना कोटी कोटी प्रणाम !!

# बाबा एक किमया अनेक

—श्री. प्र. अ. पुराणिक एम. ए. बी. एड
देशमुखवाडी, कृष्णनगर धुळे–४२४००१

● एकदा एका नवसपूर्तीच्या निमित्तानं आम्ही श्री शिर्डीक्षेत्री साईबाबांच्या दर्शनास गेलो होतो. श्रीसाईंच्या दरबारात पूजा-अर्चा, अभिषेक श्री सत्यनारायण पूजन सर्व काही ठरविल्याप्रमाणे पूर्ण झाल्याने आम्ही सर्व खुश झालो होतो. नंतर आम्ही श्रीक्षेत्र साकुरी येथेही दर्शनास जाऊन आलो. दिवसभर देवदर्शनात आम्ही गुरफटून गेलो होतो...! शिवाय दिवसभराच्या भटकंतीने काहीसे थकूनही गेलो होतो. रात्री जेवणखाण आटोपून आम्ही नुकतीच कुठे अंथरूणाला पाठ लावली न लावली तोच शिर्डीच्या त्या चैतन्यमय परिसरात पुन्हा शहनाईचे स्वर घुमू लागले. शेजारतीची ती चाहुल ऐकताच देशाच्या कोनाकोपऱ्यातून आलेला भक्तौघ साईंच्या मंदिराकडे लगबगा जाऊ लागला. आई मला उत्साहाने म्हणाली, ' चलायच न शेजारतीला ? आपल्याला तरी पुन्हा कधी

असा योग येणार या कल्पनेने मी तत्परतेने म्हणालो, 'हो चल आई, तयारी कर चटकन' तेव्हा आमच्या बरोबर आलेल्या बहिणीला व मेव्हण्यांना मी म्हणालो, 'आपण ही चलताना' यावे की न यावे? अशा द्विधा मनःस्थितीत ते दिसताच मी त्यांना पुन्हा म्हणालो, 'ठीक आहे आपण थांबा,' कारण प्रसाद (माझा मुलगा) तेथे केव्हाच झोपी गेला होता. मी बहिणीला म्हणालो, 'मात्र प्रसादकडे लक्ष असू द्या त्याला काही आम्ही उठवत नाही' बहिण म्हणाली, 'ठीक आहे' एवढे बोलून मी व सौ. आई आम्ही शेजारतीला मंदिरात गेलो.

शेजारती आटोपून प्रसन्नचित्तानं आम्ही परत खोलीवर आलो. पाहतो तो काय! आमच्या कल्पनेप्रमाणे मेव्हणे व बहिण केव्हाच झोपी गेले असतील पण प्रत्यक्षात दिसले ते विपरीतच. बहीण बाथरूममध्ये कपडे धुताना दिसली तर मेव्हणे प्रसादकडे चिंतित पहात असलेले दिसले. मी काळजीनेच विचारले 'झाले तरी काय?' तेव्हा बहिण म्हणाली, 'दादा, तुम्ही दोघे आरतीला गेला न गेला तोच प्रसाद वांती करीत रडतच उठला. त्याला खूप मोठी मडाभड वांती झाली आम्ही दोघे तर घाबरूनच गेलो. आत्ताच कुठे तो झोपतोय. बहिणीचे ते बोलणे ऐकून मी प्रसादकडे पाहिले. त्याच्या अंगाला हात लावून पाहिले. तर कुठे घाम नाही की, वांती केल्याचे वा आजाराचे कुठले चिन्ह त्याच्या चेहऱ्यावर दिसले नाही. त्याला वांती मात्र सपाटून झाली होती हे मात्र निर्विवाद. कारण बाथरूम मधील कपडे व चादर खराब झालेले होते. मी विचार केला, भूकमोड वा दगदग याने कदाचित घडले असेल. मेव्हणे म्हणाले, 'आपण त्याला एखाद्या डॉक्टराकडे घेऊन जाऊ या' तेव्हा मी म्हणालो, 'तूर्त थांबा, ही उदी आणली आहे ही प्रथम लावू. वाट पाहु. पुन्हा काही झाले तर घेऊन जाऊ' त्याप्रमाणे मी ती श्रीसाईबाबांची बहुचर्चित उदी अत्यंत श्रद्धेने त्याच्या कपाळी व सर्वांगाला थोडी-थोडी लावली आणि मनोमन प्रार्थना केली, "बाबा, 'सब सुखदाता' आपणच आहात. आमच्या दिवसभराच्या आनंदावर विरजण पडू देऊ नका. हे संकट दूर करा. आमच्या प्रसादला बरे करा सुखी करा."

आणि काय चमत्कार तो जसा शांत झोपला होता. तसाच रात्रभर झोपून राहिला. सकाळी उठला तेव्हा देखील नेहमी प्रमाणे आनंदित! मी त्याला घडल्या प्रसंगाबद्दल विचारले, 'काय रे, काल रात्री तुला किती वांती झाली प्रवासात जास्त खा...खा करू नये! तेव्हा तो म्हणाला, 'दादा, मला वांती झालीच केव्हा? छे, तुम्ही काही उगीच सांगता मला काही झाले नाही.'

मी मनाशी तर्क केला. रात्री बहिणीने व मेहुण्यानी शेजारतीला येण्याचा जो कंटाळा केला. कदाचित त्या दरम्यान बाबांना त्यांना झोपू द्यायचे नसेल ? प्रसादच्या माध्यमातून बाबांनी त्यांची परीक्षा घेतली असावी, ते काहीही असो. बाबांच्या उदीने (रक्षेने) चि. प्रसादचे रक्षण केले हे निर्विवाद. रात्रीचा आजारी प्रसाद सकाळी हसत मुखाने बाबांचे दर्शन घेऊन प्रवासाला निघाला. आम्ही देखील ती आठवण घेऊन शिर्डीचा निरोप घेतला. बाबा एक किमया अनेक...!! हे अगदी खरे आहे. असेच म्हणावे लागेल.

# तुझ्या इशाऱ्याने साई....

—श्री. विजय द. हजारे एम. ए.
सी।६ गुंफादर्शन फर्स्ट कार्टर रोड,
बोरीवली (पूर्व) मुंबई ६६

● एप्रिल १९८१ चा शेवटचा आठवडा संपण्याच्या सुमारास एकाएकी मला बाबांचा कौल मिळाला की ' चल मंगलकार्य करायचं असेल तर उरकून घे. ' आणि मी आणि सौ. न एकदम ठरवून टाकलं की ' आशिषची मुंज करायची होती ना...मग आत्ताच करू या नव्हे तर करायचीच. ' वास्तविक कसली तयारी नाही की पूर्वयोजना नाही. त्यामुळे सगळीच धावपळ उडाली. ' मुहूर्त लागतो का ' पासून तो तारीख हॉल कॉन्ट्रॅक्टर सगळंच करायचं होतं. त्यामुळे सारं काही घाईतच उरकावे लागले. ना सगळ्या मित्रमंडळींना बोलाविता आले की ना सर्वांना प्रत्यक्ष भेटून आमंत्रण देता आले. पण बाबांना मात्र आमंत्रण दिले होते पहिले...म्हणून तर ते आले आणि म्हणूनच कार्य पार पडू शकले ! कसं ते पहा ना !

वास्तविक आशूच्या दोन्ही आज्या आजोबांची फार दिवसापासूनची इच्छा की ' तो दोन्ही घरातला हजारे आणि दांडेकरांचा पहिला नातू. त्याची मुंज तरी आमचे डोळे मिटायच्या आत व्हावी ' त्यामुळे त्यांची आमच्या सौ. च्या पाठी सारखी भुणभुण असायची. प्रत्येकवेळी काही ना काही अडचण असायची. शेवटी साईइच्छा ! ' बाबां 'ची आज्ञाच झाली एक प्रकारे म्हणा ती...म्हणून तर योगायोग

पत्रिका छापून घेतल्या आणि शिर्डीस आमंत्रणाला निघालो अचानक तो बाबांनी सोय केल्याप्रमाणे प्रत्येक ठिकाणी एस. टी. हजर...उन्हाळयाच्या सुटीचे दिवस असूनही कुणीतरी रिझर्वेशन करून ठेवल्याप्रमाणे जाता येता एकदोन सीट माझ्यासाठी मोकळ्या ९ मे १९८१ रोजी शनिवार ! सेकंड सॅटरडे ! शिर्डीत जागा राहण्यास मिळणार नाही ही खात्री. एस. टी. तून उतरलो तोच 'बाबा, कुणीतरी ओळखीचं भेटू द्या हो. म्हणजे त्यांच्या रुममध्ये सामान ठेवून रुमच्या बाहेर अंग टेकीन रात्रभर.' असं म्हणतच ! बाबांनी माझं म्हणणं ऐकलं असावं कारण गुरुस्थानाशी येऊन नमस्कार करतो. डोळे उघडतो तोच कुणीतरी हांक मारल्याचा भास झाला. नीट कानोसा घेतला तर आवाज ओळखीचा वाटला श्री. चैंदवणकरांचा आवाज होता तो. ते हजारे ! ऽ ऽ अहो हजारे अशी हांक मारीत होते. 'सच्चिदानंद'च जणूं सदानंदांच्या आवाजात ! गुरुस्थानाच्या समोरच्या इमारतीतील पहिल्या मजल्यावरून. माझ्या डोळ्यातून नकळत घळघळ अश्रू वाहू लागले... चमत्कारच होता तो... अनपेक्षित तसाच धावत वर गेलो. आणि चैंदवणकरांना सांगितलं ते त्यांना देखील आश्चर्य वाटलं कारण तेच म्हणाले, 'अहो, गेले दोन तीन तास मी रुममध्येच होतो आता फक्त एक दोन मिनिटेच झाली गॅलरीत आलो तोच तुम्ही दिसलात' बाबांनी अशी परस्पर सोय केली माझी. श्रींना, त्यांना, काकरेसाहेबांना आमंत्रण देऊन रविवारी सकाळीच परतलो तो नाशिकला बहिणीला सौ. स्मिताला आमंत्रण द्यायला गेलो. तिथे श्री ताई शहाण्यांची अकस्मात भेट, त्यांचा पाहूणचारच नव्हे तर परतताना रेल्वेत असणाऱ्या त्यांच्या सूनबाईमुळे प्रवास ऐटीत ऐनगर्दीतसुद्धां आगाऊ रिझर्व्हेशन केल्याप्रमाणं... घरी येऊन पहातो तो आमच्या तात्यांनी, आप्पांनी सर्व तयारी केलेली. त्यांना मी न सांगता सवरता...हिच्याकडून त्यांना फक्त कळलं बस्स...एक एक गोष्टी अशा फक्कड जमल्या की त्याची अपेक्षाही नव्हती. श्रीसाईंनी योजलं होतं सारं मग होणार नाही तर काय ! एवढंच कशाला ऐन मंगलकार्याच्या दिवशी १९ मे ला आमच्या मातोश्री आमची कुलदेवता 'जमनिका' देवी घेऊन येणार होत्या त्या उगवल्याच नाहीत लवकर. भटजींची ओरडाओरड सुरू झाली.

"अहो तुमचे कुलदैवत कुठे आहे. त्याची पूजा प्रथम" आम्ही आपले आईच्या येण्यावर विसंबून होतो कारण आमचे मुख्य देवघर आहे कांदेवाडीत गिरगावात. तेवढ्यात श्री. रमाकांत पंडित तेथे हजर ते बाबांच्या फोटोसह ! त्यांना मी आठ पंधरा दिवसापूर्वी बाबांचा फ्रेम केलेला फोटो हॉलवर घेऊन यायला सांगितले होते त्याचे त्या क्षणी तरी मला विस्मरण झालेले होते. अभावितपणे मी, सौ. आशू एकदमच म्हणालो. 'हे काय आमचे कुलदैवत साईबाबाच.' अशा तऱ्हेने

'बाबा' प्रत्यक्ष मुंजीला हजर राहिले. प्रथम हार घालून आशूने त्यांचा आशिर्वाद घेतला. भटजींनी त्यांची पूजा केली मगच बाकीच्या विधीला सुरवात झाली आणि मग...ध्यानी मनी नसताना न भूतो न भविष्यती असा तो आशिषचा मुंजीचा सोहळा पार पडला. फक्त मुंजीतच 'बाबा' आले नाहीत तर 'घरी' येताना देखील सोबतच राहिले...टॅक्सीतल्या चित्रातून आशिर्वादाचा हात आम्हांला दाखवित जणू सांगतच होते. की "मी तुमच्या पाठीशी आहे ना मग..." म्हणून तर 'साईइच्छा' म्हणून जीवनातली प्रत्येक घटना, सुखदुःखाचा चांगला वाईट क्षण म्हणणाऱ्या माझ्यासारख्या साईपंथीय वेड्याला पुन्हा पुन्हा म्हणावेसे वाटते की

"तुझ्या इशाऱ्याने साई
विश्वाचा हा रथ हाले
तुझ्या नामे 'बाबा' साई
श्वासोश्वास माझा चाले."

# साईचरणी मागावे ते मिळते

—डॉ. सौ. सुमति खानविलकर
सीताकुंज, लोनावळा,

● आज मी सांगणारा अनुभव आगळा नी वेगळा आहे. आमचा डॉक्टरी व्यवसाय नि त्याच्यात प्रसूति गृह मग काय विचारता चौवीस तासाची बांधीलकी.

त्यामुळे खूप दिवस मनात असून सुद्धा निरनिराळे ग्रंथ पोथ्या यांचे सप्ताह लावावेत पारायणे करावीत, कीर्तने प्रवचने ठेवावीत आपण ऐकावीत व दुसऱ्याना पण त्याचा फायदा मिळावा असे वाटे पण यातले काही करायचे म्हटले की मोडता यायचा व कार्यक्रम रद्द करावा लागायचा.

गेल्या वर्षीच्या गुरुपौर्णिमेला पुजा केली आरती झाली. दुपारी भजनी मंडळाचा भजनाचा कार्यक्रम ठेवला भजने सुरू झाली. मी हॉस्पीटलमध्ये केसला उभी. मन सारे बाबांकडे लागले होते. मनातल्या मनात बाबांवर चिडले होते. एक दिवस उशीरा प्रसुति झाली असती किंवा एक दिवस अगोदर पण मग विचार आला. जन्म

आणि मृत्यू हा ठरलेल्यावेळी ठरलेल्या ठिकाणीच व्हायचा असे असताना आपण हा त्रागा का करावा. ठेवीले अनंते तैसेची रहावे चित्ती असो द्यावे समाधान. झाले भजनी मंडळाच्या बायका निघून गेल्या. रात्री आरती वगैरे करून मी बाबांजवळ बसले व बाबांना अगदी कळवळून विचारले. बाबा असे का हो चांगली इच्छा असून सुद्धा का पुरी होत नाही. आता संसारातली कर्तव्ये संपली. आशा आकांक्षा पूर्ण झाल्या. नाव लौकीकाची हाव संपली. आता एकच इच्छा उरली ती ज्ञान साधनेत, सत् संगतीत व तुझ्या भक्तीत उरलेले आयुष्य घालवावे व आयुष्याचा शेवट तू गोड करावास.

पण तुझे आपले दुसरेच चालू एक अडचण संपते तर दुसरी अडचण असे का ! कृपेचा सागर आहेस ना तू मग माझी ही साधी इच्छा तुला पुरवता येत नाही. कारे कृपाघना कृपाळू हो आणि असा वर्षाव कर की आनंदी आनंद गडे जिकडे तिकडे पडती ज्ञानाचे सडे करशील ना असे. इतक्यात काही कारण नसताना लाईट मोठा झालेला वाटला तोच बाबांच्या डोक्यावरचे सकाळच्या पूजेत ठेवलेले फूल खाली पडले आणि एवढयात डावा डोळा फडफडला.

आणि काय बाबांनी किमया केली. खरोखरच कधी नव्हे ते अपेक्षेबाहेर आता पर्यंत कार्यक्रम चाललेत. श्री ज्ञानेश्वरीचे पारायण, दासबोधाचे पारायण, श्रीसाई-चरित्र, गजानन महाराजांची पोथी, सिद्धारूढ महाराजांची पोथी, तसेच पसायदान अर्थासहित वाचन, रामदासांचे मनाचे श्लोक, नवनाथ कथा सार चालू आहे. याशिवाय प्रवचने झाली, कीर्तनें झाली. काहीना बोलावले होते तर काही आपण होऊन आलें व आयत्यावेळी प्रवचन ठरलें, संताची दर्शने घडली. समाप्तीची जेवणे झांली. वर्ष २०–२५ माणसे जमतील असे वाटले तर ताट वाढताना संख्या दुप्पट. तरीसुद्धा आनंदाने पार पडले.

गोकुळ अष्टमी आली. न कळत दोन दिवस छान उत्सव पार पडला. कृष्ण-जन्मांचे आख्यान लावले. आरती, भजन, पाळणे गौळणी काय विचारू नका. बाळ गोपाळांनीं सुद्धा संपूर्ण रात्र जागून निरनिराळी कृष्णाची लीला करून दाखविली. स्त्रियांनी फुगड्या झिम्मा कृष्णाच्या गाण्यावर फेर धरले. दुसऱ्या दिवशी गोपाळ-काला, दही हंडी फोडायला बाळ कृष्ण आयत्या वेळी हजर. मुलांनी गोविंदा गोविंदा करत त्यांच्या हातून दही हंडी फोडली तर गोपाळकाला बनवण्यासाठी, पंढरीच्या पांडुरंगाने तेथील पुजाऱ्यापैकींची भगिनी इकडे पाठविली. त्या इतका सुंदर काला करून घेऊन आल्या व आमच्यात आनंदाने सामील झाल्या. मग काल्याचे कीर्तन

झाले. जेवणे झाली, सारे आपापल्या घरी गेले. हे दोन दिवस ध्यानीं मनी नसता इतक्या चांगल्या रीतीने पार पडले.

श्री गणपतीचे पाच दिवस पाच कार्यक्रम झाले. प्रवचन, कीर्तन, भजनी मंडळ दोन दिवस, मुलांचा व स्त्रियांचा कार्यक्रम झाले. पै पाहुणे आले आनंदानें पाच दिवस गेले.

असा आहे माझा कृपाळू नी प्रेमळ साई. मागावे ते मिळते. ' जया जैसा भाव तया तैसा अनुभव देशी दयाघना. '

याची प्रचिती येते व गहिवरून हात जोडले जातात नकळत हृदय हेलावले जाते व तोंडातून साऽऽई एवढे शब्द येतात.

# बाबा आत....बाटली बाहेर

—श्री. सुरेश सातपुते
C/o सातपुते स्टोअर्स, लालबाग १२

● कृपया, बाटली म्हटल्यानंतर कोणीही 'Break the Bottle that Breaks the home' पैकी बाटली समजू नये. त्या बाटली पेक्षाही जास्ती भगवान करून सोडणारी एक बाटली संसारी माणसाच्या घरात असू शकते. ही बाटली पैशांचाच धुव्वा उडवत नाही तर खाना पिना हराम करून घरात एक प्रकारच्या उदासीनतेची छाया पसरविते. ती बाटली म्हणजे औषधाची बाटली होय. ही ज्याच्या ज्याच्या म्हणून मागे लागते. त्याची दयनीय अवस्था सर्वश्रात आहेच.

दारूच्या बाटली पेक्षाही छोटी पण कर्तृत्वाने मोठी अशी ही औषधाची बाटली बाबा आमच्या घरात आले नी तिची आमच्या घरातील वर्दळ कायमची कमी झाली आणि आमच्या घरात सुख नांदू लागले. त्या सुखाची प्राप्ती कशी व केव्हा झाली ते आज या ठिकाणी सांगून सर्व साईभक्तांच्या दिवाळीच्या आनंदात भर टाकून ही दिवाळी व नवे वर्ष सर्व साईभक्तांना सुखाचे व समृद्धीचे जावो अशी प्रथम साईचरणी प्रार्थना करून मगच त्या सत्य कथेस प्रारंभ करतो.

तसे भगवान श्री साईबाबा व त्यांचे नाव घेतल्यावर येणारे आश्चर्यचकित कर-णारे अनुभव यांचा मला १९५५ पासून परिचय आहेच. परंतु आमचे साईभक्त मामा यांच्यासह प्रथम शिर्डीस जाण्याचा योग आला तो १९६२ साली.

परंतु १९७४ च्या दिवाळीच्या दरम्यान बाबांच्या पादुकांचे आगमन जयहिंद सिनेमा काळा चौकी येथे श्री साईभक्त स्नेहसंमेलनाच्या निमित्ताने झाले होते. तेथे सामुदायिक पारायणात भाग घ्यावा व बाबांच्या पादुकांचे दर्शनही घ्यावे या उद्देशाने आम्ही घरातील सर्व मंडळी गेलो होतो.

दर्शन वगैरे आटोपून येता येता, ज्या ठिकाणी बाबांच्या काही मूर्ती विक्री-साठी ठेवल्या होत्या. त्या ठिकाणी आमचे सगळयांचेच पाय अचानक थांबले. आई म्हणाली, 'आपल्याकाही घे एखादी मूर्ती!' लगोलग आम्ही एक मूर्ती पारखून खरेदी केली.

बाबा, बहुधा म्हणाले असतील, मूर्खा, माझी खरी पारख तुला अद्याप व्हाव-याची आहे.'

योगायोगाने बाबांच्या एकेक मूर्ती मध्येच दोन तीन गणपतीच्या चिमुकल्या मूर्तीपण तिथे विक्रीसाठी ठेवलेल्या होत्या. त्या पाहून आमचे छोटे चिरंजीव तीही घेण्याचा हट्ट धरून बसले. गणपती म्हणजे जबाबदारी त्यातून मूर्ती अगदीच लहान तेव्हा मी म्हणालो 'नको!' तर विक्रेता म्हणाला—'न्या! न्या!! मी ही मूर्ती बाळाला देऊन टाकली आहे!'

तेव्हा झटकन् एक विचार मनात आला म्हटले—देवच येऊ पहातात तर आपण नको कशाला म्हणायचे!

अशा रितीने बाबा, विघ्नहर्त्या समवेत आमच्या गृही आले, आणि त्यामुळे आमचे घरी बाबांची आरतीही आपोआपच सुरू झाली.

त्यानंतर कोणी आजारी असे पडलेच नाही. सर्दी खोकला असले काही मामुली आजार झाले पण विशेष काही नाही. त्यातही आमचे चिरंजीवास एकदा मात्र टाय-फाईड झाला. परंतु तेव्हाही बाबांनी उदी पाण्यातूनच पाजण्याचा संदेश मला दिला.

अपवाद वगळता कुठलेही साथीचे रोग वगैरेचीही बाधा आमच्या घराला सहसा होत नाही. म्हणून आमचा औषधाचा वार्षिक खर्च अगदी शंभर रुपयेसुद्धा नसेल. पण एकावेळेस मात्र गमत झाली.

आम्ही आरती करतो त्यावेळी अखेरीस ' शिरडीस ज्यांचे लागतील पाय । ' अवश्य म्हणतोच. परंतु मी एकदा एका मित्रासह शिर्डीस गेलो होतो. तेथे भाटीया खानावळीत जेवता जेवता समोरच्या फलकावर लक्ष गेले—तेथेही बाबांची वचने लिहिलेली होती. ती वाचून माझा मित्र म्हणाला—

' बाबा म्हणजे महान विदेही सत्पुरुष त्यांना कसला देहाकार तेव्हा ते कशाला स्वतःच्या तोंडाने म्हणतील की— ' साई म्हणे तोचि तोचि झाला धन्य ! झाला जो अनन्य माझे पायी ।। '

मलाही वाटले की शेवटचे कडवे कदाचित काल्पनिक असेल म्हणून आम्ही ते पद आरतीच्यावेळी म्हणण्याचे पुढे सोडून दिले. परंतु त्याची प्रचिती दोन चार गुरुवारातच आली.

आम्ही घरातील तीन मोठी माणसे, आमची चार मुले व आमचेकडे रहाणारा माझा माचा, असे एकूण आठ जण एका पाठोपाठ एक आजारी पडलो.

हे आजाराचे चक्र पाहिले अन् मनात म्हटले काहीतरी चुकतय तर चटकन् ' शिर्डीचे पाय ' आठवले. लगेच बाबांना सांगितले–म्हटले ते सुरू करतो पण हे चक्र थांबवा ! तर आजार तावडतोब बंद झाला.

—आणि त्यानंतर पुन्हा गाडी सुरळीत झाली हे काय सांगायला हवे !

# श्रीसाईबाबांची कृपा

—श्री. शशिकांत नाईक
दलाल बिल्डिंग, साईबाबा आश्रम रोड,
खार, मुंबई ५१

● शिर्डीमधल्या श्रीसाईबाबांबद्दल बऱ्याच लोकांकडून चांगले बोललेले तथा त्यांचे गुणगान गायिलेले ऐकून माझ्या मनात फार दिवसा पासून शिर्डीला साई-बाबांच्या मंदिरी जाऊन त्यांच्या समाधीचे दर्शन घेण्यासाठी उत्सुकता निर्माण झालेली होती, आणि ऐकल होते की रामनवमी, गुरूपौर्णिमा व विजयादशमीला श्रीसाईबाबांचा फार मोठ्या प्रमाणात उत्सव साजरा केला जातो. म्हणून मी दस-ऱ्याला जायचे ठरविले. मी ऑफिसमध्ये माझ्या सेक्शनच्या मुख्यलिपीकाना अर्ज दिला. त्यावर त्या म्हणाल्या नाईक तू आता रजेवर जाऊ नकोस, कारण दुसरे दोन लिपीक रजेवर जात आहेत, व तुला जर शिर्डीला जाऊन साईबाबांच्या समाधीचे दर्शन घ्यायचे असेल तर नंतरही जाऊ शकतोस. बाबा सदैव भक्तांसाठी मंदिरात बसलेले आहेत. तेव्हा मी त्यांना म्हणालो बाबा सदैव आहेत हे मला चांगले माहित आहे, परंतु मी या जगात सदैव कुठे असणार ! तेव्हा मी काही झालं तरी अर्जात नमुद केलेल्या तारखेपासून रजा घेऊन शिर्डीला जाणार आणि पुढे काय ! तर त्यांनी मला काहीही न बोलता तथा काहीही हरकत न घेता माझा अर्ज पुढे विभागीय अधिकाऱ्यां जवळ पाठविला, व ( अधिकारी ) त्यांनी मला कसली ही आडकाठी न करता रजेचा अर्ज मंजूर केला, व मी ठरविल्याप्रमाणे बुधवार दिनांक १५–१०–८० पासून दिनांक २०–१०–८० पर्यंत बाबांच्या सहवासात राहून दसरा–महोत्सव चांगल्या प्रकारे साजरा केला. माझ्या सोबत माझी तिर्थरूप मातोश्री व बहीण या दोघी होत्या.

सारांश काय तर मला त्यांच्या दर्शनाची उत्सुकता असल्यामुळे माझी ( रजे बद्दल ) अडचण सुरळीत पणे पार पडली, ही एक माझ्यावर झालेली " श्रीसाई-बाबांची कृपा " असेच मी समजतो.

# श्रीबाबांची कृपा

—संयोगिता कडू
१६५ कमला टेरेस, डॉ. आंबेडकर मार्ग
दादर, मुं. १४

● साधारण ३ वर्षांपूर्वीची गोष्ट. खरं सांगायचं तर माझा साईनाथांवर विश्वास नव्हता. आमच्या घरी सर्वांचीच त्यांच्यावर खूप भक्ती. त्यावेळी माझ्या मावाने आमच्या दोघांसाठी शिरडीची तिकिटे काढून आणली. माझ्या मनात जायचं नव्हतं म्हणून मी सरळ त्या दिवशी पहाटे आमच्या बायकांच्या आजारपणाची ठोकून दिली मग कोणीच काही बोलू शकले नाही. पण मी काही झाले नसतानाही खोटे बोलले आणि शक्यता नसतानाही त्रास सुरू झाला व तो त्रास सतत मला २२ दिवस भोगावा लागला. मग मात्र माझा विश्वास बसला. मी त्यानंतर बाबांची मनोमन क्षमा मागितली. त्यांची प्रार्थना केली. तेव्हापासून माझी त्यांच्यावर जी श्रद्धा बसली आहे ती वाढतच आहे.

वर्षापूर्वी माझी आजी वारली. त्यावर्षी माझी एका मुलीशी ओळख झाली होती. तिचा बाबांवर मुळीच विश्वास नव्हता. ती त्यांना माझ्यासमोर काय वाटेल ते बोले. शेवटी मी एकदा निर्धार केला. 'अरे, त्यांच्यावर आपला एवढा विश्वास आहे, त्यांच्याबद्दल कोणी काही बोललेले आपण ऐकू कसे शकतो ? लोकांची तोंडं तर आपल्याला बंद करता येत नाहीत. मग मी माझ्यापुरतंच ठरविलं की त्या मुलीशी मैत्री ठेवायची नाही. एवढेच नाही तर कॉलेजमध्ये, तिच्या घरी काही खायचे-प्यायचेही नाही. पण आजी गेली त्यावेळी ५० पैशांचा तिच्याकडून मी चहा प्याले. वास्तविक पाहता मी ताबडतोब पैसे द्यायला हवे होते पण ते राहिले. अर्ध्या तासाच्या आत मी फी साठी म्हणून २५० रुपये बरोबर आणले होते त्यातील ५० रुपये गायब. २०० रुपये मात्र जसेच्या तसे तिथेच होते. यावेळी मात्र मी चांगलीच हादरून गेले. खरोखरीच बाबा आपल्या आसपास आहेत. त्याशिवाय त्यांना आपल्या मनातील गोष्टी कशा अचूक समजत असतील ?

मागील मार्चमध्ये मी मनातच म्हटले की, ' आपण दोनदा शिरडीला जाऊन आलो पण एकदाही चांदीची बाबांची अंगठी आणणं जमलं नाही. माझ्याकडे तशी अंगठी पाहिजे. दुसऱ्याच दिवशी मी गॅलरीत कचरा काढत असताना मला मातीच्या

रगाड्यात ( बिल्डिंगमध्ये बांधकाम चालले होते. ) चांदीची श्रीसाईबाबांची अंगठी सापडली. ती सापडल्यावर मला काय आनंद झाला असेल हे तुम्हा साईभक्तांना कळले असेलच. असे व अनेक कित्येक अनुभव, बाबांची प्रचिती मला दर घटकेला येत असते. मी स्वतःला खरोखरच धन्य समजत आहे की बाबांची माझ्या वर कृपादृष्टी आहे. अशीच ती पुढे राहो व माझ्या चुका माझ्या पदरात पाडून माझी भक्ती दृढ करोत अशी त्यांच्या चरणी प्रार्थना !

卐

# परतफेड

—श्री. रमेश जगन्नाथ व्यवहारे
सुभाष दत्तात्रेय कारखानीस जि. ठाणे

● ते साधारण डिसेंबर महिन्याचे दिवस होते. मी व माझे मित्र श्रीसद्गुरु श्रीसाई चरणांचे दर्शन घेण्याच्या इच्छेने शिर्डीस गेलो होतो. पाऊल टाकताच त्या पवित्र नगरीत सर्वत्र कसा आनंदी आनंद होता, देवळा जवळील परिसरात जो तो आपा-पल्या इच्छेप्रमाणे पूजा, दर्शन, जप, अभिषेक इत्यादी कार्यामध्ये मग्न होते. सर्वांच्या चेहेऱ्यावर बाबांच्या दर्शनाची जणू प्रसन्न यावती दिसत होती. त्यातच गुरुवार अस-ल्यामुळे अभिषेकासाठी लांबच लांब रांग होती म्हणून आम्ही देखिल पहाटे २॥–३ वाजताच कुपन करिता नंबर लावुन सहज एक कूपन जास्त घेतले व पहिल्या फेरीतच ( अभिषेकासाठी ) आमचा नंबर लागला त्यामुळे मनास समाधान वाटले. एकीकडे तर आम्हाला शुक्रवारचे आगाऊ एस. टी. चे आरक्षण करावयाचे होते परंतु अभिषेकाची वेळ व आरक्षण करण्याची वेळ एकच होती. त्यामुळे मनात चलबिचल सुरू होऊन अकारण काळजी मात्र वाटत होती की आरक्षणासाठी जर गेलो तर आपला अभिषेक चुकेल व मनाला कायमची चुटपुट लागेल आणि आरक्षणासाठी नाही गेलो तर मुक्काम लांबेल. आम्हाला शुक्रवारी निघणे तर भाग होते. अखेरीस बाबांचे नाव घेवुन आम्ही एस. टी. यांच्याजवळ आरक्षणासाठी गेलो. काही माणसे रांगेत उभी होती, आरक्षणाची खिडकी उघडण्यास थोडा उशीर असल्यामुळे रांगेतील माणसे गप्पागोष्टी, विचारविनिमय, थट्टामस्करी, हासणे खेळणे ह्यात गर्क होती. रांगेतील एक माणूस असा होता की त्याला अभिषेकाचे कुपन कसे मिळेल ही विवंचना होती व त्याने नेमके आम्हाला अभिषेकाचे कुपन आहे का असे विचारले,

अशावेळी जणू बाबांनीच आम्हाला सुचविले की बेटा तुझ्याजवळ जास्त असलेले कुपन त्यांना दे व ते दिल्यावर त्याला खूपच आनंद झाला. त्यानेही अर्थातच आम्हाला आरक्षणाची खिडकी उघडल्यावर सौजन्यपूर्वक आमच्या परतीच्या आरक्षणाची तिकीटे काढून दिली, अशी ही पारमार्थिक परतफेड केवळ बाबांच्या प्रेरणेनेच झाली व श्रद्धा 'सबूरी' हे खरोखरीच बाबांचे जणू हुकमी चाकरच आहेत ह्याची साक्ष पटली.

●

# —: श्री साईकृपा :—

—कु. प्रतिभा मुकुंद भांबुरे
९ एस. एस. निसाळ चाळ
एस. एस. वाघ मार्ग ( नायगाव ) मुं. नं. १४

जो जो मज भजे जैशा जैशा भावे । तैसा तैसा पावे मीही त्यासी
तुमचा मी भार वाहीन सर्वथा । नव्हे हे अन्यथा वचन माझे

हे बाबांचे शब्द कधीच खोटे ठरणार नाहीत याचा अनुभव मला पूर्णपणे आला आहे.

१९८१ मार्चला जी एस. एस. सी. ची परीक्षा झाली त्या परीक्षेला मी प्रथमच खाजगीरीत्या बसले होते. परीक्षा जवळ आली तसा मी अभ्यास जोरात करू लागले, परंतु जेव्हा मी अभ्यासाला बसत असे तेव्हा माझे डोके फार दुखत असे, व मी काय वाचत आहे हे देखील माझ्या लक्षात रहात नसे. मी बाबांची प्रार्थना केली उदी डोक्याला लावली परंतु थोडावेळ बरे वाटत असे व पुन्हा डोके दुखू लागे. शेवटी तशाच अवस्थेत मी परीक्षा दिली. परंतु पास होण्याची खात्री नव्हती. पण बाबांवर माझी पूर्ण श्रद्धा होती. बाबांनीच परीक्षेला बसण्याची प्रेरणा दिली आता तेच पास करतील म्हणून मी गप्प बसले पण बाबांना मी सारखी विनवत होते की बाबा मला पास करा पुन्हा पुन्हा या परीक्षेच्या चक्रात मला गुंतायचे नाही.

जसजशी परीक्षेची तारीख जवळ येऊ लागली तरी मी बेचैन होऊ लागले, व अखेर निकालाचा दिवस उजाडला. तेव्हा मी बाबांना सांगितले बाबा मी पास झाले तर शिर्डीला तुमच्या दर्शनाला येईन व हा अनुभव मी साईलीला मासीकात छापायला देईन व मी बाबांना वंदन करून शाळेत गेले,

आणि बाईंनी पुढे केलेला निकालाचा कागद मी थरथरत्या हातानी घेतला व त्यावरील पास हा शब्द वाचून तर मला इतका आनंद झाला की तो मी शब्दात सांगू शकत नाही.

अशीच बाबांची कृपा माझ्यावर व आमच्या सर्व कुटुंबावर सतत रहावी हीच सदिच्छा.

॥ साईबाबांना माझे शतशः प्रणाम ॥

# द्वारकामाईतील खांब.... पाठ दुखणी पळवी लांब....!

—श्री. रमेश डी. चव्हाण
साईनिकेतन, गुजरलेन कॉर्नर मु. पो
ता. नवापूर जि. धुळे नवापूर पिन ४२५४१८

● मला पाठदुखीचा विकार बऱ्याच वर्षांपासून सतावित होता. सकाळी झोपेतून उठायचा जीवच होत नसे; इतके पाठदुखीने बेजार केले होते. माझ्या मुलांना मी सर्व अंग चेपायला लावायचो...अंगावर चालायला लावायचो तेव्हा कुठे आराम वाटायचा परंतु पुढे पुढे मुलेही कंटाळा करू लागली. तेव्हा त्यांना पैशांचे आमिष दाखवून पाठीवर थोडावेळ तरी पाय द्या असे सांगायचो. पण रोज मरणार त्याला कोण रडणार ह्या उक्तीप्रमाणे मी सांगायच्या आधीच ती बाहेर सटकायची. बाजारातील अंग दुखीवरच्या विविध गोळ्यासुद्धा खाऊन पाहिल्या पण तिळमात्र फरक पडत नसे. अशातच आठ नऊ-जून १९८० रोजी माझी बदली नवापूरहून मोगराणी ह्या लांबच्या -आडवळणी खेड्यात झाल्याची ऑर्डर आली. तेव्हा मी साईबाबांना अनन्यभावे शरण जाऊन म्हटले बाबा, माझी बदली रद्द झाल्यास मी लवकरच आपल्या दर्शनास येईन. अवघ्या दोन दिवसात म्हणजे १२ जून रोजी सर्व बदल्यांना 'स्टे' लागल्याचे जाहीर करण्यात आले. साईबाबा भक्तांच्या हाकेला किती लवकर धावतात हा त्याचा ज्वलंत दाखवला होय.

आतापर्यंत माझ्या अनेकवेळा बदल्या झाल्यात तेव्हा रद्द करण्यात मला खूपच खटाटोपी कराव्या लागत. एवढे करूनही आदेश रद्द होण्यास बरेच दिवस लागायचे.

परंतु १० तारखेला ऑर्डर येते व १२ तारखेला स्टे लागतो म्हणजे एकाच दिवसात स्टे लागला. असे कधीच घडत नाही. काही का असेना माझ्या मनाप्रमाणे घडल्याने आनंद झाला व साईबाबांचे मनोमन आभार मानले.

बोलल्याप्रमाणे शिर्डीला २ मित्रांबरोबर जाण्याचे ठरले. त्या दोघांनाही शिर्डीची माहिती नव्हती त्यामुळे सोबत मी असावे ही त्यांची इच्छा. तेव्हा त्यांच्या इच्छेप्रमाणे दि. ९ ऑगस्ट रोजी निघालो. साहित्य क्षेत्रात माझे जबरदस्त लिखाण असले तरी प्रवासात मी कधीच लिहू शकलो नाही पण त्या दिवशी चालू एस. टी. तच बाबां-विषयी एक कविता लिहिली हा सुद्धा मी योगायोगच समजतो.

'शिरडीला सारे जाऊ कि रं
दर्शन बाबाचं घेऊ कि रं'

ह्या त्या कवितेच्या सुरुवातीच्या दोन ओळी. बाबचं दर्शन घेतल्यानंतर माझ्या मित्रांना शिर्डीतील सर्व स्थळे दाखविली.

द्वारकामाईत इतके वर्षे जाऊनही साईबाबा ज्या खांबाशी टेकून बसत त्या खांबाशी भक्तसुद्धा टेकून बसू शकतात हे मला ठाऊक नव्हते एक म्हातारे गृहस्थ त्या खांबाला टेकून बसले असता मी विचारले. 'आपण बाबांचे भक्त आहोत तेव्हा बाबा बसत त्या जागेवर आपण कसे बसू शकतो? तेव्हा त्या वृद्ध गृहस्थाने सांगितले की, 'ह्या खांबाशी टेकून बसले असता पाठदुखीचा आजार लांब पळतो.'

पाठदुखीवर रामबाण उपाय मला त्या दिवशी कळला. मला वाटते ते साई-बाबा असावेत की, ज्यांनी म्हाताऱ्याच्या रूपात येऊन पाठदुखी बाबत मार्गदर्शन केले. मी लागलीच खांबाला टेकून बसलो. बराच वेळ बसून राहिलो व पाठदुखी चांगली होण्यासाठी प्रार्थना केली.

बाबांवर माझी अतूट श्रद्धा असल्याने आता पाठ दुखणारच नाही अशी मनाची तयारी झाली आणि आश्चर्य आज एक वर्षांवर कालावधी लोटला तरी पाठदुखीचे नाव नाही. तेव्हा माझ्या ओठातून नकळत शब्द उमटले ते असे—

'द्वारकामाईतील बाबांचा खांब
पाठदुखणी पळवी लांब...!'

# काय सांगावे अनुभव ।
# मुखी साई नाम हेची गुण ।।

—श्री अशोक म्हात्रे
इराणी चाळ, अँटॉप हिल रोड, मुं. ३७

● कालच्या जून महिन्याची गोष्ट. माझ्या रविन्द्र नावाच्या दीड वर्षाच्या मुलाच्या मानेवर डाव्या कानाखाली दगडासारखी गाठ झाली होती. पंधरा दिवस घरच्या माणसांनी गावठी औषधी इलाज केला पण गुण नाही. नंतर डॉक्टरांकडून ऑपरेशनचे सांगणे, तारीखवार बोलावणे, मुलाचे एक्स रे व रक्त घेण्यात आले. तेव्हा माझ्या मनात ऑपरेशन ठरण्यापूर्वी शेवटचा इलाज म्हणून मी हातावर उगळलेल्या गंधगोळीत थोडी बाबांची विभूती मिश्रित केली आणि बाबांच्या स्मरणाने तो लेप मुलांच्या गाठीवर लावला हा इलाज सकाळ संध्याकाळ दिवसातून दोन वेळा याप्रमाणे हप्ताभर केला. तिथे बाबांच्या कृपेने गुण आला. दगडासारखी गाठ साफ नाहीशी झाली आणि ऑपरेशन ठरण्यापूर्वी आमच्या रवीची मान पूर्ववत बरी झाली. म्हणून म्हणतो–

काय सांगावे अनुभव ।
मुखी साईनाम हेची गुण ।।

श्री साईलीला लेखक-कवी स्नेहसंमेलन–आठवे
विशेष माहिती जानेवारी १९८२
अंकात वाचा.

# श्रद्धा आणि सबुरी

—कु. वैशाली नरेंद्र फणसे
३, पार्वती निवास, विष्णू नगर, डोंबिवली

● साईबाबांवर माझी पूर्ण श्रद्धा आहे. साईबाबांनी अनेकवेळा आम्हाला संकटातून वाचविले आहे. साईभक्तांनी मनःपूर्वक प्रार्थना केली असता ते त्यांच्या हाकेला जरुर धावून येतात. नुकताच मला आलेला अनुभव देत आहे.

तो १९ फेब्रुवारीचा दिवस सकाळी माझ्या आईने वडिलांचा एक टेरिलीनचा शर्ट इस्त्री करण्यासाठी लॉन्ड्रीत टाकला नि ती संध्याकाळी तो शर्ट आणावयास गेली असता तिला त्या लॉन्ड्रीवाल्याने सांगितले की ताई, तुम्ही टाकलेला शर्ट मिळत नाही. मी तो सबंध दिवस शोधला. पण मला जरुर आठवत आहे तुम्हीच तो शर्ट दिला असून तो पांढरा आहे, आणि अजूनहि मी शोधत आहे. हे ऐकताच माझी आई हिरमुसले तोंड करुन घरी आली. कारण तो शर्ट नवीनच होता.

मी नुकतीच शाळेतून आले होते. आईने मला घडलेली सर्व हकिकत सांगितली ते ऐकून मला आश्चर्याचा धक्काच बसला! मी आईला सांगितले, 'तू मुळीच घाबरु नकोस!' तो दिवस गुरुवारचा होता. मी साईबाबांच्या फोटोजवळ जाऊन प्रार्थना केली. मी बाबांना म्हणाले, शर्ट आम्हाला मिळालाच पाहिजे. मी पुढच्या गुरुवारी जरुर देवळात येईन, व हार घालून पेढ्यांचा नैवेद्य देईन. कारण आमच्या घराजवळच साईबाबांचे देऊळ आहे. माझे मन मात्र मला खात्री देत होते की शर्ट जरुर मिळणारच!

नंतर रात्री वडील आल्यानंतर त्यांना सर्व हकिगत सांगितली. ते व मी लगेच लॉन्ड्रीत गेलो. तेव्हा लॉन्ड्रीवाल्याने सांगितले तुमचा शर्ट अजुनही मिळाला नाही. मी तो सर्व ठिकाणी शोधला. कपाटाखाली पण पाहिले परंतु तुमचा शर्ट मिळाला नाही. तेव्हा मलाही तो लॉन्ड्रीवाला अगदी बेचैन झाल्याचे दिसत होते.

दुसरे दिवशी शुक्रवारी मी पुन्हा लॉन्ड्रीत गेले. तेव्हा त्याने तेच सांगितले शर्ट काही मिळत नाही. पण मी आईला ठामपणे सांगत होते की, आपला शर्ट नक्की मिळणार याची मला पूर्ण खात्री आहे. तू बाबांवर विश्वास ठेव. त्यानंतर

संध्याकाळी आई पुन्हा लॉन्ड्रीत गेली. तेव्हा तो लॉन्ड्रीवाला म्हणाला, ताई तुमचा शर्ट मिळाला. काल मी सगळीकडे शोध घेतला. इतकेच काय कपाटाखाली पण पाहिले पण तेथे तुमचा शर्ट नव्हता. पण आज मला एका चादरीत शर्टाचा गुंडाळा मिळाला. मलाही नवलच वाटले, कारण काल मी ही चादर झटकून पाहिली पण तुमचा शर्ट नव्हता. आई शर्ट घेऊन आनंदाने घरी आली, व मला तिने सर्व सांगितले. मला अतिशय आनंद झाला. नंतर मी बोलल्याप्रमाणे श्री साईबाबांच्या मंदिरात जावून साईनाथांची पूजा केली. साईबाबा आपल्या भक्तांसाठी किती लवकर मदतीला धावून येतात! असा हा माझ्या जीवनातील एक अविस्मरणीय प्रसंग घडून आला. श्री साईनाथ महाराजांना शतशः प्रणाम.

★

# श्री साई दर्शन

**श्री. अनंत तातोबा हिंदळेकर**
कामना को. ऑ. हौ. सोसायटी
बि. नं. २ रुम नं. २ अगरबझार
सिद्धिविनायक मंदिरजवळ मुं. नं. २८

● मी साईभक्तीत दहा वर्षांचा असताना पडलो. माझे वडील माझे वय दहा वर्षांचे असताना निवर्तले आणि माझे बालपण माझी मावशी सौ. लक्ष्मीबाई विष्णु केरकर ह्यांच्याकडेच गेले. तिकडे आईचे मामा श्री. माधवराव हिंदळेकर हे त्यांच्या लहानपणी वडिलांबरोबर जाऊन प्रत्यक्ष शिरडीक्षेत्री साईदर्शन लाभलेले व बाबांच्या हस्ते मिळालेला चांदीचा रुपया व उदी असे भाग्यवान होते. आईचे मामा. त्यांनी सौ. मावशीकडे श्रीसाई गुणगान केले व ऐकत असलेल्या सर्वांस साईभक्तीची उर्मी आली ती कायम. दर गुरुवारी आरत्या व सर्व प्रमुख उत्सव घरातच साजरे व्हायचे त्यामुळे आमची साईभक्ती उत्तरोत्तर वाढत गेली. माझा लहानपणापासून संत दासगणूकृत 'श्रीसाईनाथ स्तवन मंजिरी' म्हणण्याचा परिपाठ अगदी कधी आजमिती पर्यंत कधीही न चुकता चालू आहे. साईकृपेने गाठीशी अनुभव पण बरेच आले आहेत.

त्यात अगदी अलिकडचा अनुभव म्हणजे श्री बाबांच्या त्रिकाल ज्ञानाचा ! दिनांक १२–१०–१९७९ रोजी रात्री झोपेच्या अगोदर बाबांच्या फोटोकडे ध्यान करीत होतो. सहज माझ्या मनात विचार आला. घरातील सर्व फोटोत बाबा वेगवेगळे दिसतात पण प्रत्यक्षात बाबा असतील तरी कसे ? क्षणभर विचार आला आणि गेला. दुसरा दिवस शनिवार दि. १३–१०–७९ संध्याकाळी पाच वाजता घरी मी एकटाच होतो. मुले बाहेर खेळत होती. कॉटवर मांडी ठोकून बसलो होतो. डोक्यावर श्री साई नाथांचा शिरडीच्या संगमरवरी पूर्णाकृति मूर्तीचा फोटो होता. डोळे मिटून बाबांचा जप मनातल्या मनात सुरू केला. इतक्यात एकाएकी डोळयासमोर बाबांचा सुंदर चेहरा एक क्षण म्हणा प्रत्यक्ष एकाद्या चित्रपटातील स्लाईडसारखा आला. बाबांच्या चेहऱ्यावर गुलाबी रंगाची झाक होती. प्रसन्न मुद्रा होती. मी पटकन् डोळे उघडले. अवर्णनीय आनंद मला झाला होता. इतके सुंदर बाबांचे दर्शन झाल्यावर डोळ्याचे पारणे फिटले. आता बाबा कसे होते ही शंकासुद्धा साऱ्या आयुष्यात येणार नाही. माझ्यासारख्या यत्‌किंचित भक्ताची मनोमन हाक त्या सर्वसाक्षी साईमाऊलींनी ऐकून प्रत्यक्षात दर्शन देऊन मला जन्माचे उतराई करून ठेवले.

अशीच कृपादृष्टी सर्वांवर रहावी ही साईचरणी शुभेच्छा !


# बालयोगी श्री गोविंद महाराज

चमत्कारांनी भरलेला खास लेख जानेवारी १९८२ मधे वाचा.

—लेखक–**श्री. गणपतराव सामंत**

निवासी व्यवस्थापक श्री महालक्ष्मी मंदिर, मुंबई

# श्रीबाबांचा महिमा अगाध आहे

—श्री. प्रभाकर नाईक
४२।१२९२ आदर्शनगर वरळी मुंबई

● एक वर्षांपूर्वी दिवाळीला आमच्याकडे सफाईचे काम करण्यासाठी मी माझे सौ. वतीस मदत करत होतो. तेव्हा चुकून कुठेतरी मला गंजलेली तार बोटाला लागली व रक्त आले. अर्थात मामुली लागून रक्त येणे ही बाब काही मोठ्यातली नाही म्हणूनच मी तीकडे दुर्लक्ष केलं पण लागलेल्याच्या दुसरे दिवशी माझे बोट सुजून बोटाला ठणके मारायला लागले बोट सुजून आत पू झाला. आम्ही आमच्या फॅमीली डॉक्टर जवळ गेलो. तेव्हा डॉक्टरनी तुम्ही उद्या हॉस्पीटलमध्ये जा व तिथे बोटाला जरासे कापून पू वगैरे काढून घ्या असे सांगितले पण हॉस्पीटलमध्ये गेल्यावर तिथे होणाऱ्या गैरसोईबद्दल व कापताना होणाऱ्या वेदनेच्या भितीने हॉस्पीटलमध्ये कसे जायचे याचा मी व सौ. वती विचार करू लागलो. माझी सौ. वती व मी थोडेफार श्रीबाबांचे भक्त आहोत. साहजीकच आम्ही शिरडीवरून आणलेली उदी पाण्यामध्ये कालवून माझ्या सौ. वतीने बोटाला बांधली. तासाभराने बाबांचा चमत्कार दिसून आला. बोटातून रक्त व पू सर्व निघून बोटाला लागलेल्या वेदनाही कमी झाल्या. आमच्या हाकेला बाबा कसे धावून आले त्याची खरीखुरी प्रचीती आम्ही अनुभवली. आम्हा दोघा उभयताना फार फार अत्यानंद झाला धन्य ते बाबा. धन्य त्यांची लीला असे कित्येक लहान मोठे प्रसंग माझ्यावर आले पण ते बाबांच्या उदीने व बाबांच्या नामस्मरणाने टळले. ते सांगून व लिहून पुरे पडणार नाही, आमच्या घरातील सर्वांची पूर्ण निष्ठा बाबांवर आहे. माझी मुले मी व सौ. वती कुठेही घरातून बाहेर जातेवेळी बाबांना नमस्कार व बाबांची उदी कपाळाला लावल्याशिवाय बाहेर पडणार नाही; व हे करण्यास कधीच विसरणार नाही. बाबांची अशीच कृपादृष्टी त्यांच्या सर्व भक्तावर व आमच्यांवर सदैव राहो हीच बाबांकडे प्रार्थना.

* * *

# उदीमुळे पोटदुखी थांबली

—श्री. प्रकाश मोटे
इचलकरंजीकर बंगला, इ–७ न्यू पॅलेस
कोल्हापूर

● माझे वय २७ वर्षे आहे. मला गेली ३/४ वर्षे पोटदुखीचा त्रास होत होता या ३/४ वर्षांत बऱ्याच डॉक्टरांच्याकडून औषध घेतले, एक्स रे काढला. पण काहीही दोष आढळला नाही. औषध मात्र वरचेवर चालू होते. डॉक्टरनी तेलकट, तिखट, वर्ज्य करण्यास सांगितले. ते सर्व केले तरी काही उपयोग होईना. या त्रासामुळे कामात अजिबात लक्ष लागत नव्हते. या पोटदुखीमुळे मी अतिशय निराश झालो.

मला साईबाबांविषयी फारशी माहिती नव्हती. फक्त फोटो पाहिले होते. माझे थोरले बंधू विश्वासराव साईभक्त आहेत. ते नेहमी बाबांची पूजा करतात. पण तेही कधी शिर्डीला गेले नव्हते. माझे मित्र श्री. सुरेश राणे हे परम साईभक्त आहेत. त्यांच्या बरोबर आम्ही प्रथम शिर्डीला गेलो. साईबाबांचे दर्शन घेतले. मन तृप्त झाले. तेथे 'साईलीला' पाहिली. यातून येणारे अनेक अनुभव वाचले. उदा. उदीमुळे कोणताही रोग बरा होऊ शकतो आणि पुन्हा मनाला एक आशेचा किरण दिसू लागला.

शिर्डीतील ती समाधानकारक अशी साईबाबांची समाधी आणि मनाला आनंद देणारे प्रसन्न वातावरण पाहिल्यावर वाटले की खरोखरच या ठिकाणी अशी शक्ती आहे की ती माझी पोटदुखी खात्रीने बरी करणार.

त्यानंतर दररोज सकाळी उठल्यावर आंघोळ करुन काहीही खाण्या अगोदर बाबांची उदी पाण्यात टाकून मी ते पाणी पिऊ लागलो. उदी घेण्यास सुरुवात केल्यापासून डॉक्टरांचे औषध बंद केले. आणि आश्चर्य! थोड्याच दिवसात पोटदुखी पूर्णपणे बरी झाली. आणि आता कोणतेही पदार्थ खाण्यास हरकत नाही. अशी ही बाबांची अपार लीला!

सच्चिदानंद सद्‌गुरु साईनाथांना शतशः प्रणाम!

# श्रद्धा आणि विश्वास

—कुमारी रंजना राधाकृष्ण गुप्ता
पाटकरवाडा, भगतसिंग रोड,
डोंबिवली ( पूर्व ) जि. ठाणे
४२१-२०१

● गेले आठ वर्षांपासून आमच्याकडून श्री साईबाबांची सेवा होत आहे. दर वर्षी नित्यनियमाने लेखक-कविसंमेलनात आम्ही शिरडीला जातो. ह्या आठ वर्षामध्ये आम्हाला श्री साईबाबांच्या कृपेची प्रचिती पदोपदी येत आहे आणि बाबा आपल्या पाठीशी आहेत असा ठाम विश्वास आम्हा प्रत्येकाला आला आहे. जानेवारी १९८१ मध्ये आलेला अनुभव मी खाली देत आहे.

गेले १० वर्षांपासून आमच्या आईचे ऑपरेशन करण्याचे चालले होते. तब्येतीमध्ये अशक्तपणा असल्यामुळे वरचेवर डॉक्टरांचे औषध चालू होते पण ऑप-रेशन करण्याचे कोणत्या ना कोणत्या कारणांनी रद्द व्हायचे. तब्येतीमध्ये काहीही सुधारणा न झाल्यामुळे आता ऑपरेशन करणे हाच खरा उपाय आहे. अशा सम-जुतीने आम्ही स्थानिक दवाखान्यात गेलो. डॉक्टरांनी तपासल्यानंतर आम्हाला रक्त व मूत्र तपासणीचा रिपोर्ट आणावयास सांगितले. आम्ही चार-पाच दिवसानी रिपोर्ट घेऊन डॉक्टराकडे गेलो. तेव्हा रिपोर्ट पाहताच डॉक्टरांनी ऑपरेशन करता येणार नाही असे सांगितले. कारण मधुमेह जास्त प्रमाणात होता. त्यानंतर बरेच दिवस त्यावर आईची औषधे चालू होती. पुढे अशीच पाच वर्षे निघून गेली व आईची तब्येत दिवसेंदिवस खूपच अशक्त होत गेली. शेवटी आई दवाखान्यात भरती झाली. तिकडे गेल्यावर डॉक्टरांनी रक्त तपासले. तेव्हाही मधुमेह जास्त प्रमाणात होता. नंतर डॉक्टरांनी सांगितले की तुम्हाला तीन महिने तरी दवाखान्यात रहावे लागेल. तेव्हाच पुढे कुठे तुमचे ऑपरेशन करता येईल.

आईजवळ बाबांची उदी सारखी असायची. आईने बाबांना सांगड घातली होती की, 'बाबा, माझे ऑपरेशन काही त्रास न होता झाले पाहिजे. तेव्हा बाबा म्हणाले, 'मुली, तुझे ऑपरेशन होणार पण सव्वा महिन्यानंतर आणि मी त्यावेळी हजर राहाणार आहे. तू कसलीही भीती बाळगू नको.' बाबांच्या ह्या शब्दावर आईचा

जबरदस्त विश्वास होता. आईला दवाखान्यात कधीही भीती वाटली नाही. दवाखान्यात एक महिना झाल्यावर डॉक्टरांनी ऑपरेशन करण्याचे ठरविले. पण साखर कन्ट्रोलमध्ये नसल्यामुळे ऑपरेशन रद्द झाले. बाबांच्या म्हणण्याप्रमाणे बरोबर सव्वा महिन्यानी साखरेचे प्रमाण नॉर्मलवर आले. डॉक्टरांना सुद्धा आश्चर्य वाटले आणि त्यांनी तावडतोब ऑपरेशन करण्याचे ठरविले.

साईबाबांच्या कृपेने आईचे ऑपरेशन दिनांक ९–१–१९८१ रोजी काही त्रास न होता व्यवस्थित झाले. पुढे आश्चर्याची गोष्ट अशी की ऑपरेशन नंतर साखर कंट्रोलमध्ये असल्यामुळे आईची तब्येत दोन महिन्यातच सुधारली. आम्हाला सुद्धा आश्चर्य वाटले की आईची तब्येत एवढ्या लवकर सुधारली, हे सर्व श्री साईबाबांच्या कृपेचे फळ आहे. आता आईची तब्येत चांगली आहे, कसलाही त्रास नाही. आम्हाला आलेला हा अनुभव म्हणजे बाबांवर आमची श्रद्धा आणि विश्वास. बाबांची कृपादृष्टी आमच्यावर राहो हीच साईच्या चरणी प्रार्थना'

## साईव्यापी साई हाकेला पावी

—श्री. गणेश वी. नाईक
मडकई टोक, पो. गोव

● शिरडीला मी नोव्हेंबर १९७७ मध्ये प्रथम आलो होतो, तेव्हा बाबांच इंग्रजी भाषेत प्रसिद्ध झालेले साईचरित्र विकत घेतले होते, आणि गोव्यात आल्याव लगेच पण वाचून पूर्ण केले होते. शिर्डीला ५ व्या वेळी फेब्रुवारी १९८० मध्ये जेव्ह मी आलो. तेव्हा मराठीतले साईचरित्र विकत घेण्याचा माझ्या मनात विचार आल आणि लगेच ते घेऊनही टाकले. पण मला ते एका दमात वाचण्याचा मात्र यो मिळाला नाही. गंमत अशी की, ह्या साईचरित्र पारायणाची सुरुवात मी गोव्या केली आणि सांगता मात्र पॉंडीचेरी, मद्रास, तिरुपति मार्गे बंगलोरला केली. विजया दशमी ऑक्टोबर १९८० रोजी साईचरित्राची पारायण सुरुवातीनंतर मी नोव्हेम्ब १९८० मध्ये हेच साईचरित्र बरोबर घेऊन बाबांना भेटायला ६ व्या वेळी शिर्डील

आलो होतो. तिथे मी एक-दोन अध्याय वाचले. गोव्यात परतल्यावर लगेच मी पाँडीचरीला जायला निघालो. साईचरित्र लवकर पूर्ण करता आले नाही म्हणून मला फार वाईट वाटायला लागले. पण निराश मात्र झालो नाही. साईचरित्र तसंच मी प्रवासात माझ्याबरोबर घेतले. पाँडीचरी, मद्रास, तिरुपति इथे मी थोडे थोडे अध्याय वाचले, आणि बंगलोरला जेव्हा पोचलो तेव्हा तिनच अध्याय वाचायचे शिल्लक राहीले होते. शेवटी बाबांचीच इच्छा.

दिनांक ३१–१२–१९८० रोजी मी बंगलोरला ठरविले की आज साईचरित्राचे राहीलेले तिनही अध्याय कोणत्या ना कोणत्या परिस्थितीत पूर्ण करायचे. कारण तो वर्षाचा शेवटचा दिवस होता. म्हटलं, १९८० मध्ये सुरू केलेली गोष्ट उगाच १९८१ मध्ये कशाला रेंगाळत टाकायची, असा विचार करुन माझ्या निवासस्थानाकडे येण्यासाठी मी डबलडेकर सिटी बसमध्ये कसा-बसा चढलो. वेळ संध्याकाळची होती. रस्त्यावर वाहनाची वर्दळ फारच वाढली होती. बस स्टॉपवर बसची वाट पाहून मी कंटाळलो होतो, आणि एवढ्यात आतमध्ये चिकार पॅसेंजर भरून आलेल्या बसमध्ये मी कसा-बसा घुसण्याचा प्रयत्न करु लागलो. पण दुर्दैवाने माझ्या प्रयत्नांना मात्र यश आले नाही. मला घट्ट पकडायला काहीच मिळत नव्हतं. ज्या स्थितीत मी उभा राहिलो होतो, तिथे इतर पॅसेंजरच्या माझ्यावर पडणाऱ्या भारामुळे तर माझी स्थिति अधिकच नाजूक झाली होती, आणि शेवटी व्हायचे तेच झालं. माझा तोल सुटला आणि मी खाली रस्त्यावर भुईसपाट पडलो. मी फारच भांबावलो होतो. पडताना मात्र मी आपोआप 'बाबा' म्हणून आर्त हाक मारली होती. कारण या अपघातातून मला सहीसलामत वाचवणारा सर्व शक्तिमान तोच एकटा होता. गाडीनं ग्रीन सिग्नल क्रॉसिंग केलं होतं, तेथेच मी नेमका पडलो होतो, आणि ह्या गाडी मागे शेकडो वाहनांचा जणू ताफाच येत होता. पण आश्चर्याची गोष्ट म्हणजे मी जेव्हा पडलो तेव्हाच लाल सिग्नल पडलं आणि माझ्यामागे येणारी सर्व वाहनं जशाच तशी थांबली. मी क्षणभर भयभीत तसाच चकीतही पण झालो. मात्र अंगाला दरदरुन घाम सुटला होता. जर ते लाल सिग्नल पडलं नसतं, तर मला उठायला वेळ सुद्धा मिळाला नसता. मी हीच संधी बघून कसा बसा उठलो आणि रस्त्याच्या बाजूला येऊन बस स्टॉपच्या शेडमध्ये थोडा वेळ घाबरलेल्या स्थितीत बसलो. माझ्या कमरेला मात्र थोडा किरकोळ मुका मार बसला होता. बाकी काहीच इजा झाली नव्हती. मी असहायपणे खाली पडलेला पाहून बाबांनी माझ्यामागे येणाऱ्या सर्व वाहनांना लाल सिग्नल दिला होता आणि मला मात्र हिरवा कंदील दाखवला होता. नाहीतर माझं काय झालं असतं ह्याची कल्पनाच करवत नाही. तो एक फार मोठा अपघात मात्र निश्चित माझ्या जीवनात झाला असता. साईचरित्राचे ते वाचायचे राहीलेले तिनही अध्याय अपूर्णच राहीले असते. पण बाबांनी मला

त्या भयानक अपघातातून सहीसलामत वाचवलं. सर्व व्यापी, बाबांनी माझ्या हाकेला 'ओ' दिला. माझ्या खिशात साईबाबांची उदी आणि गळ्यात बाबांचे लॉकेट नेहमीच असतं आणि म्हणून माझ्यावर कोसळणारी संकटं मला कधीच स्पर्श करीत नसतात.

समुद्रात बोटीवर संकटात सापडलेल्या खलाशांनी जर का वेळीच सॉस संदेश (Sos message) पाठविला तर जमिनिवरील बिनतारी केंद्र (wirelss station) तो संदेश अचूक पकडतो आणि ताबडतोब त्या बुडणाऱ्या खलाशांच्या मदतीला हेलीकॉप्टर वगैरे पाठविले जाते आणि त्याची त्या संकटातून सही सलामत सुटका केली जाते. साईबाबांची अद्भूत शक्ती ही पण असेच एक बिनतारी केंद्र आहे, आणि भक्ताने श्रद्धा, विश्वास व भक्ति ह्या यंत्राद्वारे पाठविलेला संदेश 'ते' केंद्र ताबडतोब पकडते आणि वेगाने आपले मदतकार्य पूर्ण करते.

मी आणि नंतर वेळ केला नाही. माझ्या निवासस्थानावर आल्यावर, साई-चरित्राचे ते राहीलेले तिनही अध्याय वाचून पूर्ण केले. अशा तऱ्हेने साईचरित्र पारायणाचा तो लांब तिन महिन्याचा प्रवास गोवा ते बंगलोर व्हाया पाँडीचरी, मद्रास तिरुपती, मार्गे समाप्त केला, आणि साईबाबांची ती अजब लीला अनुभवून, बाबांना धन्यवाद देत, त्या रात्री मी १९८१ मध्ये सकाळी लवकर उठवण्यासाठी बिनधास्तपणे झोपी गेलो.

# श्री साईबाबांनी मला घडविले

—प्रा. गुंडेराव पटवारी
एन. एफ. जे. कॉलेज, बिदर

● श्री संत चूडामणि भगवान साईबाबांचे अनेक उपकार आहेत. त्यांचे अनेक चमत्काराने माझे जीवन भरलेले आहे. जसे हयात असताना श्री रामकृष्ण परमहंस यांनी खोटे नरेन्द्रास खरे स्वामी विवेकानंद केले. श्री साईंनी हयात असताना श्री परम भक्त दासगणू महाराज यांना घडविले. तसेच हयातीत नसताना मला साई-बाबांनी अध्यात्म मार्ग दाखविले आणि एका स्त्रीच्या मोहात फसलेल्या ह्या गुंड्स शिरडीची वाट दाखवली !

माझे जीवन एक विचित्र आणि दुःखाने भरलेले, एक सपाट जीवन आहे ! लहानपणी वडिल वारले, केवळ आईनीच माझे पालन पोषण केले. मोठा झालो,

शिकलो, आई वडीलांचे पुण्याईने मला नोकरी मिळाली, विवाह झाला. मुला बायको बरोबर आनंदात जीवन चालले. येथवर देव न धर्म, केवळ आईस राग येतो म्हणून कुलाचरण संभाळत होतो. सोमवारी कुल दैवतेची पुजा नाटकीच होत होती. देवावर विश्वास नव्हता. वयाच्या पसतीस वर्षात एक दुःख आले, बायको स्वर्गास गेली, देवा वरचा विश्वास पूर्णच उडून गेला, देव नाहीच असे मन म्हणायचे, नंतर एक दोन वर्षांनी मी चारित्र्यहीन झालो आणि एका सुन्दर स्त्रीच्या मोहात फसलो, आईस विसरलो, मुला मुलींवर प्रेम केले नाही, त्या सुन्दर स्त्रीस कसे प्राप्त करावे हाच रात्रं-दिवस माझा छंद झाला !

या काळात, असल्या पाप कर्माकरिता अवलीया–संताचे दर्ग्यास आणि मंदिरास जाण्यास आरंभ झाला. या सुमारास मला साईबाबांच्या विषयी माहिती झाली. तेथे शरण गेल्यास मला माझी इच्छा पूर्ण होईल, असे मनात पाप भरून साईबाबांच्या चरणी नतमस्तक झालो, पण आश्चर्यकारक घटना घडली. पूर्वी मला साहित्य आणि राजकारणाचा छंद होता. शृंगार रस हाच माझा प्रिय रस, प्रथम साईबाबांवर एक कविता रचून एका पुस्तकात सुरक्षित ठेवली. पण ती कविता कशी काय मुंबईच्या ऑफिसात गेली कोणास ठाऊक. कारण मला मुंबईच्या कार्यालयाचा पत्तादेखील माहीत नव्हता. कोणी पाठविली ती माहीत नाही. १९७४ साली साईलीला इंग्रजी-मध्ये हिन्दी कविता प्रकाशित झाली. ही घटना बाबांच्या चरणांमुळे घडली. मला शिरडीस जाऊन बाबांची भेट घ्यावी असे वाटू लागले. प्रथम लेखक कवि संम्मेलनास जाण्याची संधी मिळाली. त्या दिवसापासून बाबांनी मला मोहातून सोडविले आणि भक्तीरसाचा पान करण्यास आरंभ केला. संमेलनात श्री सदानंद चेंदवणकर, डॉ. परचुरे, अण्णासाहेब गव्हाणकर, पूर्वीचे कोर्टरिसीव्हर श्री. पाटक साहेबांची भेट झाली त्यांच्या आशीर्वादाने आणि बाबांच्या कृपेने मी शिरडीच्या वाटेस कायमचा लागलो, असे बाबांनी मला कुमार्गातून सन्मार्गाला लावले,

बाबांचे अनेक चमत्कार मला अध्यात्म मार्गास कारणीभूत झाले. अनेक अनुभवांनी मला प्रेम शिकविले, मी कुठून कुठे आलो याचे मला केव्हा केव्हा आश्चर्य वाटते बाबांनी मला घडविले, मला मार्गास लावले, स्त्री मोहातून सुटलो आणि बाबांच्या मोहात फसलो. हेच माझे जीवन. हेच माझे अनुभव. जन्मो जन्मी मला बाबा मिळत रहावेत, मला मुक्ती नको–मनुष्य जन्म पाहिजे, आणि मी बाबांचा कुत्रा जरी झालो तरी माझे भाग्यच । साईचे अनंत उपकार आहेत धन्य साई–धन्य शिरडी

# शिर्डीतील दसरा उत्सव

382

—कु. रेखा दिघे

माणसाला कितीही संपत्ती मिळाली, संतती लाभली, तरीही त्यांच्या मनात खोल्वर कुठेतरी एक प्रकारची खंत असते, तो कधीही सुखी नसतो. याचे कारण काय ते जाणण्याचा प्रयत्न केला तर उत्तर सहजपणे मिळणे कठीण. प्रपंच्याच्या या संसारात बुडून असलेले हे मानवी मन सुखाच्या किनाऱ्यावर पोहोचण्याची आस मनात बाळगून या भवसागरातील लाटांवर हेलकावे घेत असते; कित्येकवेळा आपल्या सुखःदुखाचे मोजमाप करून पाहिले तर शेवटी उत्तर एकच, की हे तर क्षणभंगूर आहे. जेवढी जास्त सुखाची आस धरु तेवढी हाव जास्त वाढत जाते. व मन मात्र सतत बेचैन, दुबळच राहात. बुद्धीच्या कक्षेच्या पलिकडे साऱ्या गोष्टी जाऊ लागतात. बुद्धीची झेप, हे विश्वाचे कोडे उलगडू पहाते परंतु, ती फारच अपुरी पडते. अशावेळी मनाशी एखादी श्रद्धा बाळगूनच, समोर असलेल्या दैवी शक्तिला शरण गेल्याविना गत्यंतरच नसत व समाधानाची कास धरण्याशिवाय पर्यायच उरत नाही. अशा या विचित्र परिस्थितीतून मार्गक्रमण करण्याशिवाय गत्यंतरच नसत व त्यासाठीच मनुष्य कोणत्या ना कोणत्या तरी शक्तिच्या पुढे नतमस्तक होतो. आपल्या मनातील सुखःदुख या शक्तिसमोरच उघड करून त्यातून समाधान मिळविण्याची धडपड सतत करत असतो.

माझ्या समाधीची पायरी चढेल दुःख ते हरेल सर्व त्याचे ।। असं सांगणाऱ्या श्रीसाईबाबांचेसुद्धा अगणित भक्त या भूतलावर आहेत. महाराज एका वरातीबरोबर शिर्डीला आले, वरात खंडोबाच्या देवळाजवळ गेल्यावर, म्हाळसापतीची व त्यांची दृष्टादृष्ट झाली. त्यांना पाहिल्याबरोबर उत्कटपणे, म्हाळसापतीनी त्यांना हाक मारली 'आवो साईबाबा.' हे नाव बाबांनी शेवटपर्यंत धारण केले. हे कोण कोठले, याचा काहीही ठावठिकाणा नाही. श्रीसाईबाबा ही एक अत्यंत थोर व्यक्ति होती, एवढे मात्र निश्चित शिर्डी हे अहमदनगर जिल्ह्यातील लहानसे खेडे येथेच बाबा प्रथम का आले? हे मात्र न उलगणारे कोडे.

जगातील कानाकोपऱ्यातून, वेगवेगळ्या जाती धर्माचे लोक शिर्डीस येतात, व काही ना काही समाधान मिळवून जातात. आपले कर्तव्य करीत राहा त्यातूनच परमेश्वर प्राप्ती होईल. असे बाबा सांगत असत.

मनुष्य देहधारण करून जन्म घेणे व श्वासोच्छवास करणे म्हणजे जगणे नव्हे. परमात्मा प्राप्तीची ओढ असू द्या. कुत्रीदेखील आपली पोट भरतात. त्यांचाही वंश असतो. जेवणे, झोपणे म्हणजेच आयुष्य नव्हे. मग मानव व पशु यात भेद तो काय ? लोहाराचा भाताही हलत असतोच, मनुष्यप्राणी मुक्त आहे, निर्भय स्वतंत्र आहे, जसे दिव्याची ज्योत क्षणोक्षणी स्थिती पालटते तशीच मनुष्य देहाची स्थिती आहे. जो नरदेह प्राप्त झाला आहे, हा हाडामासांचा एक सांगाडाच आहे. त्यातील मी पणा विसरून पचेल तेवढेच घ्या. कशाचीही लालसा उराशी बाळगू नका. आपल मन आध्यात्माकडे वळवा. जन्ममरणाचा फेरा हा कोणालाच चुकलेला नाही. जशी वीज क्षणातच चमकून जाते. तशीच सुखदुःखाची स्थिती आहे. सागरात जशा लाटा तरंगतात तसेच वेगवेगळे विचार मनुष्याच्या मनात तरंगत असतात. देह हा नाशिवंत आहे. जन्ममरणाच्या भोवऱ्यातून प्रत्येक आत्म्याला जावयाचे आहे. परंतु याचा विचार करत बसण्यापेक्षा आपले कर्तव्य सतत करत रहा अखेरची घडी आली की तीस कोणीही थांबवू शकत नाही. कोळ्याच्या जाळ्यातील मासा जसा तडफडत असतो, तसा हा जीवही जातो. महद्‌भाग्याने जो हा मनुष्य देह लाभला आहे, त्यातील प्रत्येक क्षण अत्यंत मोलाचा आहे, याची जाणीव सतत उराशी बाळगून आजचे काम उद्यावर ढकलून आलेली संधी दवडू नका.

बाबा रोज द्वारकामाईत बसून लोकांशी थट्टा विनोद करीत असत यातूनच जीवनातील एखादे मर्म सहजपणे सांगून जात असत. इथेच बसून लोकांना औषधोपचार करीत, उदी देत, व स्वतःला ईश्वराचा बंदा सेवक म्हणून ' अल्ला भला करेगा ' असा आशिर्वाद सतत देत असत. या द्वारकामाईची थोरवी काही आगळीच आहे.

या शिर्डी क्षेत्री श्रीसाईबाबांनी शेवटपर्यंत वास्तव्य केले. शिर्डी गावाचा उद्धार केला. बाबा आपल्या भक्तांकडून ज्या गोष्टी करावयाच्या त्या नकळत करवून घेत असत, थोर संतांचे आयुष्यचमुळी, लोकांचा उद्धार करण्यासाठीच असते, त्यांना स्वतःला कशाचीही अपेक्षा किंवा इच्छा नसते. आपला देह फक्त परोपकारार्थ झिजण्यापलिकडे त्यांना काहीच ठाऊक नसते. श्रीसाईबाबांनीही आपल्या देहत्यागापूर्वी नागपूरचे परमभक्त श्री बापूसाहेब बुट्टी, आपल्या परिवारासमवेत शिर्डी येथेच वास्तव्य करून राहिले होते. शिर्डीत एक छोटीशी जागा घेऊन, त्यावर एक इमारत बांधून आपण स्वतंत्रपणे रहावे असे त्यांच्या मनात आले.

एके दिवशी पहाटे बाबांनी बुट्टीना व माधवरावांना स्वप्नात दृष्टांत देऊन वाडा बांधण्याची आज्ञा केली. तळघर, विहीरीचे काम पूर्ण झाले. त्यावर बाबा नित्यनियमाने लेंडीवर जाताना किंवा परत येताना देखरेख करीत असत, त्याचप्रमाणे

बांधकामाबद्दल मार्गदर्शन करीत असत. अशाप्रकारे काम पूर्ण होता होता यात एक गाभारा करून मुरलीधराची मूर्ति बसवावी अशी एक गोडशी कल्पना बुट्टींच्या मनात आली परंतु बाबांचे मनोगत समजल्याविना कोणतेही कार्य करावयाचे नाही हा तर त्यांचा नियम होता. बाबांच्या अनुज्ञेशिवाय कोणतेही काम ते करीत नसत. हा त्यांचा विचार त्यांनी माधवरावांना बोलून दाखवला. बाबा लेंडिवरून परत येत असताना, शामरावांनी बापूसाहेबांचे मनोगत बाबांना सांगितले, बाबा बापूसाहेब म्हणतात की, दालनाच्या दोन्ही भिंती पाडून मध्यभागी एक चौक बांधून त्यावर सिंहासनावर मुरलीधराची मूर्ती स्थापन करावी अशी त्यांची इच्छा आहे. परंतु बाबा मात्र यावर हसले, वाड्याकडे एकटक पाहून म्हणाले, हे देऊळ पूरे झाल्यावर आपणच इथे वस्तीस राहू. एकमेकांशी बोलू चालू. प्रेमाने एकमेकांस भेटू अशी बाबांची अनुज्ञा झाल्याबरोबर माधवरावांनी मुहूर्ताचा नारळ तावडतोब फोडला व चौथऱ्याचे कामास सुरुवात केली. मूर्ती बनविण्यास कारागीराला सांगितले, परंतु मनुष्य योजितो एक व होते दुसरेच.

नऊ तारीख विजयादशमीचा दिवस होता. दशमी सरून एकादशी सुरू झाली इसवीसन एकोणीसशे अठरा, या दिवशी बाबांनी आपला देह ठेवीला.

श्री साईबाबांच्या पुण्यतिथीचा सोहळा काही अपूर्वच. यंदा श्रीसाईबाबा पुण्यतिथी उत्सव दिनाक ७–१०–८१ ते १०–१०–८१ या चार दिवशी होता.

७–१०–८१ हा उत्सवाचा पहिला दिवस, या दिवशी सकाळी ठीक ६–०० वाजता श्रीसाईबाबांच्या फोटोची व पोथीची मिरवणूक श्रीसाईसमाधीमंदिरातून निघून चावडी गुरुस्थानमार्गे द्वारकामाईत जाऊन तेथे त्याचे अखंड पारायण सुरू झाले.

बाबांना नाचगाणे तमाशे याचीही आवड, तीच परंपरा कायमठेवण्यासाठीच जणू उत्सवाचे दिवशी नामवंत कलाकार बाबांचे दर्शनास येऊन त्याचे दरबारी येऊन हजेरी लावतात. व जो काही मोबदला मिळेल तोच बाबांचा महाप्रसाद समजून स्वगृही परततात. अशाच नामवंत कलाकारांपैकी एक अग्रगण्य मानले जाणारे गायक कलाकार छोटा गंधर्व यांच्या सुश्राव्य गायनाचा कार्यक्रम ७–१०–८१ रोजी आयोजित करण्यात आला होता. त्यानी जणू बाबांशी समरस होऊन आपल्या गोड गायनाने सर्व भक्तमंडळींना बाबांशी एकरूप करून टाकले होते.

दुसरा मुख्य दिवस दसऱ्याचा सर्वांच्या जितका आनंदाचा तितकाच दुःखाचाही. याच दिवशी श्रीसाईबाबांनी देहत्याग केला. सकाळी ठीक ६–०० वाजता फोटो व पोथीची मिरवणूक द्वारकामाईतून निघून गुरुस्थान मार्गे समाधीमंदिरात जाते यानंतर भिक्षा झोळीचा कार्यक्रम.

करतल भिक्षा पाच धरा ।
तरुतला वासा अष्टौप्रहरा ।
करुन थिटा प्रपंच प्रसारा ।
व्यवहार सारा शिकविती ।

श्रीसाईबाबा रोज पाच घरी भिक्षा मागीत असत. एका हंडीत ते एकत्र करून ठेवित असत. व आपल्या भक्तजनांना प्रसादरूपाने देत असत. हा भिक्षा झोळीचा कार्यक्रमही फार अपूर्व असतो. भक्तगण गळ्यात झोळ्या घेऊन सबंध गावातून मिरवणूक काढतात. प्रत्येक घरात जाऊन मिळेल ती भिक्षा स्वीकारतात, व त्याच झोळीतील चिमूटभर धान्य प्रसादरुपाने भिक्षा देणाऱ्यास परत देतात. दुपारी १२ च्या नंतर, मंत्रघोषात बाबांचे आराधनाविधीचा कार्यक्रम सुरु होतो. यावेळी ब्राह्मण व सवाष्ण यांना योग्य ते दान दिले जाते. सायंकाळी ५-०० वाजता गावातील मंडळी सिमोल्लंघनास जातात. एकमेकांना अलिंगन देऊन सोने लुटतात. रात्री ठीक ९-०० वाजता रथाची मिरवणूक, पहिल्या दिवशीच्या पालखीच्या मिरवणूकीचा उत्साह आजही तेवढाच कायम असतो. पालखी प्रमाणे रथाची मिरवणूक सबंध गावातून निघून मंदिरात येते. यात प्रामुख्याने दृष्टीस पडतो तो भारूडाचा कार्यक्रम, गुरूस्थाना पाशी रथ व पालखी यांचे विश्रांतीस्थान, इथेच भारूडाचा उत्कृष्ट कार्यक्रम होतो व नंतर भक्तगण समाधीमंदिरात जातात. यादिवशी मंदिर रात्रभर उघडे ठेवण्यात येते व ठिकठिकाणचे कलाकार येऊन आपापलेपरीने बाबांचे समोर हजेरी लावतात. एक रुपया व श्रीफळ स्विकारून समाधान पावतात.

तिसरा दिवस एकादशीचा या दिवशी विशेष असा कार्यक्रम काही नाही.

चौथा व शेवटचा दिवस काल्याचा. बाबांचे वेळेपासून चालत आलेली ही प्रथा. काल्याचे किर्तनाचा प्रसाद घेतल्याशिवाय भक्त घरी जात नाहीत. त्याचा अव्हेर करणे म्हणजेच बाबांचा अवमान अशी त्यांची गाढ श्रद्धा.

दिनांक १०–१०–८१ रोजी सायंकाळी ७ वाजता सौ. रजनी जोशी यांचे सुश्राव्य गायन आयोजित केले होते. प्रत्येक गाण्यामागे, श्री साईबाबांबद्दल अगाध भक्ती व दृढ श्रद्धा होती. गाणे ऐकण्यात तल्लीन झालेल्या भक्तांना क्षणोक्षणी, बालगंधर्वांची आठवण करून देण्यातच सौ. रजनीताई गुंग झाल्या होत्या असे म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाही. गाताना क्षणोक्षणी त्यांच्या चेहऱ्यावर बाबांचे दरबारी हजेरी लावण्याची संधी लाभल्याचा आगळाच आनंद ओसंडत होता.

अशा तऱ्हेने हा चार दिवसांचा सोहळा मोठ्या आनंदी व उत्साही वातावणात पार पडला.

# ● 'भक्तप्रतिपाल धन्वंतरी श्री साईबाबा' ●

—सौ. लीलादेवी मु. पंडित
सुदर्शन, घनश्याम पंडित रोड,
राजकोट

● भक्तांची अनेक दुखणी व रोग श्री साईबाबांच्या उदीउपचाराने नाहीसे झाल्याचे अनेकांना अनेकवेळी अनुभव आलेच आहेत. मलाही तसे अनुभव पुष्कळदा आलेले आहेत, परंतु १९८० ते १९८१ चे दरम्यान जो अनुभव आला तो प्रकाशित केल्याशिवाय रहावत नाही. १९८० च्या सुरुवातीसच माझ्या उजव्या पायाच्या गुडघ्याच्या बाजूला एक गाठ उद्‌भवली. ती दिन प्रतिदिन वाढत जाऊन शेवटी मोठ्या लिंबाएवढी झाली. परंतु ती गाठ दुखत नसल्याने तिच्या वाढीबरोबर माझी चिंताही वृद्धिंगत होत होती. म्हणून नंतर मी आमच्या फॅमिली डॉक्टरांना दाखविली. तेव्हा त्यांच्यां मते ऑपरेशन करून बायॉप्सी करविणे आवश्यक होते. अर्थात मला धसकाच बसला. दुसऱ्या दिवसापासून म्हणजे सुमारे ४–५ महिन्यापूर्वी पासून मी त्या गाठीवर सकाळ संध्याकाळ कळकळीने श्री बाबांचे नामस्मरण करून नुसती उदी लावीत होते आणि ती उदीच रामबाण औषध ठरली. आज ३॥–४ महिने त्या गाठीचे नाव निशाण दिसत नसून ऑपरेशन वगैरेचा प्रश्नच उरला नाही.

श्रीबाबांची कृपा व भक्तांप्रति सहानुभूतीचे अनेक प्रसंगी अनुभव आम्हाला आलेले आहेत. तरी माझे मते व्याधी परीहारासाठी श्री बाबांची उदी हाच एक अक्षीर इलाज आहे. अनन्य श्रद्धा आणि निस्सीम भक्ती असल्यास साईभक्ताकरिता एकच मंत्र असू शकतो तो म्हणजे–'शरीरे जर्जरी भूते व्याधीग्रस्ते कलेवरे उदीही जान्हवी तोयं वैद्यो श्री साई हरी' हाच मंत्र तारक ठरतो. धन्य त्या श्री साई माऊलीची की सूक्ष्म देहीसुद्धा ती भक्तांच्या हाकेला धावून येते. अशा कनवाळू माऊलीच्या चरणी आमचे सहस्रशहः दंडवत असोत.

# अन् मी साईवेडा झालो !

—श्री. टी. जी. जाधव
नवीन भेंडी पाडा, बॉम्बे मेल्याबल समोर,
बदलापूर रोड, अंबरनाथ ४२१५०१

● मी प्रांजळपणे लिहितोय. अजूनपर्यंत माझा श्री बाबांवर अजिबात, काडी-चाही विश्वास नव्हता. तसेच इतर कोणाही साधु, संत पुरुषांवर सुद्धा. पण एक दिवस एक घटना अशी घडली की शेवटी मला बाबांचा अवतार मानावाच लागला.

मी सकाळी नेहमीप्रमाणे स्नानसंध्या आटोपून कामानिमित्त घराबाहेर पडलो. नेहमीप्रमाणेच काम काही झालेच नाही. मात्र वेळ फारच झाला. सकाळी सहा वाजल्यापासून दुपारी दोन वाजेपर्यंत ताटकळत बसावे लागले. शेवटी कंपनीत ज्या कामासाठी गेलो होतो तिथे सांगण्यात आले आज काही काम होणार नाही. तुम्ही उद्या दुपारी २ वाजता या. मी निराश मनाने तिथून उठलो, पण उठायचे त्राण माझ्यात शिल्लक नव्हते. पोटात कावळे काव काव करून आणखीनच भुकेची आठवण करून देत होते. जवळ नवीन एक पैसाही नाही. अशा अवस्थेत मी घरून निघालेला माणूस कामधंदा नाही अशा माणसाला पैसा उधार तरी कोण देणार ? प्रयत्न करून पाहिला; पण व्यर्थ. नाईलाजाने मी घरचा रस्ता धरला. पण भुकेमुळे मला धड चालताही येईना. कसातरी रस्ता चालावा म्हणून चालत होतो.

रस्त्याच्या कडेला फूटपाथवर एक भिकारीचित्रकार नुकतेच साईबाबांचे चित्र काढून बसला होता. बरीच गर्दी ते पाहाण्यासाठी जमली होती. मीही ते पाहाण्यासाठी गर्दीत शिरलो. नकळतच माझे दोन्ही हात त्या साईंच्या चित्राला जोडले गेले, व मी मनातच म्हणालो, बाबा ! मला आता ह्यापुढे चालवत नाही. भुकेने जीव व्याकूळ झालाय. काही तरी व्यवस्था करा, आणि पुढे चालू लागलो. आणि काय आश्चर्य मला चालताना अजिबात त्रास जाणवला नाही, आणि विशेष म्हणजे ज्या गल्लीतून मी कधीच जात नाही त्या गल्लीतून मी नकळतच चालू लागलो. एवढ्यात एका खोलीच्या दारातून (जी खोली त्या गल्लीतच आहे) जात असता अचानक मागून आवाज आला. अरे जाधव, बरा भेटलास ये. ये. जेवायला बस, आणि हे बोलणारा माणूस माझाच मित्र जो त्या खोलीत रहात होता. पण तो कोणालाही कधी पाणी पी म्हणून

न सांगणारा कुणासाठी काहीही खर्च न करणारा असा तो चिक्कू मारवाडी माणूस मला जेवायला बोलावत होता. आश्चर्यच म्हणावे लागेल. मी भुकेलेलाच होतो. बसलो जेवायला.

जेवत असताना जेव्हा मी पहिलाच घास उचलला व तोंडात घालणार तोच मला बाबांचा साक्षात्कार झाला. एक फकीर म्हातारा दारात उभा होता. हुबेहूब त्या चित्रातल्या सारखाच. ते पण एक सेकंदसुद्धा नसेल. माझ्याकडे बघून मंद हास्य करून पुढे गेला. मी हातातला घास खाली ठेवून उठणार तोच माझा मित्र मला म्हणतो, अरे उठतोस का? चल लवकर आटप मलाही जरा बाहेर जायचे आहे. तेव्हा कुठे मी भानावर आलो व मला आठवण झाली, मी बाबांच्या चित्रापुढे केलेल्या प्रार्थनेची. माझे जेवण वगैरे झाले व मी मित्राचा निरोप घेत घरचा रस्ता धरला.

मी जसजसा ह्या घटनेचा विचार करू लागलो तो तो माझा विश्वास अधिकाधिक बाबांवर बसू लागला. इतका विश्वास बसला की मी साईवेडा झालो. साईभक्त झालो. माझ्या आयुष्यातला हा पहिलाच प्रसंग पण मी तो शेवटपर्यंत विसरणार नाही.

+++


## अक्कलकोट स्वामीदर्शन त्रैमासिकाचा

**जाने-फेब्रु-मार्च १९८२ (गाणगापूर यात्रा दरम्यान)**

# "श्रीसाईबाबा विशेषांक"

प्रकाशीत होणार आहे. **किंमत फक्त ३ रुपये** साईभक्तांनी आपले अनुभव, लेख, कविता पाठवावे, रु. ३/- पाठविल्यास अंक घरपोंच मिळेल.

अक्कलकोट स्वामी दर्शन ची ४ अंकासह वार्षिक वर्गणी फक्त रु. १०/- १ जानेवारी पासून वर्गणी रु. १५/- होणार आहे. स्वामींच्या रंगीत पॅकेट साईज फोटोसाठी, सेवा जप पत्रकास देवीच्या माहितीसाठी आपल्या पत्याचे पोस्ट पाकीट पाठवा. श्रीसाईबाबांच्या अंकाबरोबर सर्वांग सुंदर पॅकेट साईज फोटो मिळेल.

जाहीरातदारानी आपली जाहीरात ३० जानेवारी पर्यंत पाठवावी.

संपर्क साधा :- **संपादक अक्कलकोट स्वामी दर्शन,**

६७६, दक्षिण कसबा, सोलापूर-४१३००१

# — काशी ते शिर्डी पायी यात्रा —

—स्वामी संजयानन्द
पो. मु. बद्रिनाथधाम–हिमालय
व्हाया ह्रषीकेश

● ही हकीकत बारा, तेरा वर्षापूर्वीची आहे. आम्ही संन्यासी दम्पत्ती त्यावेळी काशीला होतो. एके दिवशी गंगेच्या तीरावर असेच आनंद घेत बसलो असता अचानक आमच्या समोर एक म्हातारा येऊन उभा राहिला व तो हिन्दी भाषेत आम्हाला म्हणाला की येथे बसून काय करता तुम्ही ? शिरडीला या. पण तीन अटीवर 'पैशाला शिवायचे नाही. कुणाजवळ मागायचे नाही व हॉटेलात खायचे नाही.' अशा तीन अटीवर शिरडीला यायचे. असे बोलून तो म्हातारा फकीर निघून गेला. तो कुठे गेला हे मात्र आम्हाला कळले नाही. यावर आम्ही दुसऱ्याच दिवशी पायी यात्रेला सुरवात केली. हा जो अनुभव आहे. तो शेवटी शिरडीला पोहोचल्यावर बाबांनी कसे दर्शन दिले, तो देत आहे.

आम्ही ज्यावेळी यात्रा सुरु केली त्यावेळी सर्व व्यवहार आम्ही नियम पूर्वक करून घेतले. शक्यतो आड मार्गाने जावयाचे ते पण लहान लहान खेडेगावातून जायचे संध्याकाळ झाली की गावातल्या मंदिरात मुक्काम करायचा कोणी न सांगता काही खायचे आणून दिले तर खायचे व सकाळी उठून आपला मार्ग धरायचा. अशा ह्या पायी यात्रेत बाबांचे अनेक अनुभव आले ते साईलीला मासीकांत दिले आहेत, व हा अनुभव यात्रेतील शेवटचा आहे.

आम्ही शिरडीला पोहोचणार त्याच्या आदल्या रात्री आमचा मुक्काम 'रुई' गावात ( शिर्डी जवळ २ मैलावर ) विठ्ठल मंदिरात झाला. आम्ही रात्री तसेच झोपलो कधी खायला मिळायचे तर कधी नाही. त्यावेळी आम्हाला दोन दिवस अन्नच मिळाले नव्हते. सकाळी उपाशी पोटी उठून आम्ही आपले सामान घेऊन निघालो. रस्त्यात एका विहीरीवर तोंड धूतले. चहा मिळाला तर मिळाला, नाही तर नाही. त्या दिवशी आम्हाला चहा मिळाला नाही. आम्ही विचार केला. आता आपली शेवटचीच परिक्षा आहे. शिरडी फक्त आता दोन ते तीन मैल असेल. मग बाबांची आज्ञा पण पूर्ण होईल. बाबांचेच नाव घेत चालत चालत दुपारी मध्यान्ह आरतीच्या वेळी आम्ही

शिरडीत पोहोचलो. आरती झाल्यावर विचार केला की आपली यात्रा संपली आता बाबा पुढची आज्ञा करतील म्हणून मंदिरात बसलो. भूक फार लागली होती. (खोली घेण्यासाठी पैसे नव्हते. त्यावेळी ३ रुपये डिपॉझिट होते) पण सांगणार कोणाला बाबांची आज्ञाच तशी होती म्हणून संस्थानातील कर्मचारी यांच्या जवळ बोल्लो नाही. शिरडीला खोली घ्यायची तर पैसा पाहिजे व आम्ही पैशाला शिवत नव्हतो. आणि आमची पायी यात्रा आहे, असे पण आम्ही कुणाला सांगितले नाही बाबांच्या विश्वासावर मंदीरात बसून राहीलो.

दुपारी दोन अडीच वाजेपर्यंत बसल्यानंतर मी पत्नीला म्हणालो की येथे बसून काय करणार बाबांची पुढची आज्ञा काही झाली नाही. तेव्हा आपण निघू.

तशा अवस्थेत आम्ही शिरडीहून कोपरगावला पायी आलो, व रेल्वेस्टेशनवर बसलो. संध्याकाळ झाली होती. खायला काही मिळालेले नाही, व चालून चालून थकलो. रेल्वे स्टेशनवर गाडीची वेळ नसल्यामुळे पॅसेंजर वगैरे कोणीही नव्हते. प्लॅटफार्म पूर्णतया खाली होते, व वातावरण एकदम शांत होते. आता पुढे काय करायचे कुठे जायचे असा विचार आम्ही करीत होतो.

इतक्यात एक फकीर माझ्याजवळ येऊन म्हणाला 'बेटा कुछ खाना मिलेगा' त्यावर मी उत्तर दिले की 'बाबा एक भूका, दुसरे भूकेको क्या देगा? फकीर म्हणाल अच्छा तुम भूका है? ठिक है। म्हणून तो फकीर निघून गेला व नंतर पाच मिनीटात परत येवून मला आपल्या हातातील नव्या रुमालाची पोटली देत म्हणाला ये रखलो बेटा. मी ती पोटली घेऊन उघडून पाहीली तर काय आश्चर्य. त्या पोटलीत नवी कोरी नाणी होती. माझ्या मनात विचार आला की हा फकीर आता भिक मागत होता तर मग इतक्यात याच्या जवळ हे एवढे पैसे कोठून आले.

त्यावर फकीर म्हणाला 'रखलो बेटा. हम तो फकीर है हम तो मांग सकते हैं तूम नहीं माँग सकते. एवढे बोलून तो फकीर अंधारात कोठे गेला त्याचा पत्ता नाही लागला. आम्ही समजलो बाबांनी आम्हाला पैशाला शिवायची परवानगी दिली. मग मी खायचे पदार्थ वगैरे आणून जेवण केले, व दुसऱ्या दिवशी पंढरपूर यात्रेसाठी रवाना झालो.

# मरावे परी कीर्तिरुपी उरावे

—कु. रेखा दिघे



श्री. डी. डी. नेरॉय व श्री साईबाबा संस्थान यांचा गेली ३० ते ३५ वर्षे फार घनिष्ठ संबंध आहे तो त्यांच्या फोटोंचे ब्लॉक बनविण्याच्या व्यवसायामुळे. श्री साईबाबांचे उत्कृष्ठ, वेगवेगळे ब्लॉक श्री. नेरॉय यांनी आजपर्यंत केवळ श्री साईबाबांबद्दल भक्तिमुळेच करून दिले, व प्रत्येकवेळी त्याकडे केवळ साईभक्तिच्याच दृष्टीकोनातून पाहिले.

श्री. नेरॉय यांचा जन्म २८-२-१९०१ रोजी झाला. फोटोंचे ब्लॉक बनविणे हाच त्यांचा प्रमुख व्यवसाय. हा व्यवसाय त्यांचे वडिल श्री. द्वारकानाथ भाऊ नेरॉय यांनी १८९८ मध्ये सुरू केला. सन १८९८ मध्ये त्यांचे वडिलांनी D. B. Neroy कंपनी या नावाने ब्लॉक बनविण्याच्या व्यवसायात प्रवेश केला. श्री. द्वारकानाथ भाऊ नेरॉय सन १९२२ मध्ये स्वर्गवासी झाले. त्यामुळे एवढ्या मोठ्या व्यवसायाची तसेच घरातील सर्वतोपरी जबाबदारी श्री. डी. डी. नेरॉय यांचेवरच वयाच्या २३ व्या वर्षी पडली. वडिलांनी चालविलेला एवढा मोठा व्यवसाय कोणाच्याही मदतीशिवाय चालवणे म्हणजे त्याकाळी एक फार मोठे धारिष्ट्यच होते. एवढा मोठा प्रपंच सांभाळून त्यांनी आयुष्यातील एक फार मोठं आव्हान स्विकारलं व त्यातून यशस्वी वाटचाल करण्यास सुरुवात केली.

लहान भाऊ वयात आल्यानंतर त्यांनी आपली वडिलोपार्जित कंपनी आपल्य लहान भावाच्या हाती सुपूर्त केली व एका कर्तव्यातून ते मुक्त झाले. परंतु त्याचबरोबर स्वतःच्या संसाराची जबाबदारी त्यांच्यावर होती, याचा त्यांना विसर पडला नाही. सन १९४४ साली D. D. Neroy या नावाने स्वतःची कंपनी सुरू करून, या व्यवसायात त्यांनी एवढा नावलौकिक मिळवला की आज फोटोंचा ब्लॉक म्हटला

म्हणजे जाणकारांच्या डोळ्यासमोर डी. डी. नेरॉय हे नाव सहजपणे उभ राहात याचे शिक्षण घेण्यासाठी ते दोनदा जर्मनीला जाऊन आले व त्यातील प्रविण्याबद्दल त्यांना Hamburg मध्ये सुवर्णपदकही मिळाले आहे. अशा तऱ्हेने स्वतःच्या पायावर, कर्तृत्वावर व स्वतःच्या हुषारीवरच त्यांनी या व्यवसायात एवढा नावलौकिक मिळवला. या थोर व्यक्तिमत्वाच्या मागे श्री साईबाबांची फार मोठी शक्ति होती. श्री. नेरॉय बाबांचे गाढे भक्त. बाबांची सेवा निस्वार्थीपणाने करणारे नेरॉयसाहेब बाबांची कामे नेहमी उत्साहाने व कमीत कमी वेळात करीत असत.

श्री. नेरॉय यांचे थोरले चिरंजीव श्री. भालचंद्र दत्तात्रय नेरॉय सन १९६० पासून जर्मनी येथे स्थायिक आहेत. तेही आपल्या वडिलांचाच व्यवसाय जर्मनीत करतात.

त्यांचे द्वितीय चिरंजीव श्री. सुभाष नेरॉय हे मुंबईतच असतात. सन १९५६ मध्ये एस. डी. नेरॉय कंपनीची स्थापना करून श्री. सुभाष नेरॉय यांनी आपला वडिलोपार्जित नावारूपास आलेला व्यवसाय सुरू केला.

कै. नेरॉय यांचे नातू श्री. संदीप हेही अत्यंत लहान वयातच या व्यवसायात आपले वडील श्री. सुभाष नेरॉय यांना मदत करतात. चौथ्या पिढीतही हा व्यवसाय, एवढ्या मोठ्या प्रमाणावर चालू रहाणे हा योगायोगच म्हणावा लागेल

अशा प्रकारे सन १८९८ सालापासून चालत आलेला हा वडिलोपार्जित व्यवसाय तितक्याच उत्कृष्टपणे चालत आलेला आहे. तुटपुंजे शिक्षण असलेले हे व्यक्तिमत्व आज जरी हरपले असले तरीही शून्यातून वर आलेले नेरॉय साहेब आजही त्यांच्या व्यवसायातील प्राविण्यामुळे आपल्यात अजरामर झाले आहेत. कै. नेरॉय यांची साईभक्ती एवढी नितांत होती की, त्यांना मृत्यूही गुरुवारीच आला. हे कोडे उलगडत नाही. त्यांच्या मृत्यूमुळे निर्माण झालेली ही पोकळी खचितच कधीही भरून निघणार नाही.

ईश्वर मृतात्म्यास सद्‌गती देवो हीच साईचरणी प्रार्थना.

✦✦✦✦✦✦

# निर्वाणीची हाक मारा बाबा धावून येतात

—श्री. महादेव दत्तात्रय भिडे
११९५ सदाशिव पेठ, पुणे ३०

● हे अक्षरशः खरे आहे. दि. ३ व ४ फे. १९८१ रोजी शिरडीस लेखक, कवी संमेलन होते. त्याचे रीतसर मला निमंत्रण कार्डही आले होते. माझ्या डाव्या पाऊला-वरील इसबाच्या त्रासाने मी त्रासून गेलो होतो. घरी चालणेही मुष्कील झाले होते. लेखक, कवी संम्मेलनास जाऊन बाबांचे दर्शन घ्यावे ही अंतरीची तळमळ होती. नियमानुसार १६–१–८१ रोजी येतो असे रितसर मी पत्राने कळविलेही असल्याने काय करावे या विचारात होतो. माझे स्नेही श्री. डी. बी. पोतनीस साईप्रेमी हे आले व मला म्हणाले 'चला जायच ना संम्मेलनास. मी त्यांना इसबाच्या त्रासाची अडचण सांगितली. सोमवार सकाळपर्यंत' मला चालता येऊ लागले तर मी दुपारचे २ चे एस. टीस येत आहे पण निश्चीत समजू नका. बाबांची इच्छा ते काय करतील ते खरे.

दि. ३१ रोजी माझे दुसरे स्नेही श्री. र. श्री. पुजारी साईपोथीचे लेखक हे सकाळी घरी आले. मला त्यांनीही शिर्डीस जायचे ना...चला. सोमवारी दुपारी मी व स्नेही श्री. कुळकर्णी फोटोग्राफर जाणार आहोत. मी त्यांना पायाचा त्रास सांगितला तेव्हा ते म्हणाले ' चला आम्ही आहोत, काळजी करू नका. ' त्यांना मी येईन पण चालता आले पाहिजे, व रिझरव्हेशनही मी केले नाही हे सांगताच ते म्हणाले 'मी उद्या सकाळी तुमचे रिझरव्हेशन करून आणतो. ' मी त्यांना रिझरव्हेशन करण्यास सांगितले.

श्री. र. श्री. पुजारी यांनी माझेकरता कष्ट घेऊन दि. १।२।८१ रोजी रविवारी सकाळी २ तिकीटे पुणे–मालेगाव एस. टी. ची आणून दिलीही. दि. १।२।८१ रात्री पहाटे ४ वाजता मी बाबांची मनोमन प्रार्थना केली व 'माझा पाय चालता येईल इतपत बरा करा. मला शिरडीस यावयाचे आहे, ' प्रार्थना काव्य रुपात केली. ती अशी ' साई ने साई मजसी शिरडीसी मुकेला तव दर्शनासी. '

ही कविता या अनुभव लेखात खाली दिली आहे. माझ्या पायास मी त्या दिवशी कणकेचे पोटीस बांधले होते. निचरा व्हावे म्हणून. त्याप्रमाणे पाय हल्का झाला. मला चालता येऊ लागले. रविवारी मी घरी हिंडू लागलो. बाबांनी माझी प्रार्थना

ऐकली व मला शिर्डीस जाता यावे म्हणूनच की काय श्री. पुजारी यांनी रविवारी सकाळी १० वाजता रिझर्व्हेशन तिकिटे आणून दिली व चलण्याचा आग्रह केला. एकीकडे पायाचे इसबाचे दुःख सांगत होते जाऊ नको व दुसरीकडे मन सांगत होते, श्रद्धा ढळू देऊ नको असे तूच तुझ्या काव्यात लिहिलेस ना ! ह्या मनाच्या हेलकाव्यात मनाने कौल दिला–जा म्हणून. श्रद्धा ढळू देऊ नको. बाबा समर्थ आहेत.

सोमवारी सकाळी मला त्रासाविना चालता येऊ लागले. मी घरी सांगून टाकले नी शिर्डीस जाणार. तुम्ही कोणी बरोबर या अगर येऊ नका. गेल्या वर्षी मी व माझी पत्नी असे दोघेजण संम्मेलनास गेलो असल्याने या वर्षीही जावे म्हणून प्रयत्न केला. पण घरच्या काही अडचणी व पाहुणे येणार म्हणून माझ्या पत्नीने नकार दिला होता. पण बाबांचेवर श्रद्धा ठेवून मी सोमवारी दुपारचे मालेगाव एस. टी. ने शिर्डीस गेलो. बरोबर श्री. पुजारी व कुलकर्णी फोटोग्राफर व श्री. पोतनीस ( पिंपरी ) हे होते. त्यांना पाहून आनंद झाला. रात्री सोमवारी ८॥ वाजता शिर्डीस पोचलो. बाबांचे दर्शन घेतले. खूप आनंद झाला. दि. ३ व ४ फे. रोजी संम्मेलनास गेलो. संम्मेलन चांगले यशस्वी झाले. साईभक्तांच्या भेटीचा लाभ झाला. संम्मेलन आटोपून आम्ही गुरुवारी सकाळचे शिर्डी पुणे मोटारने परत आलो. शिरडीस असेपर्यंत मला इसबाचा काहीही त्रास झाला नाही. पायात बूट न घालता मी हिंडत होतो. पहाटेची काकड आरती, दुपारची व सायंकाळ व रात्रीची आरती व बाबांचे दर्शन रोज मला घेता आले. मला आलेला बाबांच्या कृपेचा अनुभव. मी बाबांची प्रार्थना केली. ती खाली दिली आहे.

## प्रार्थना

साई ने साई मज शिरडीसी
भुकेला तव दर्शनासी ॥

देहाने मी थकलो
व्याधीने जर्जर झालो
त्रासाने गांजून गेलो
चालणेही मुष्कील झाले मजसी ॥ १ ॥

माझ्या हातून सेवा व्हावी
होईल ती मानून घ्यावी
ही आस मज पुरवावी
करी विनती तव पायासी ॥ २ ॥

कोणाही रूपे यावे
घेऊन मजसी जावे
हे अशक्य नसे, ठावे
पंगूही गीरी चढवीसी ॥ ३ ॥

माझे स्नेही र. श्री. पुजारी व पोतनीस यांच्या रूपाने बाबांनी मला शिरडीस येण्याचा आग्रह केला व मला ते शिरडीस घेऊन गेले. असेच मी झालेल्या सर्व घटनावरून समजतो. रविवारी सकाळी माझ्या मोठ्या मुलाने मला, तो मुंबईस जाताना, रुपये शंभर दिले व शिरडीस जाऊन या असे सांगितले. मी काही पैसे मागितलेले नव्हते. न मागता त्यांनी दिलेली रक्कम श्री. र. श्री. पुजारीची मदत व शिरडीसही त्यांची मला वेळोवेळी झालेली मदत व मला परत सुखरूप परत पुण्यास आणून घरी सोडणे ही सर्व बाबांची किमया होय. निर्वाणीची हांक मारा. बाबा धावून येतात हे अक्षरशः खरे आहे फक्त श्रद्धा पाहिजे. ●

## श्री. श्रीराम सातर्डेकर यांचे गान शतक

● सुप्रसिद्ध भक्तिसंगीत गायक, साईभक्त श्रीराम विष्णु सातर्डेकर यांच्या भक्ती-संगीत गायनाचा १०० वा कार्यक्रम शिरडी येथे संत चूडामणी श्रीसाईबाबा यांच्या समाधिमंदिरात दि. ६-१०-८१ रोजी झाला. गेली ३६ वर्षे श्रीबाबांच्या प्रत्येक उत्सवाला स्वखर्चाने येवून आपला कार्यक्रम करून आज सतत १०० कार्यक्रम अवि-रत करण्याचा पहिला भाग्यवान म्हणून त्यांचा गौरव करण्यात आला. श्री साईबाबा संस्थानचे रिसीव्हर श्री. क. हि. काकरेसाहेब तसेच शासकीय अधीक्षक श्री. द. चिं. पाठकसाहेब श्री अवधूत रावजी शिंदेसाहेब. श्री. गोपीनाथ कोते. पाटील आणि अनेक मान्यवर मंडळी, या कार्यक्रमास उपस्थित होती. मंदिरप्रमुख श्री. बागवेसाहेब यांनी कलाकाराचा उपस्थित मंडळीना थोडक्यात परिचय करून दिला आणि संस्थानतर्फे श्री. द. चि. पाठकसाहेब यांनी असेच सतत १५० कार्यक्रम व्हावेत असा आशिर्वाद दिला व शाल श्रीफळ देऊन गौरव केला.

# उदी आणि साईनामाचा गजर

—सौ. लता हसमुख पाटील
गुजरगल्ली, मु. पो. ता. नवापूर, जि. धुळे
पिन ४२५४१८

● सन १९८० च्या मे महिन्यात मला आलेला हा अनुभव आहे. १५ मे पासून पुण्य पवित्र असा अधिक महिना नुकताच सुरू झाला होता. अधिक महिना सुरू होऊन तीनचार दिवस झाले असतील. माझी बारा वर्षांची मुलगी वर्षा मला एके दिवशी अचानक सांगू लागली, आई ! तुझ्या पाठीवर हे पांढरे चट्टे कसले आहेत. सुरुवातीला माझा विश्वासच बसेना. परंतु जेव्हा मी मागे आरसा धरून आरशात पाहिले तेव्हा मला माझ्या पाठीवर दोन तीन पांढरे व साधारण लालसर असे चट्टे दिसून आले. मी माझ्या पतींना दाखविले असता तेही म्हणाले की हे पाटीवर चट्टे कसले आहेत ? एखाद्या चांगल्या डॉक्टरला आपण दाखविले पाहिजे. परंतु लहान लहान असल्यामुळे बरे होऊन जातील असे पतीला सांगून मी सुद्धा दुर्लक्ष केले.

परंतु हळूहळू ते चट्टे मोठमोठे होऊ लागले व मला भीति वाटू लागली की हा कातडीचा एखादा रोग तर नाही ना ! त्या दरम्यान आमच्याकडे माझी चुलत नणंद आली होती. त्या नर्स होत्या, मी त्यांना हे चट्टे दाखविले असता त्या म्हणाल्या की ही तर एलर्जी आहे. एखाद्या चांगल्या डॉक्टरला दाखव.

परंतु डॉक्टरला न दाखवता ह्याच्यावर बाबांच्या उदीचा प्रयोग करून पहावा, म्हणून मी रोज रात्री झोपताना त्या चट्ट्यावर उदी चोळून घेत असे आणि बाबांचे नाव घेत झोपी जात असे. तसेच दिवसातून सुद्धा दोन तीन वेळा ह्या चट्ट्यांवर मी उदी लावून घेत असे, आणि काय आश्चर्य म्हणावे ? 'बाबांच्या उदीची लीला खरो-खरच अगाध आहे !' दोन तीन दिवसातच माझ्या पाठीवरचे हे चट्टे हळूहळू कमी होऊ लागले आणि अवघ्या आठच दिवसात माझ्या पाठीवर ह्या चट्ट्यांचे थोडे देखील चिन्ह राहिले नाही. पाठीवरची कातडी अगदी पूर्ववत झाली. 'खरोखर ! बाबांची उदी म्हणजे असाध्य रोगावरील एक रामबाण उपायच होय' ! असा श्री साईबाबांच्या उदीने चमत्कार दाखविला, म्हणून श्री साईबाबांना त्रिकाल चरणी मस्तक ठेवून वंदन करते.

# ॥ बाबा सारखा देव नाही ॥

–सौ. शीतल शिरीष आकलेकर
डोंबिवली ( पूर्व )

● ॥ जाणा येथे आहे सहाय्य सर्वास ॥ मागे जे जे ज्यास ते ते लाभे ॥

हे बाबांच वचन कधीच खोट नाही. बाबा आम्हाला सदासर्वकाळ सहाय्य करतात. त्यांच्याबद्दल काय लिहावे आणि त्यांचे कोणत्या शब्दात वर्णन करावे हे मला सुचत नाही.

आज पर्यंतच्या माझ्या जीवनामध्ये प्रत्येक संकटातून श्रीबाबांनी धावून येवून मला मदत केली आहे. माझ्या लग्नातसुद्धा किती तरी अडचणी आल्या पण बाबांनी माझी पाठ कधीच सोडली नाही. मी ज्या मुलावर प्रेम करत होते त्याच्याबरोबर लग्न होवून मी आज फार सुखी आहे. ही फक्त माझ्या बाबांची कृपा आहे. जगात मी कुणालाही विसरू शकेन पण माझ्या साई माऊलीला मी कधीच विसरणार नाही.

गेल्या डिसेंबरमध्ये मी आणी माझे यजमान शिरडीला श्रीबाबांच्या दर्शनाला गेलो होतो. बाबांचं दर्शन घेतलच. त्यांच दर्शन कितीही वेळा घेतलं तरी आम्हाला कमीच वाटतं. माझे यजमान पण बाबांची फार भक्ती करतात. आम्ही द्वारकामाईत गेलो आणि बाबांसाठी एक मोठा हार आम्ही नेला होता. इच्छा होती आम्ही तो हार आसनावर बसलेल्या साईबाबांना घालावा, पण तिथे एक मोठा हार आणि १०–११ गुलाबांची सुंदर फुलं होती. म्हणून मीच ह्यांना म्हटलं आपण तो हार धुनीसमोरील बाबांना घालू या. आणि माझं लक्ष सारखं फोटोवरील गुलाबांच्या फुलाकडे होतं, मनात सारखं येत होतं की बाबांनी त्यातल एक फूल मला द्यावं. आम्ही तो मोठा हार बाबांना घातला आणि एवढ्यात एक बाबांचा सेवक माझ्यासमोर आला आणि त्यांनी मला एक सुंदरसं गुलाबाचे फूल दिलं. फूल देताच असं वाटलं की मी स्वप्नात तर नाहीना मी स्वप्नात नव्हते. बाबांनी मला खरोखरच फूल दिले होते. बाबांच्या पादूकावर मस्तक टेकले. आनंद अश्रूने बाबांचे पाय धुवून काढले. त्यावेळची माझी मनःस्थिती मी वर्णन करुच शकत नाही. माझी साईमाऊली, दृष्य, अदृष्य रुपे कशी भक्तासाठी धावून येते यांची दिव्य प्रचिती मला आली, आणि आजही ते गुलाबाच फूल माझ्या दागिन्याच्या पेटीत सुरक्षीत आहे.

अशीच या अजाण लेकीवर कायमची कृपा दृष्टी राहो हीच बाबांचरणी प्रार्थना करते आणि हा अनुभव संपविते.

हे साईनाथा, साईराजा, साईबाबा, साईप्रेमा तुला शतशः प्रणाम, ●

५५/१७

॥ ॐ ऱ्हीं नमः ॥

# श्री १५०० कोटी ॥ ॐ नमः शिवाय ॥

## नामजप–याग

### "श्वासे श्वासे शिवनाम स्मरात्मन्"

श्रींचे प्रेरणेने आत्मशांतीसाठी व विश्वकल्याणार्थ श्री १५०० कोटींचा ॥ ॐ नमः शिवाय ॥ या महामंत्राचा नामजप याग चैत्र शु॥ १ श्री शके १८९६ पासून सुरु आहे. श्री शिव हे कोट्यावधि लोकांचे दैवत आहे. जगातील सर्व देशात शिवमंदीरे आहेत. भारतातच ११ लक्ष शिवमंदीरे आहेत. भारत शिवोपासक आहे शिव म्हणजे कल्याण,

• आज सर्व ऐहीक सुखे उपलब्ध असूनही मानवास समाधान लाभत नाही, करिता स्व-परहितास्तव सकल हिन्दु बंधू–भगिनींनी (जैन, बौद्ध, शीख आदि) मद्य–मांस वर्ज्य करुन आत्मीयतेने ॥ ॐ नमः शिवाय ॥ या मंत्राचा प्रत्येकी किमान ६ लक्ष नामजप शुचिर्भूतपणे करुन तो आम्हास कळवावा. आपला नामजप प्रारंभ कोणत्याही सोमवारी करुन नियमित १५०० तरी जप व्हावा. तसेच शिव भक्तीचा प्रचार व प्रसार जगभर होण्याचे दृष्टीने ५ व्यक्तीस तरी समक्ष अगर पत्रद्वारे ॥ ॐ नमः शिवाय ॥ या मंत्र जपास प्रवृत्त करुन आम्हास सहकार्य द्यावे अशी नम्र विनंती.

॥ ॐ नमः शिवाय ॥ नामजप मुखात येणे हे मोठ्या भाग्याचे लक्षण आहे. हजारो जन्माचे पुण्य गाठीशी असेल तरच ॥ ॐ नमः शिवाय ॥ या मंत्राचा नामजप तरी करावा अशी शुभेच्छा होते.

आता पर्यंत ॥ ॐ नमः शिवाय ॥ या महामंत्राचा (६९) कोटीचेवर नामजप झालेला आहे हे ॥ ॐ नमः शिवाय ॥ महामंत्राचे नामजप कार्य महाराष्ट्र, सौराष्ट्र, गोवा, कर्नाटक, आंध्र, मध्यप्रदेश, उत्तरप्रदेश, तामिळनाडू व केरळ या राज्यात चाललेले आहे. श्रींचा सर्वांना आशिर्वाद.

शिवनाम विश्वकल्याणी । त्रिभुवन तारक मंत्र हा ।
विशाले भारते राष्ट्रे ॥ ॐ नमः शिवाय ॥ जप करा ।

संचालक :– **विष्णुपंत बाबुराव तानवडे** (शिवदास)
मु. पो. श्रीसिद्धेश्वर कुरोली जि. सातारा (महाराष्ट्र)

# पाच रुपये पंचवीस पैसे

—श्री. गजानन कृ. निरखे
२०, नंदलालपुरा, इंदौर ४५२००४

● आम्ही उभयता घाबरून गेलो, गांगरून गेलो. 'तार' डोंबिवलीच्या जावयाची 'तार' तातडतोब निघा–शोभा अस्वस्थ! ऑफीसात धरचा टेलिफोन, सारेच्चा. साहेबांची परवानगी घेऊन निघालोच, धावत पळत, स्टेशन गाठले आणि खांडव्याला पठाणकोट मध्ये दोघांनी दयाळू टी. टी. करवी शिरकाव केला. वाटेत एक रात्र. सौभाग्यवती बेचैन आणि मी मानसिक व्यथेत. मध्यरात्री मनमाड स्टेशनात गाडी उभी राहताच मी फलाटावर उतरलो. शिरडी गावाकडे तोंड करून समाधीला हाक दिली ऐन मध्यरात्री! म्हणालो, बाबा साईबाबा कसे असेल माझ्या शोभाचे! तार आलीय ना? सांभाळ देवा! गाडीच्या खिडकीतून हिचा आवाज, अहो, स्टेशनवर काय हातवारे करताय? कुणीकडे बघताय? बसा गाडीत, गाडी चालू होईल! पहाटेच्या चारला कल्याण व साडेचारला डोंबिवलीला शोभाचे दाराशी धडधडत्या शरीराने पोहोचलो. शांत—शांत हलकेच आवाज दिला. क्षीण काया? शोभाचे डोळे जणू आमचीच वाट पहात होते. एक क्षण आवंढा गिळला. पुढे झालो. लेकीच्या डोक्यावरून हात फिरविला. इकडे मुलीसाठी आई घरात पाय धुवून देवाची उदी घेत लेकीसमोर आली. काय झालं बाळ! म्हणत तोंडात, अंगाला उदीच चोपडली. पलंगाशी दोन नातवंडे आमच्याकडे पहात उभी होती. जावई घाबरलेले होते.

सकाळी डॉक्टर येणार, नव्हे आलेच. शांत चित्ते त्यांनी पाहिले, तपासले. छाती, पाठ आणि निदान केले...मुलीने अंगावर ताप काढलाय. दगदग, श्रम फार झालेत, त्यामुळेच अशी एकाएकी आजारी पडली वाटते. नो प्रॉब्लेम! बेडरेस्ट, माझे औषध–गोळ्या–इंजेक्शन संपूर्ण बेडरेस्ट! काय समजले ना?

मधेच माझे वेडं मन, नव्हे मी बोलो, ...नाही तर मी म्हणतो, डॉक्टरसाहेब आम्ही मुलीला इंदूरला नेऊ का?... आपण कोण, मुलीचे वडील ना? तरीच!! अहो पण मग आम्ही मुंबईचे डॉक्टर कशाला? सॉरी! ही माझ्या ट्रीटमेंटखाली आहेच! तीन ते चार आठवडे सक्त बेडरेस्ट विथ मेडिसिन! आणि परत गेले.

दुपारी औषध आणण्याचे निमित्ताने जावईबापूंनी मला माझ्या इच्छेप्रमाणे चेंबूरच्या सौ. ताराबाई चंदवणकरांचे दारात उभे केले. मला काम होते, माझ्या मनात काही घोटाळत होते. आम्हाला पहाताच त्यांना खूप बरे वाटले. पण माझे मलूल म्लान मुखाकडे पाहात त्या विचारतात ! काय झाले ? कसे येणे केले मुंबईला ! अन सारं-सारं काही सांगितले माझ्या शोभाच्या आजाराचे. केवढा कळवळा आला त्यांना शोभाचा ! एकदम त्या म्हणाल्या नाही नाही. तस काहीच होणार नाही. देव दयाळू आहे. माझा देव साईबाबा बरे करेल शोभाला. या या, माझ्या बाबांच्या देव घरात ! बोला, सांगा माझ्यासमोर साईदेवाला, मी साकडे घालते त्याला अन् खरंच मी माझी काळजी साश्रूनयनाने त्यांच्या देवबाबांसमोर मांडली व नवस केला. की...काही सुख क्षेम बोलून पुनः लेकीकडे आलो. चेंबूरचा अंगारा प्रसाद लेकीला दिला व दुसरे दिवशी नोकरीमुळे इंदूरला परतलो लेकीसाठी तिची आई मदतीला राहिली ! अधून मधून समाचार येत. अन् दिड महिन्याने प्रकृतीत फरक, दोन घास खाणे उठणे, फिरणे सुरू झाले. आता हवा पालट म्हणून लेक माहेरी इंदूरला आली व माझे मनही समाधान पावले...पण ह्या अवधीत देवाचा बाबांसमोर केलेल्या नवसाचा विसर पडला किंवा काय ? सुखात देवाचे देणे माणूस विसरतो किंवा काय कोण जाणे...पण तो साईबाबा आपले घेणे मागणे सोडेल का ? त्याचे काय झाले, लेखककविसम्मेलनाचा खास निरोपाचे उत्तर मुंबई ऑफिला ' तारेनी ' हवे होते ! आणि मी सुद्धा उत्तरास विलंब नको म्हणून संपादक महाशयांचे राहते घरी तारेने निरोप... पाठविला.

अन् म्हणून म्हणतो नवस म्हणून म्हणा किंवा ह्या आपल्या बाबांची किमया म्हणा मी बोललेल्या नवसाची रक्कम त्याने ओढून घेतली.

तारेची रसीद व मनाची तार एकदमच उलगडली की अशा रितीने तारेची रसीद. रुपये पाच आणि पैसे पंचवीस व माझ्या नवसाची रक्कम होती रुपये पाच आणि पंचवीस पैसे !

भाविक हो क्षमा मागण्याचा व नाक घासण्याचा योग लौकरच लेखक-कवि संमेलनात शिरडीला घडून आला असा आहे साईबाबा !

★

# ओवीची प्रचिती

—सौ. शांता अंबाजी सरोदे
उल्हेंगल बि. नं. ६ खोली नं. १० एन्. सी.
केळकर रोड दादर मुंबई २८

**साईबाबांच्या छबीचे दर्शन । तेही प्रत्यक्ष दर्शना समान ।**
**भाव मात्र असावा पूर्ण । वेळेवर खूण पावाल ।**

श्रीसाई सत्‌चरित्र अध्याय ३३ वा ओवी ॥ १५० ॥

● श्रीसाईबाबांनी सांगितलेल्या ह्या ओवीची प्रचिती आमच्या अनुभवास आली ती अशी, माझे सासरचे सर्व कुटुंब साईभक्त आहे. आम्ही एकत्र होतो. त्या वेळी गुरुवारी रात्री सर्व पुरुष माणसे कामावरुन घरी आल्यावर ८॥ ते ९ च्या दरम्यान श्रीसाईबाबांची आरती नैवेद्य प्रसाद होत असे. शिरडीत गुरुस्थानात श्री बाबांचा जो फोटो आहे. तसाच आमच्या घरी आहे. माझे यजमान सर्वात लहान व तेच लग्ना अगोदर आमच्या घरातून शिरडीला प्रथम १९४६ सालात गेले. नंतर दुसऱ्याच वर्षी शिरडीला रामनवमी उत्सवानिमित्त गेले. तेव्हा सगुण मेरू नाईक यांनी त्यांच्या खास संग्रहातला श्रीबाबांचा फोटो आपली आठवण रहावी म्हणून यांना विकत दिला, व तो फोटो समाधीवर ठेवून प्रसादासहीत घेतला, व हे शिरडीच्या दुसऱ्या वारीत श्रीबाबांच्याबरोबर घरी आले. तेव्हापासून आमच्या घरात श्रीबाबांची पुजा, आरती व भक्ती सुरू झाली. नंतर १९५० सालात आमचे लग्न झाले. लग्ना नंतर मलाही श्रीबाबांची ओढ लागली, व मीही भक्ती करू लागले.

पुढे १९६८ सालात आमचे सर्व कुटुंब विभक्त झाले. त्यामुळे घरातील कुल दैवत लहान भावाकडे म्हणजे आमच्याकडे आले. आमचे आराध्यदैवत श्रीसाईबाबा, आणि श्रीबाबांचा फोटो दिराजवळ राहिला होता. त्या फोटो समोर माझे साई सत्‌-चरित्राचे पारायण, सप्ताह नेहमी व्हायचे त्यामुळे मला श्रीबाबांची सारखी आठवण यायची म्हणून मी तो फोटो दिराजवळ मागीतला. त्यावर ते म्हणाले काच फुटल्याच्या निमित्ताने दुरुस्तीसाठी फोटोवाल्याच्या दुकानात मी तो दिला आहे. तुला हवा अस-ल्यास दुकानदाराला पैसे देऊन घेऊन जा. मला फार आनंद झाला. लागलीच मी गुरुवारी तो फोटो दुकानातून घरी आणला. संध्याकाळी फोटो मिळाला. त्यादिवशी आम्ही असे ठरविले. की आज पहिला दिवस. पाटावरच श्रीबाबांचा फोटो ठेवून पुजा, आरती

करून, दुसऱ्या दिवशी तो भिंतीवर लावायचा, याप्रमाणे ठरवून आम्ही सर्वजण पुजेच्या तयारीस लागलो.

गोमूत्राने जागा स्वच्छ करून, नंतर पाट मांडून रांगोळी काढून, पंचामृताने फोटोला अभिषेक लावून, पाण्याने स्वच्छ करून, षोडोशोपचाराने पुजा केली. नैवेद्य दाखवून प्रार्थना केली. श्री साईबाबा आमच्या घरी या. गरीबाची सेवा गोड करून घ्या, व आशीर्वाद द्या. याप्रमाणे बोलून आरतीस सुरवात केली.

आरती साईबाबा सौख्य दातार जीवा। हे पद म्हणत असतानाच पाटाचा खट्ट असा मोठा आवाज आला. आम्हाला वाटले, की पाटाला कशाचा तरी धक्का लागला की काय! म्हणून आम्ही पाहू लागलो. पण आम्ही तर सर्वजण लांब उभे राहून आरती करीत होतो. मग आवाज कशाचा असेल? काही समजले नाही. आरती झाली. प्रसाद वाटताना लक्षात आले की श्रीसाईनाथांनी हजेरी दिली. होय ते आमच्या घरीच आले आणि आम्ही सर्वजण श्रीबाबांच्या चरणी आनंदाश्रुनयनांनी नतमस्तक झालो.

असाच एक गोड अनुभव. १९७८ सालात माझ्या मोठ्या मुलीचे लग्न श्री बाबांच्या कृपेने जमले. त्यावेळी आमच्या घरात आशिर्वादाचा हात दाखविलेला श्री बाबांच्या फोटोचे कॅलेंडर माझ्या वडिलांनी दिले होते. ते पाहून मला वाटले की ह्याला फ्रेम बसवावी, व लग्नाच्या हॉलमध्ये हा फोटो लावावा. म्हणजे श्रीबाबांच्या सानिध्यात लग्न सोहळा होऊन, लग्नात हजर राहून ते आशिर्वाद देतील. या भावनेने मी तो फोटो फ्रेम लावून तयार करण्याकरिता दादर रेल्वेस्टेशन जवळच्या दुकानदाराकडे दिला. तयार झाल्यावर गुरुवारच्या दिवशी सकाळी फोटो घेऊन येताना रेल्वेस्टेशनच्या खाली शंकराच्या देवळात गोमूत्र आणण्याकरिता गेले. देवळात ज्ञानेश्वरीच्या पोथीच्या पारायणाची समाप्ती झाली होती. नैवेद्य प्रसाद वाटण्याचे काम चालू होते. आमच्या ओळखीचे गृहस्थ प्रसाद वाटपाचे काम करीत असल्याने त्यांनी भरपूर गोड शिरा व बुंदीचे लाडू प्रसाद मला दिला. अशा रितीने श्रीबाबांच्या बरोबर मी प्रसाद घेऊन घरी आले. लाडू प्रसाद खाताना आम्हाला आठवण आली. की लग्नाचे बुंदीचे लाडू आम्ही श्रीबाबांना देणार होतो. पण श्रीबाबांनीच आम्हाला ते अगोदर देऊन आमचे तोंड गोड केले. प्रेरणा देऊन कार्य करवून घेणारे तेच व तोंड गोड करून गंमत पहाणारेही तेच. आमच्या घरात काही अडी अडचणी आल्या तरी त्यांच्या दयेने ते दूर होतात. सर्व कुटुंबावर त्यांची अखंड कृपादृष्टी असावी. आमच्या हातून त्यांची कृतज्ञतेने सेवाभक्ती घडावी, हीच सद्गुरू माऊलीच्या चरणी आमची नम्र प्रार्थना. ☆

# श्रीसाईनाथ कृपाळू। आमचे मार्गदर्शक गुरु।

— सौ. सिंधू मुळीक
उंटखाना बसस्टॉप
अशोक चौक, नागपूर

● एखाद्या रात्रीत वाटेने जात असता मानवनिर्मित विजेचे दिवे एकाएकी लुप्त व्हावे, व मनात वचक निर्माण व्हावा तितक्यातच एखादा काजवा चमकून प्रकाश व्हावा त्यावेळी मनामध्ये विचार येतो की जेव्हा मनुष्य प्रयत्न करतो त्यावेळी ईश्वर कोणत्या ना कोणत्या रूपाने वावरत असतो. ईश्वराचे आपल्याजवळ सान्निध्य आहे. हे आपल्या मनाला पटते.

यावर्षी जनगणनेचे काम आल्यामुळे आम्ही पाचसहा जणींचा गट करून आपआपला विभाग पाहण्यासाठी गेलो. थंडीचे दिवस असल्याने मी मफलर गुंडाळला होता. चाळीस पन्नास घरांची ओळख पटवून घेतल्यानंतर माझ्या सहकारी शिक्षिकेचे माझ्या कामाकडे लक्ष गेले. तेव्हा ती म्हणाली, अहो तुमच्या कानातली एक कुडी कुठे गेली. माझा हात कानावर गेला व पाहिले तर कानांत कुडी नव्हती.

आधीच जणगणनेचे काम व्यवस्थित कसे पार पडेल ही धास्ती व यातच हे नुकसान यामुळे मी फारच बेचैन झाले. सर्वजणी म्हणाल्या, आता काही ती मिळत नाही. कारण आपण प्रत्येकीचा विभाग पाहण्यास फिरत आहोत. ती कुडी कुठे पडली हे कसे कळणार? तेव्हा माझी हिम्मत अधिकच खचली तेव्हा माझी मैत्रीण म्हणाली, तुम्ही सर्व पुढे चला. आम्ही दोघी थोडे मागे जाऊन पाहतो. बाकीच्यांनी आम्हास वेड्यात काढले. तो विभाग आम्ही पूर्वी कधीच पाहिला नव्हता. माझ्या मैत्रिणीने साईबाबांस पेढे कबूल केले. मी तर सारखा साईबाबांचा धावा करीत होते. कारण सोने हरवणे ही देखील पुढील संकटाची चाहूल असते असे म्हणतात. थोडे पुढे गेल्यावर मला आठवले की एका झाडाजवळील झोपडीजवळ मी मफलर काढला होता. त्या रोखाने आम्ही तिथे गेलो तर माझ्या मैत्रिणीची एकाएकी नजर गेली. त्या झोपडीजवळच कुडी व पेच पडलेला होता. थोड्या अंतरावर एक बाई काम करीत होती व मुले खेळत होती पण कुणाचेच लक्ष इतका वेळ लोटूनही तिकडे गेले नव्हते. साईनाथांच्या कृपेने माझी वस्तू मनात आशा नसतानाही मिळाली.

नितांत
चि. मे
जावे
जायचे
दिवस
जायला
समाधी
होताच
पडला व

दिवस
बाबांचे न

साईबाबा प्रत्येकाच्या जीवनात सदैव पाठीशी असतात, पण त्यांची जाणीव आपल्याला संकटाच्याच वेळी होत असते. जीवनातल्या काळोखातून प्रकाशरूपी मार्ग दर्शक बनून ते आपल्या सर्व आप्तमंडळीस नवीन मार्ग दाखवित असतात. असा मार्गदर्शक गुरू लाभल्यावर भक्त म्हणतात.

सद्‌गुरूनाथ साईनाथ
मी अपराधी घ्या पदरात.

## विश्वाचे डॉक्टर

—सौ. आशालता स. मोहिते
५५ बुधवार पेठ
ता. फलटण जि. सातारा

● गेले वर्ष मी व माझे पति साईबाबांची भक्ती करतो. साईबाबांवर आमची नितांत श्रद्धा आहे. आमची तर आहेच आहे. पण माझी २ वर्षाची मुलगी चि. मेघना ही सुद्धा बोबड्या बोलात बाबांचे नामस्मरण करते. आम्हाला शिरडीला जावे असे खूप वाटायचे. अखेर सुटीत मे महिन्यात आम्ही शिरडीला जायचे ठरवले. मोठ्या आनंदाने तयारीला लागलो. जायच्या अगोदर दोन दिवस माझ्या मुलीला ताप येऊ लागला. तेव्हा आम्ही बाबांवर हवाला ठेवून शिरडीला जायला निघालो. बाबांच्या कृपेने शिरडीला आम्ही सुखरूप पोहचलो व बाबांच्या समाधीचे दर्शन घेऊन कृतार्थ झालो. तेथे सुद्धा माझ्या मुलीला ताप व संडास होत होताच पण मी बाबांची उदी लावली व पाण्यातून पाजली. त्यामुळे फारच फरक पडला व तिला बरे वाटू लागले.

शिरडीहून परतल्यावर परत तिला खोकला येऊ लागला. हा खोकला खूपच दिवस राहिला. किती औषधे केली तरी खोकला काही जाईना. शेवटी मी मनोमन बाबांचे नामस्मरण केले व तिला उदी पाजली आणि बाबांना सांगितले—खोकला पूर्ण

बरा होऊ दे. हा माझा अनुभव मी साईलीलामधे देईन आणि काय आश्चर्य खोकला अगदी पूर्ण बरा झाला व तिला शांत झोप येऊ लागली. खरोखरच मला खूप आनंद झाला.

खरोखरच बाबा सर्व विश्वाचे डॉक्टर आहेत त्यांना काय असाध्य आहे. जेव्हा माझे मन उदास होते. मनाला वाईट वाटते तेव्हा मी क्षणभर बाबांच्या फोटोकडे पहाते व असे वाटते बाबा मला धीर देत आहेत व तात्काळ मनाला शांती मिळते आणि मग ' तुमचे नाव घेता शांती लाभते. चित्ती तुमचा ध्यास घेता टळे संसार चिंता ' या उक्तीचा अनुभव येतो.

# साई कृपेने बदली झाली

—कमळाबाई विठ्ठल कामरेकर
ए १४ रणजित सोसायटी
मुलुंड, मुंबई ८०

● श्रीसाईलीला मासिकातील बाबांच्या भक्तांचे अनुभव वाचत असताना माझ्याही मनात विचार येत असे की, खरच बाबांचा अनुग्रह होण्याचे भाग्य मला कधी लाभेल का ? आणि खरोखरच बाबांनी माझी प्रार्थना ऐकली. तोच अनुभव येथे देत आहे.

माझी सून सौ. मीरा शहापूर, विभागीय वनाधिकारी येथे कामाला होती; परंतु आम्ही मुलुंडला रहातो. लग्नानंतर तिला मुलुंड ते शहापूर असा प्रवास फारच त्रासाचा होत होता. घरी यावयास रात्रीचे ९–१० वाजावयाचे. तिला लहान मुलगाही आहे. म्हणून मी प्रार्थना केली की, जर हीची बदली ठाण्याला झाली तर, मी हा लेख ' साईलीलेत ' प्रसिद्ध करीन आणि काय आश्चर्य. ध्यानीमनी नसताना केवळ बाबांच्यावरील श्रद्धेमुळेच तिची बदली ठाणे विभागीय वनाधिकारी येथे झाली.

' शरण मज आला आणि वाया गेला
दाखवा, दाखवा ऐसा कोणी '

हे श्री साईचे वचन बाबांनीच सर्वार्थाने माझ्या प्रत्ययास आणून दिले व मला धन्य केले. अशीच बाबांची कृपादृष्टी सदैव आमच्या घरातील सर्वांवर राहो हीच श्री साईचरणी प्रार्थना आहे.

# श्रीसाईलीला मासिक जाहिरात दर

कागदाच्या वाढत्या किंमती विचारात घेऊन साईलीला मासिकातील जाहिरातीचे दर खालील प्रमाणे वाढविण्यात येत असून सदरचे दर दि. १-१-१९८१ पासून अंमलात आले आहेत.

| | पूर्वीचे दर रु. | सुधारीत दर रु. |
|---|---|---|
| १) मलपृष्ठ नं. ४. | १०० | ३०० |
| २) मलपृष्ठ नं. ३ व २. | १०० | २०० |
| ३) आतील मजकुराचे पूर्ण पान | ७५ | १०० |
| ४) आतील मजकुराचे अर्धे पान | ४० | ६० |
| ५) आतील मजकुराचे ¼ पान | — | ३५ |

कळावे.

(क. हि. काकरे)
कोर्ट रिसीव्हर,
श्रीसाईबाबा संस्थान, शिरडी.

# भक्ताला जेवणाचा डबा मिळाल्याची पावती दिली

—वत्सला प. खारकर
'साईनिवास' सायन हौसिंग
सोसायटी, सायन

● मी मार्च ८१ च्या महिन्यात खूप आजारी झाले. मोठ्या डॉक्टरनी विश्रांतीची अतिशय जरूर आहे. शेकाजवळ काही करू नका असा सल्ला व औषधे लिहून दिली. खाणावळीतून डबा आणू लागले. अन्न कधी अतिशय खारट, चपात्यासुद्धा खारट, जेवणाचे हाल होऊ लागले. काय करायचे? शीवला सर्व मद्रासी हॉटेल. मीच आजारी झाल्यामुळे धाकट्या बहिणीला स्पंज करण्यास श्रीमती यमुनाबाई पवार नावाच्या बाई वडाळ्याहून येणाऱ्या त्यांना कामावर ठेवले. बाई अतिशय प्रामाणिक. त्यानी सर्व परिस्थिती पाहिली. भाऊही कामावर. तो हॉटेलमध्ये जेऊ लागला. अन्न अपूरे. थकून जायचा. एक दिवस यमुनाबाई म्हणाल्या बाई पैशापायी पैसा जातो पुन्हा तुमचे सगळ्यांचेच हाल. तरी दादर भगिनी समाजात पैसे भरून घरपोच डबा मिळतो. तरी तुम्ही तो सुरू करा. मी त्यांच्याजवळ भावासाठी कंपनीत व माझ्यासाठी घरी यासाठी डिपॉझीट रक्कम भरण्यासाठी दिली. बाईनी पैसे भरले. भावाला प्रथम ता. ४।५।८१ रोजी डबा आला. संध्याकाळी कामावरून आल्याबरोबर आनंदाने तो म्हणाला अग मला आज डबा आला. आम्हा दोघी बहिणीना आनंद झाला. आम्ही सर्वजण श्री साईभक्त बाईनी दुसरे दिवशी भावाला कालपासून डबा येऊ लागला असे सांगितले. त्यावर बाईचे मत तुम्हाला प्रथम डबा यावयास पाहिजे. भाऊ काय हॉटेलमध्ये जेवले असते त्यावर मी सांगितले की एकुलता एक भाऊ अपुरे अन्न, खाऊन शिवाय आऊट डोअर ड्युटी. आम्हाला आनंद झाला आहे आमचा डबा येईल २।३ दिवसानी. बाईनी बहिणीला स्पंज केले, व नंतर त्या म्हणाल्या बाई काल मी घरी गेल्यावर जेवणाचे ताट वाढून घेतले. तेवढ्यात एक वृद्ध गृहस्थ दारी आले व म्हणाले बाई जेवायला द्या. माझ्याच ताटातले अन्न व पिण्यास पाणी दिले. ते जेवले पाणी प्यायले व तृप्तमनाने आशिर्वाद देऊन गेले. नंतर माझ्या ताटातले अन्न मी धरून तिघेजण जेवलो. काहीच अपुरे पडले नाही. मी सुद्धा शिर्डीला जाऊन आलेली आहे, असे सांगताच माझी बहीण चटकन् म्हणाली, बाई त्यांचा भक्त जेवला याची तुम्हाला त्यांनी तुमच्या घरी जेऊन पावती दिली. खरोखरच श्री साईबाबांची लीला अगाध आहे. नंतर दोन दिवसानी आमचा डबा येऊ लागला. ●

# —: साई संदेश :—

— श्री. रमेश जगन्नाथ व्यवहारे

अनंत पाटील, चाळ रु. नं. ३
गोग्रासवाडी, पाथर्ली रोड,
डोंबिवली (पूर्व) ११२

● जुलै महिन्याचा पहिला आठवडा. आमच्या मेव्हणीला डोंबिवलीहून नासिकला जायचे होते. कधी तिने एकटीने प्रवास न केल्यामुळे रेल्वेने एकटी कशी पाठवावी या विवंचनेत मी होतो. म्हणून तिच्या वडिलांना पत्राने कळविले की कु. रंजनाला सकाळच्या डोंबिवली जळगाव, एस. टी. ने बसवून देतो व तुम्ही तिला सी. बी. एस. ला घ्यायला या ! पक्के ठरले ! तसे पत्रही पाठवले त्याच आठवड्याचा गुरुवारचा दिवस उजाडला. नेहमीच्या गुरुवारप्रमाणे सकाळी पूजा अर्चा चालू असताना श्रीसाई-बाबांच्या तसबिरीला हार घालून नमस्कार करताच साक्षात्कार 'श्री बाबांनी' बुद्धी दिली व मनात एकच विचार घोळू लागला की, तुझ्या मेव्हणीला एस. टी. गाडीने न बसवता तू स्वतः रेल्वेगाडीने घेऊन जा. श्री बाबांना मनोभावे सा. नमस्कार करताना असा विचार का यावा हे सारखे मनात दिवसभर घोळू लागले, मनाची चलबिचल थांबेना. शेवटी विचार पक्का केला व सौ. ला सांगितले की श्रीसाईनी मला सांगितले तू स्वतः तिला नासिकला तिच्या घरी पोहोचून ये !

लागलीच ११ तारखेचा शनिवार. मला रजा होतीच. त्याप्रमाणे सकाळी पॅसेंजरने कल्याणहून आम्ही दोघे नासिकला जायला निघालो. काही तासातच आसनगाव रेल्वे स्टेशन आले. खिडकीतून बाहेर डोकावतो तोच, आसनगाव स्टेशनवर जो ब्रिज आहे त्यावर बरीच मोठी लॉऱ्यांची रांग लागलेली दिसली. काही एस. टी. गाड्याही होत्या. सकाळी ९–३० ची वेळ होती ती म्हणजे मुंबई ठाणे डोंबिवली कल्याणहून सकाळी सुटणाऱ्या एस. टी. गाड्याही तिथेच अडकवून राहिल्या. ती गाड्यांची रांग का बरे लागली—ही विचारपूस करता असे समजले की कसारा घाटात दोन लॉऱ्यांचा अपघात शुक्रवारी रात्री १० च्या सुमारास झालेला होता. दिल्लीहून मुंबईला व मुंबईहून नासिक मार्गे जाणाऱ्या गाड्या सर्व मुक्काम ठोकून उभ्या होत्या. त्या थेट इगतपुरी पर्यंत. गाडीने इगतपुरी देवळाली सोडले. नासिक आले. बरोबर दुपारी १२–३० च्या सुमारास आमच्या सासऱ्यांना पुढे पत्र असल्यामुळे मनात सारखे विचार होते की

मेव्हणे अथवा सासरे सी. बी. एस. ला वाट बघत असतील. केव्हा एस. टी येते ती. तेव्हा नासिकरोडहून, शालिमार स्टॉपचे तिकीट काढून, सी. बी. एस. ला मेव्हण्यांना घ्यायला आलो. तशीच एस. टी. स्टँडवर चौकशी केली. डोंबिवली जळगाव गाडी आली का? तेव्हा असे कळाले की मुंबईहून आतापर्यंत एकही एस. टी. गाडी आली नाही. कारण कसारा घाटात अपघात झाल्यामुळे व त्या गाड्या केव्हा येतील तेही सांगणे कठीण होते.

हे ऐकताच मन कसे आनंदाने श्रीबाबांच्या साक्षात् चमत्काराच्या अनुभवाने भारावून गेले. तेव्हा सांगावयाचे एवढेच–श्री साईबाबांची मनोभावे करील जो सेवा। त्याच्या पाठी सदैव त्यांची शक्ती ठेवा॥

# बाबांनी मनातील इच्छा पूर्ण केली

—सौ. मंगल दिलीप सांडभोर
५७०, दत्तवाडी, साईसदन पुणे ३०

● मला साईबाबांचा फोटो पाहिला की मी त्यांचे दर्शन घेत असे. मी दत्त दत्तमंदिरात दर्शनाला गेले. तेथे साईबाबांचा फोटो पाहिला व दर्शन घेतले व मनात म्हणाले, बाबा मला चांगले स्थळ मिळू दे. ते साईभक्त असावेत. दैव योगाने माझ्या वडिलांकडे एक गृहस्थ आले. त्यांनी लग्नासंबंधी विचारपूस केली व ते निघून गेले. पुढे मुलगा पहावयास आला तो मला पाहून गेला. पुढे मी पसंत आहे, असे वडिलांना निरोप आला. अशा प्रकारे आमचे लग्न जमले. ती मंडळी साईभक्त आहेत. असे मला समजले. त्यामुळे मला फार आनंद झाला. लग्न चांगल्या प्रकारे झाले व मी त्यांचे घरी गेले. तर तेथील आनंदी वातावरण पाहून मला फार आनंद झाला. सर्व लोक साईभक्त आहेत. त्यांचे घरी साईबाबांची आरती व पूजा पाहून मन माझे रमले व चार पाच दिवसानी मी माझ्या मिस्टरांबरोबर शिरडीला जाऊन दोन दिवस मुक्काम करून अभिषेक पूजा करून परत घरी आले तेव्हापासून माझे साईभक्तीत जास्त भर पडून मी घरी पूजा करू लागले व माझ्या मनातील इच्छा साईबाबांनी अशी पूर्ण केली.

●

# श्रीसाईलीला

## लेखक—कवी वर्गणीदारांना महत्वाच्या सूचना

१) श्रीसाईलीलेकडे पाठवावयाचे सारे लेख, कविता, चित्रे इ. साहित्य संपादक श्रीसाईलीला, 'साईनिकेतन' ८०४ बी. डॉ. आंबेडकर मार्ग, दादर मुंबई ४०००१४ याच पत्यावर पाठवावे. वर्गणीदारांनी पण आपली वार्षिक वर्गणी रुपये दहा याच पत्यावर पाठवावी; किंवा स्वतः येऊन भरावी व रितसर पोचपावती घ्यावी व ती नोंदीसाठी म्हणून जपून ठेवावी ही विनंती.

२) लेखक–कवींनी लिखाण पाठविताना ते कागदाच्या एकाच बाजूने भरपूर समास सोडून, सुवाच्य अक्षरात नवीन शुद्धलेखन पद्धतीचे नियमास अनुसरून लिहून पाठवावे. लिखाण कागदाच्या दोन्ही बाजूस लिहून किंवा इनलँड लेटर किंवा पोस्टकार्डावर लिहून अजिबात पाठवू नये. ते स्वीकृत केले जाणार नाही.

३) श्रीसाईलीलेकडे लेखन पाठविताना श्रीसाईबाबा हाच प्रमुख विषय असावा. अन्य संतवाङ्मय, चरित्रे, भक्तीभाव, अध्यात्म, श्रीसाईभक्त, श्रीसाई मंदिरे इ. विषयांवरही साहित्य श्रीसाईलीलेकडे पाठविले तरी चालेल.

४) लेखाची पोच लेखकास त्वरीत हवी असल्यास लेखासोबत १५ पैशाचे तिकीट किंवा कार्ड सोबत जोडावे म्हणजे पोच रितसर पाठविली जाईल. पाठविलेल्या साहित्याचा निर्णय सुमारे महिन्याभरात कळविला जाईल. नापसंत साहित्य परत पाठविले जाईल.

५) कवींनी निदान दोन वर्षेतरी कविता अजिबात पाठवू नयेत.

६) पोस्टाने पाठवावयाचे सर्व अंक दरमहा एक तारखेस दादर मुख्य कचेरीतून योग्य त्या नोंदी घेऊन रवाना केले जातातच. उशिरात उशिरा म्हणजे सुमारे ८ तारखेपर्यंत ते देशभरच्या वर्गणीदारांना मिळावेत. अंक न मिळाल्याची तक्रार नजिकच्या डाकघरी करावी व मगच आम्हास लिहावे. अंक शिल्लक असल्यास पुन्हा पाठविला जाईल परंतु अशी शक्यता कमीच असते.

● ● ●

# साईदयेने डी. एड् ला नंबर आला

—श्री. गोविंद गणाजी नांदेडे
मु. पो. शिरढोण ता. कंधार, जि. नांदेड

● माझ्या वाळवंटासारख्या जीवनात बाबांनी फुलबाग फुलवली आहे. मला खऱ्या अर्थाने बाबांनी जीवदान दिले. नाहीतर माझी जगाच्या बाजारात कवडी किंमत नव्हती. मला बाबांनी शिक्षकाची नोकरी देऊन जीवदान दिले. जीवनात जे जे मंगल, उदात्त, भव्य, दिव्य घडते ते बाबांच्या दयेने घडते आणि जे मनाविरुद्ध घडते ते त्याचा दोष मी माझ्या कर्माला देतो.

साईदयेनेच परवा मे मध्ये माझी सोयरिक जमली मुलगी मॅट्रीक पास. बऱ्यापैकी 'गुणानं.' माझ्या मनात जे जे विचार येतात ते ते बाबाप्रेरीतच असतात. जे घडतं ते त्यांच्या कृपेनेच आणि आपल्या भल्यासाठीच अशी माझी धारणा आहे. माझ्या भावी वधूचा डी. एड या शिक्षकाच्या ट्रेनिंगला नंबर लागावा अशी मी बाबांना विनंती केली. तशी विनंती करण्याची प्रेरणाही बाबांनीच मला दिली होती. आमचं लग्न साईदयेने पुढील वर्षी (मे १९८२) मध्ये होणार. झालं फार्म भरला (डी. एड्. कॉलेज नांदेड) मी बाबांना नेहमी सबुरी च दान मागतो. माझ मन थोडं उतावीळच म्हणा की आर्डर सुटल्या. नंबर लागला नाही. खिन्न झालो. माझे त्राता तोच 'शिरडीचा बाबा' नंबर वेटींगमध्ये होता सहावा. मला दम निघेना. चार चकरा ऑफिसला मारल्या बेचैन झालो. बाबांना प्रार्थना करू लागलो. बाबा पुढे पुढेच ढकलायचे. पंधरा दिवस नुसत्या चकरा मारल्या. नंबर लागावा तोही नांदेड या जवळच्या आणि भावी सौ. च्या रहाण्याच्या व्यवस्थेच्या शहरी. कठीनच की नेमकी माझी एम. ए. दुसऱ्या सत्राची परिक्षा झाली होती आणि प्रथम सत्राचा एक विषय (micro economics) राहीला होता. मला द्वितीय सत्राचे महत्व वाटले नाही कारण ते सारे पेपर जरी राहिले तरी तृतीय सत्राला प्रवेश मिळाला असता मात्र प्रथम सत्राचा राहीलेला एक विषय पास होणे आवश्यक होते. मी बाबांना विनंती केली, बाबा! भावी सौ. चा नंबर नांदेड डी. एड. ला लागावा आणि माझा प्रथम सत्राचा राहिलेला एक विषय निघावा." मी लगेच दर्शनाला येईन आणि हा अनुभव (सुस्वानुभव) साईलीलात देईन.

अनंत कोटीचा ब्रह्मांडाचा मालक तो, त्याला काय अशक्य ? भावी सौ. चा नांदेड डी. एड्. लाच नंबर लागला. शिवाय प्रवेश वेईपर्यंतचे लहानसहान वादळंही बाबांच्या दयेने शमली हे सांगणे न लगे. माझा एम. ए. चा निकाल लागला अनपेक्षित ( अपूर्व ) यश मला मिळालेलं पाहून मन कसं कृतज्ञतेने भरून वाहू लागलं.

प्रथमचा विषय उत्तम गुणानी पास शिवाय ज्या एकही विषयाचा विश्वास नव्हता. ( पण बाबांवर पूरा विश्वास ) ते तीन विषय निघाले. फक्त एक राहिला (तोही माझ्या भल्यासाठीच )

जीवन सर्वस्व बाबांवर अवलंबून आहे. बाबांना पुन्हा पुन्हा एकच विनंती आहे माझी. मला सोज्वळ मन, ( स्वार्थरहित ) देऊन माझा देह चरणी अर्पूण घ्यावा. जीवनभर निष्काम, एकनिष्ठ भक्ती व्हावी हीच आशा.

## अखिल भारतीय श्रीसाईभक्तांचे अधिवेशन–१९८१

बंगलोर येथील श्री साई स्पिरीच्युअल सेंटरच्या विद्यमाने अखिल भारतीय श्रीसाईभक्तांचे यंदाचे अधिवेशन बंगलोर येथे शुक्रवार शनिवार व रविवार ४–५ व ६ डिसेंबर १९८१ रोजी भरविण्यात येत आहे. दि. ४ व ५ रोजीच्या अधिवेशनाच्या भरगच्च कार्यक्रमानंतर या अधिवेशनाला जोडूनच अखिल भारतीय श्रीसाईसमाजाचे दिवंगत अध्यक्ष प. पू. श्री राधाकृष्ण स्वामी उर्फ श्रीसाईपादानंद यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचा अनावरण समारंभ रवि. ता. ६ डिसेंबरला बंगलोर येथे मोठ्या समारंभाने होत आहे. तरी साईभक्तांनी या अधिवेशनाला व श्री स्वामीजींच्या पुतळा अनावरण समारंभाला बहुसंख्येने उपस्थित रहावे अशी विनंती श्रीसाई स्पिरिच्युअल सेंटरचे कार्यवाह श्री. सी. व्ही. भास्करराव श्रीसाईबाबा मंदिर रोड, त्यागराजनगर बंगलोर हे करतात.

# श्रीसाईबाबांची आमचेवर कृपा

– सौ. विमल बाळकृष्ण चव्हाण
नदी वेस, पाटील गल्ली, पवार वाडा
मिरज

● श्री साईबाबांची आणि आमची पहिली ओळख १९७८ साली पुण्याचे श्री. नंदकुमार खेले यांच्या घरी झाली. तेव्हापासून आमचे घर साईमय झाले. प्रत्येक गोष्टीत सर्वांना साई दिसू लागला. साईबाबा घरी आले आणि आतापर्यंत घराला ग्रासलेल्या चिंताची सोडवणूक श्रीसाईनी लिलयेने केली. तीन मुलींची लग्ने ही खरोखरच काळजीची गोष्ट आहे. पण साईबाबा घरी आले आणि तीन वर्षातच तिन्ही मुलींची लग्ने झाली. मुलींना सुस्थळ लाभले आहे. आपल्या निर्व्यसनी व कर्तव्यदक्ष पतीसमवेत त्या आपल्या संसारी सुखात आहेत.

चार महिन्यापूर्वी माझ्या मोठ्या मुलीच्या बाळाला देवी काढल्या. देवी काढल्यानंतर बहुधा तीन दिवसांनी ताप येतो पण तसा तो ताप आला नाही. बाळाचे रडणे खेळणे कमी झाले. बाळ नुसते मलूल पडून राहू लागले. शनिवारी जावई पत्नीला व बाळाला भेटायला आले त्यावेळी बाळाला साधारण ताप होता. रविवारी दोघे दवाखान्यात जाऊन बाळाला दाखवून औषध घेऊन आले. डॉक्टरांनी बाळ नॉर्मल कंडिशनमध्ये असल्याचा निर्वाळा दिला होता. संध्याकाळी जेवण वगैरे करून रात्री ९ वा. जावईबापू पुण्याला जाण्यासाठी सांगलीला गेले. (त्याना सांगलीवरून गाडी होती.) आणि अचानक थोड्या वेळातच बाळाला भयंकर ताप आला. देवी काढल्यानंतर तब्बल तीन आठवड्यांनी ताप आला. बाळाने डोळे पांढरे केले, अंग ताटवले. हे दृश्य पाहून माझी मुलगी ओक्साबोक्सी रडू लागली. तिचं पहिलंच अपत्य होतं ते. बाळास मांडीवर घेऊन मी साईबाबांचा धावा सुरू केला. साईबाबा धाव. बाळाला चांगले कर जसा त्या मुलीला जन्म दिलास तसच ती लेकुरवाली होऊ दे. माझ्या मुलीची ओटी शांत ठेव अशी साईबाबांना प्रार्थना करीत तिला उदी लावली. तोंडास चाटवली. डोक्याला व सगळ्या अंगाला उदी लावून उदीने न्हाऊ घातले. एस. टी स्टॅंडवरून फोन करून बाळाच्या वडिलांना परत बोलावून घेण्यात आले. रात्री १२ ची वेळ, बाळाला एका डॉक्टराच्या दवाखान्यात घेऊन गेलो. तिथे एक चमचाभर औषध

पाजविले. ती रात्र बहुतेक जागूनच काढली. दुसऱ्या दिवशी बाळ नॉर्मलवर आले व चांगले हसू खेळू लागले. बाबांच्या कृपेने बाळास दीर्घायुष्य लाभो.

माझ्या धाकट्या मुलीला निपाणीला दिले आहे. लग्नानंतर पहिल्याच वर्षी तीने एका गोड मुलीला जन्म दिला पण मुलगी झाल्यामुळे ती नाराज होती. दुसऱ्यांदा जेव्हा दिवस गेले तेव्हा ती अत्यंत काळजीत होती. कारण तीच्या सासरी तीचा दिर व दोन नणंदा याना तीन तीन मुली व नंतर मुलगा असे होते. स्वतःच्या बाबतीतही तसेच घडते काय याची तीला काळजी लागून राहिली होती. पण मी तीला धीर दिला. नववा महिना लागल्यानंतर बाळंतपणाला माझ्याकडे बोलवून घेतले व अगत्याने साई-बाबांची पोथी तीला वाचायला लावली. आठ अध्याय वाचून झाले आणि गुरुवारी रात्री १२ वाजता तीने पुत्ररत्नाला जन्म दिला. तीन तीन मुलींना जन्म देण्याचे तीच्यावरचे आरिष्ट साईबाबानी टाळले. गुरुवार हा तर साईबाबांचा दिवस. साई-बाबांनी ही आपल्या प्रेमाची प्रचीतीच दिली ना? अशीच कृपेची पखरण साईबाबा सर्वांवर करोत हीच प्रार्थना.

किती किती गावी तुझी गोड गाथा
प्रभु साईनाथा, प्रभु साईनाथा.

## कृपाळू साईमाय

—सौ. नीलम दीपक देशपांडे बी. ए.
११३९ ई साइक्स एक्स्टेन्शन
कोल्हापूर

● श्री साईनाथांची भक्तवत्सलता, दयार्द्रता वर्णावी तितकी कमीच. नव्हे शक्यच! पदोपदी हर संकटातून, हाताला धरून तारून नेणारा संतचूडामणि, संत-मालिकेतील हा मेरूमणि, देहधारी परमेश्वरच!

माझे आई-वडील, भाऊ सर्वच साईनाथांचे निस्सीम भक्त! प्रत्येक जण आपा-पा परीने यथा शक्ती, यथा मति साईनाथांना भजतात. त्यांच्याबरोबरच मलाही साईपदांची भक्ती, सेवा घडत असे. अनेक छोट्या-मोठ्या अडचणीतून साईंनी उम-

जसा मार्ग सुकर करून दिला, तसतशी श्रद्धा, निष्ठा वाढू लागली, अढळ झाली. पण तरीही 'विनाश काले विपरीत बुद्धी।' कधी कधी चकावते. त्याप्रमाणेच माझेही झाले. माझे वडील (श्री. सदाशिव व्य. कुलकर्णी) एकसारखा साईनाथांचा जप करीत. मी माहेरी आलेली, दुसरे दिवशी सासरी जाणार आणि ह्यांचा आपला सतत जप चालूच. माझ्याशी बोलायलाही फुरसत नाही. मला ते काही बरे वाटेना. मी त्यांना म्हटले, सारखा कसला जप करता? साईबाबा झाला तरी काय झाले? त्यांनी कुठेही संसार सोडून माझ्यामागे लाग असे सांगितले नाही. दिवसातून ठराविक वेळी ठराविक कामे आपण करतो त्याप्रमाणे 'बाबां'च्या साठी ही ठराविक वेळ द्यावी. ती. बाबांनी (वडील) मला, असे म्हणू नकोस. तूही साईनाथांची भक्तच आहेस. त्यांची भक्ती म्हणजे ठराविक वेळातील काम नव्हे. उलट त्यांच्या नामस्मरणाला कालवेळाचे बंधन नाही. कारण त्यांचे सामर्थ्यही अमर्याद आहे असे सांगून सावध केले.

ठरल्याप्रमाणे मी दुसऱ्या दिवशी गेले. (सासर-माहेर दोन्ही कोल्हापुरातच आहे.) जाताना थोडेसे पोटात दुखत होते. पण अगदी किरकोळ होते. गेल्यानंतर रात्री वाढू लागले. पण तरीही रात्री झोप लागली. सकाळी उठताना थोडेसे दुखतच होते. पण ते वाढत वाढत शेवटी असह्य झाले. रविवारचा (ता. २८-६-१९८१) दिवस डॉक्टरही भेटेनात. अखेर दुपारी १२ वा. डॉक्टर भेटले. त्यानी २ गोळ्या व इन्जेक्शन दिले. त्याने तात्पुरते बरे वाटून थोडा वेळ झोपही लागली. पण ते तेवढ्यापुरतेच. पुन्हा संध्याकाळी जोरात कळा येऊ लागल्या. सहनशक्तीच्या पलीकडे गेले. गावातच माहेर असल्याने त्याना ही गोष्ट कळवावी पण दुसऱ्या कोणाकडून कळवले तर आई-बाबा, भाऊ जास्त घाबरतील, त्यापेक्षा आपणच जावे म्हणून आम्ही दोघे गेलो तेव्हा तर मला बसणे वा झोपणेही अशक्य झाले होते. पुन्हा रात्री ११ वा. डॉक्टरना बोलावून आणले. अॅपेंडीक्स असावे. ताबडतोब हॉस्पिटलला अॅडमिट करावे लागेल म्हणाले पण हॉस्पिटलला फोन न लागल्याने झोपेचे इंजेक्शन देऊन, बिघडले तर कळवा नाहीतर सकाळी येतोच असे सांगून गेले. दुसऱ्या दिवशी सकाळी म्हणजे ता. २९ ला तपासून ताबडतोब हॉस्पिटलला जाण्याचा सल्ला व सर्जनना पत्र दिले. तेथे गेल्याबरोबर अर्जंट केस म्हणून लागलीच तपासून अॅपेंडीक्स बर्स्ट झाले आहे. शक्यतो लौकर ऑपरेशन करणे जरूर आहे असे सांगितले. ऑपरेशन हा शब्द ऐकताच आपण २ दिवसापूर्वी उधळलेल्या मुक्ताफळांची मला आठवण झाली. अॅपेंडीक्स फुटल्याचे ऐकून सर्वांची पाचावर धारण बसली. सासरची-माहेरची, घरची-दारची सगळी हॉस्पिटलमध्ये गोळा झाली. काय होईल सांगता येत नाही. असे डॉ. च्या बोलण्यावरून सर्वांना वाटत होते.

सर्वांनी आपापल्या देवांची करुणा भाकली. भीतीने सर्वजण पावसाळ्यातही सर्द झाले होते. दुपारी २ वाजता मला ऑपरेशन थिएटरमध्ये नेण्यात आले. मला मात्र भीती नव्हती. कारण,... कारण साईमाऊली माझ्यासमोर उभी होती. साई-नाथ महाराज आणि माझे आजोबा ती. कै. मामा हे दोघे माझ्याजवळ हसत-मुखाने उभे होते. तू भिऊ नकोस. मी आहे असे सांगत होते. मग धोका कशाचा ! आणि भीती कशाची ! ॲपेंडीक्स फुटलेच नव्हते. ऑपरेशन तसे साधे, सोपेच होते. त्यामुळे नंतरही फारसा त्रास झाला नाही. पाचव्या दिवशी टाके काढून टाकून सहाव्या दिवशी डिस्चार्जही मिळाला. माझ्या आधी आलेले बरेच रुग्ण अजून तिथेच होते.

आता या ठिकाणी मी साईबाबांबद्दल अनादराची भाषा वापरली म्हणून त्यांनी आपल्याला शिक्षा दिली असे म्हणणे लांछनास्पद ठरेल. उलट माझी चूक असूनसुद्धा संकटातून साईनाथांनी जवळ येऊन माझे रक्षण केले. या प्रेमाला, ममत्वाला कशाची उपमा द्यावी !

तू माझी माऊली, कृपेची साऊली
साईमाय साईमाय ॥

❋ ❋ ❋

(पान १५ वरून)

असून तो ते वारंवार वापरीत असत. रथाला चारी बाजूनी विजेचे नलिका दिवे लावलेले असतात. रथात तसबिरीच्या जवळ पादुका असतात. फुगे, पताका, फुलांच्या माळा इ. नी सजविलेला हा रथ द्वारकामाईतून चावडी करून निघतो व गावातून हिंडून तो सुमारे ११-३० वा. गुरुस्थानाजवळ येतो रथासमोर भुईनळे व डांबरी फटाके लावले जातात. गुरुस्थानाजवळ आल्यावर भारूड गारुडाचा एक रंजक कार्यक्रम सुमारे २० मिनिटे केला जातो. हा कार्यक्रम संपल्यावर मिरवणूक समाधीमंदिराच्या प्रवेशद्वाराजवळ आल्यावर रथातील पादुका 'शोकेस' मध्ये नेऊन ठेवल्या जातात व तसबिर-अंगरख्यासहित समाधीवर रात्रभर ठेवली जाते. या दिवशी मंदिर रात्रभर उघडे असते. भक्तांच्या हजेरीचे कार्यक्रम रात्रभर चालू असतात. बाबा रात्रभर या कार्यक्रमास हजर असतात आणि म्हणूनच की काय दुसऱ्या दिवशीची पहाटेची काकड आरती केली जात नाही. आरती खेरीजचे देवाचे सर्व पुजा विधी मंगलस्नान इ. यथाक्रम नंतर पार पाडले जातात. सकाळी १० ते १२ वाजेपर्यंत संस्थान गवई यांचे काला कीर्तन होते. दही हंडीचा कार्यक्रम होतो. ही लाह्यांनी भरलेली दहीहंडी प्रांगणात बांधली जाते. ही फोडण्यासाठी भक्तांची एकच झुंबड उडते. एका पाठीवर एक अशाप्रकारे उभे राहून भक्तमंडळी फेर धरून गोविंदा करतात व ती हंडी चार सहा प्रयत्नात फोडतात. फोडलेल्या हंडीतून प्रसाद मिळविण्याची भक्तांची तोबा गर्दी उसळते. या गर्दीत कितीतरी जणांच्या बहुमोल वस्तू घड्याळे इ. हरवितात पण त्याची त्यांना पर्वा नसते. या हरवलेल्या-सापडलेल्या वस्तू प्रामाणिक भक्तमंडळी प्रांगणातील सुरक्षा अधिकाऱ्याकडे (सिक्युरिटी ऑफीसर) आणून देतात व त्या वस्तू बाबतीतील योग्य ती विचारपूस झाल्यावर मगच ती ज्याची त्यास परत दिल्या जातात. फुटलेल्या हंडीचे खापराचे तुकडे सुद्धा भक्त गोळा करतात. हे तुकडे आपल्या घरातील साठविलेल्या धान्यात ते ठेवतात. दहीहंडी नंतर मग आरती होते आणि हा काला कार्यक्रम समाप्त होतो. शिरडीतील दसरा उत्सव हा अशाप्रकारे दरवर्षी साजरा होतो. उत्सव संपला रे संपला की भक्त मंडळी बाबांना वंदन करून घरोघरी परतात. ●

# बाबांचा प्रसाद

—वामन अर्जुन वेंगुर्लेकर
मिलिंद सहकारी गृह निर्माण संस्था,
३/१७६, एम्. एच्. बी. कॉलनी
बोरीवली (पश्चिम), मुंबई ४०० ०९२.

● मी बाबांचा भक्त आहे. नित्य नियमाप्रमाणे बाबांची पुजा व स्तोत्र पठण केल्यावरच मी माझ्या पुढील कामाला निघतो. मला कोणतीही गोष्ट करावयाची झाल्यास मी बाबांच्या समोर स्मरण करूनच ती गोष्ट करावयास घेतो. किंवा मला शक्य झालं तर मी शिर्डीला जाऊन बाबांच्या समाधीपाशी स्मरण करून येतो. या प्रमाणे मला आलेला अनुभव.

माझ्या जन्मपत्रिकेच्यावरुन मला ज्योतिषाने गुलबट मोती वापरण्यास सांगितले. त्यांच्या सांगण्यावरुन मी मोती आणले. घरी गेल्यावर ते मोती बाबांच्या मूर्ती समोर तसेच कागदामध्ये ठेवून दिले.

दुसऱ्या दिवशी नित्याप्रमाणे आंघोळ केली. बाबांच्या समोर ठेवलेले ते मोती तसेच कागदातून उचलले व बांधून घेतले. नंतर पुजा आटोपली. व मी ते मोती आंगठीत बसविण्यासाठी सोनाराजवळ घेऊन गेलो, व तेथे कागदातून बाहेर काढले त्यावेळी त्या मोत्यासोबत मला तांदूळ मिळाले. मला आश्चर्य वाटले कारण मी रात्री बाबांच्या समोर कागदात ठेवलेलं नुसत मोतीच होतं, व सकाळी तशीच पुडी बांधली मग हे सोबत तांदूळ कसे आलेत. मग मी मनात ठरविलं की हा बाबांनी दिलेला प्रसाद होय.

# तुमचा मी भार वाहिन सर्वथा!

—सौ. स्नेहलता महादेव दळवी
२४५।१३२७, प्रतिक्षा नगर
सायन कोळीवाडा, मुं. २२

श्री साईबाबा आपल्या भक्तावरील संकट कसे दूर करतात हे मला अनुभवानेच कळले.

गेल्या वर्षी माझे पति जेथे कामाला ( कारकून ) आहेत तेथे सर्व हिशोबाचे काम. त्यांनी हिशोबाचे काम केले. दुसऱ्या कारकुनाने तपासून पाहिले. साहेबाजवळ काम पूर्ण करून दिले. नंतर आठ दिवसानी त्या हिशोबाच्या कामावरून दुसरे काम निघाले. तेव्हा त्याना आढळून आले की हिशोबात चूक आहे. स्वारी घाबरून गेली. कामावर लक्ष लागेना. साहेबाना काय सांगावयाचे? सायंकाळी घरी आले. स्वारी घाबरलेली. नंतर त्यानी झालेली हकीगत मला सांगितली. मग त्याना घेऊन मी आमच्या जवळ अपराध स्वामी आहेत त्यांच्याजवळ गेले. त्यानी सांगितले की काही घाबरू नका. साईबाबांची कृपा असली मग भीती कसली? त्यानी शिर्डीच्या साईबाबांची उदी दिली व सांगितले की ही उदी खिशात घालून व चूक झालेल्या पुस्तकाला थोडी लावून साहेबाच्या कॅबिनमधे जाऊन चुकी कबूल करा. मी सुद्धा साईबाबांचा धावा केला, जर यांच्यावरील संकट टळले तर चरणी यथाशक्ती देणगी देईन. सहा महिन्याच्या आत शिरडीला दोघे येऊन अभिषेक करू. तसेच माझा हा अनुभव साईलीलात छापण्यास देईन.

साईबाबांनी माझी हाक ऐकली. त्यांच्यावरील संकट टळले. साहेब थोडेसे रागावले परंतु शिक्षा वगैरे काही केली नाही. अशा प्रकारे साईबाबा भक्ताच्या संकटसमयी धावून येतात, व मी त्याप्रमाणे १ जानेवारी ८१ ला सर्व कुटुंब शिर्डीला जाऊन आले. अभिषेक केला व यथाशक्ती देणगीही दिली.

कोणत्याही प्रसंगी बाबा माझ्यासाठी उभे असतात. बाबांची कृपा अशीच माझ्यावर व आमच्या सर्व कुटुंबावर सतत रहावी हीच सदिच्छा!

...............

रेल्वे गाडीची शर्यत

# साईबाबांच्या कृपेने आम्ही कशी जिंकली

—सौ. ललिता नरेंद्र पाठारे
५, मुग्धा अपार्टमेंटस
शिवाजी नगर नौपाडा–ठाणे

● आम्ही दरवर्षी शिरडीस श्री साईबाबांच्या दर्शनार्थ जातो त्याप्रमाणेच कोल्हापूरला श्री महालक्ष्मीच्या दर्शनार्थही जातो. दि. १३–८–७८ ची गोष्ट. आम्ही महालक्ष्मी एक्स्प्रेसचे रिझर्वेशन केले होते व गाडी कल्याणला पकडणार होतो. ह्या वर्षीच आम्ही नवीन जागेत रहाण्यास गेलो होतो व तेथे आमच्या दुसऱ्या मजल्यावर पाण्याची सोय झाली नव्हती. पाणी खालून आणावे लागत होते. निघण्याच्या दिवशी पाणी भरणाऱ्या कामगाराने शेवटची बादली भरून आणण्यास खूपच उशीर लावल्याने आम्हास घरातून निघण्यास उशीर झाला व ठाण्याहून कल्याणकडे जाणारी ८–४० (रात्री) ची गाडी निघून गेली. कल्याणकडे जाणारी पुढील लोकल ९-११ वाजता होती व महालक्ष्मी एक्स्प्रेस ठाण्याहून न थांबता जाण्याची वेळ ९-१० ही होती. आमच्या तोंडाचे पाणी पळाले. तावडतोब श्री साईबाबांचा धावा सुरू केला व विनवणी केली, की काहीतरी चमत्कार दाखवून आम्हास गाडी मिळू द्या.

ठाण्यास आम्ही प्लॅटफॉर्म क्र. १ वर ९-११ च्या लोकल गाडीची वाट पहात थांबलो. मी व माझे पती एकमेकांशी काहीही न बोलता दोघेही मनात साईच्या नावाचा धावा करीत होतो. आम्ही प्लॅटफॉर्म क्र. १ वर उभे असताना फास्ट लाईनवरून कल्याणकडे एका पाठोपाठ तीन मालगाड्या गेल्या व त्या पाठोपाठ ९–१० ला महालक्ष्मी एक्स्प्रेस देखील गेली. आमची लोकल क्र. १ वर ९–११ वाजता आली. आम्ही गाडीत चढलो. श्री साईबाबांच्या नावाचा जप चालूच होता.

आमची स्लो लोकल गाडी कल्याणला क्रमांक १ वर येताना प्लॅटफॉर्म क्र. ३ वर पाहिले तो महा. एक्स्प्रेस उभी होती. पुलावरून जायचे तर, पुलावर तुफान गर्दी. आम्ही विचार केला. क्र. २ वरून उडी मारून गाडी पकडावी तर क्र. २ वर अंबरनाथकडून मुंबईकडे जाणारी लोकल येत होती. ती लोकल येऊन थांबताच आम्ही

क्र. २ करून उडी मारून क्र. ३ वर येत होतो. तोच महालक्ष्मी एक्स्प्रेसला सिग्नल मिळाला. ड्रायव्हरने शिटी मारून गाडी सुरू केली देखील. तेवढ्यात आम्हास (मी माझे पति व ७ वर्षांचा मुलगा व पतीच्या हातात १ वर्षाची मुलगी व माझी मावशी) धावत येताना पाहून गाडी सुरू करता करताच थांबविली. आम्ही मिळेल त्या वेगवेगळ्या डब्यात चढलो.

येथपर्यंत ठिक झाले. आता आमच्या रिझर्वेशनची काळजी. पुढील स्टेशन कर्जत येईपर्यंत कंडक्टर आमचे रिझर्वेशन प्रतीक्षा यादीवर कोणास देईल तर आमची पंचाईत होईल. श्री साईबाबांच्या नावाचा जप–चालूच. कर्जतला गाडी पोहोचल्याबरोबर आम्ही आमच्या रिझर्वेशनच्या डब्यात पोहोचलो तर कंडक्टर आमचे रिझर्वेशन इतरांस देण्याच्या तयारीत. पण आम्हास पाहून त्यानी आमच्या बर्थस् आम्हास दिल्या व कोल्हापूरपर्यंतचा आमचा प्रवास सुखाचा झाला.

हा असा श्री साईबाबांच्या कृपेचा अनुभव खरोखरच आश्चर्यकारक असाच होता.

●

साभारपोच

## श्रीसाईकृपा

[संपादक : श्री. **विजय हजारे,** कृपाश्रू प्रकाशन, सी । ६ गुंफादर्शन, फर्स्ट कार्टर रोड, बोरीवली (पूर्व) मुंबई ४०००६६, पाने १२०, किंमत ६ रु.]

श्रीसाईबाबाविषयक साहित्याला वाहिलेला मराठीतील पहिलाच दिवाळी अंक अशी जाहिरात संपादकांनी केली असली तरी यापूर्वीही साई साहित्यानेच संपूर्णतः नटलेले काही दिवाळी अंक आमच्या पहाण्यात आहेत. श्रीसाईकृपामधे कर्नल निंबाळकर, डॉ. परचुरे, डॉ. केळकर, र. शं जुन्नरकर, डॉ. पटवर्धन, व्ही. बी. खेर, अनिल रसाळ, द. र. दळवी इ. ज्येष्ठ साईभक्तांचे बाबाविषयक वाचनीय लेख असून डॉ. खानविलकर, डॉ. नाईक, डॉ. राहाटे, दत्ताराम बारस्कर, श्री. शहाणे,

सरोजिनी मुळ्ये, मीना खाडीलकर, प्रभाकर कोळमकर, राधाकृष्ण गुप्ता, रमाकांत पंडित, श्री. व सौ. पोतनीस, सौ. लीला मराठे इ. साईलीलामधूनच हजेरी लावणाऱ्या प्रसिद्ध रचनाकारांच्या गेय कविता आहेत. श्री. हजारे यांनी मोठ्या हिमतीने हा चांगल्या सजावटीत व साहित्यात असा हा अंक साईभक्तांना सादर केला याबद्दल त्यांचे कौतुक करावेसे वाटते. दरवर्षीच नव्हे तर दरमहा अशाच प्रकारचा साईसाहित्याने नटलेला अंक काढण्याची प्रेरणा श्री. हजारे यांना मिळो हीच बाबांचे चरणी प्रार्थना.

## शिल्प

[संचालक – सौ. अनुराधा गाडगीळ, गणेश कुटीर, प्रार्थना समाज रोड, विलेपारले (पूर्व) मुंबई ४०००५७, पाने १६०, किं. १२ रु.]

युवाशक्ति व उद्योजक यांच्यात जवळीक साधणाऱ्या पुरोगामी ललित मासिकाचा हा पहिलाच अंक दिवाळी अंक म्हणून प्रसिद्ध करण्यात आला आहे. या अंकात भाऊ पाध्ये यांचा कुटुंब, श्री. स. ह. देशपांडे यांचा अर्थव्यवहार व संस्कृती, श्री. म. न. देशपांडे यांचा विजापूरच्या गोलघुमटाचे संरक्षण, श्री. प्रभाकर पाध्ये यांचा गॅलरी बोलते आहे, श्री. वर्तक यांचा पंचतारांकीत आतिथ्य, श्री. य. अ. रायकर यांचा मीष्मकनगर इ. लेख वाचनीय असून श्री. अरविंद गोखले, मधु मंगेश कर्णिक यांच्या कथा, नोमॅन्झलॅण्ड ही श्री. आ. ना. पेडणेकर यांनी लिहिलेली नरभक्षक आदिमानव व सुसंस्कृत पण नरभक्षक आदिमानव यांच्या काल्पनिक भेटीतून झालेल्या प्रसंगावर आधारित एकांकिका छान आहे. अनीता चांदवडकर, अरुंधती, कुसुमाग्रज, योगिनी जोगळेकर, नारायण सुर्वे, शांता शेळके, मंगेश पाडगावकर इ. च्या बहारदार कविता पण अंकात असून, व्याधींवर मॅग्नेटने उपचार हा लेख विशेष वाचनीय वाटतो. मुखपृष्ठ नाविन्यपूर्ण आहे.

—साईनंद

★

# ये मृत्यू केव्हाही ये

—सौ. ललिता अर्जुन सावंत
महाराष्ट्र हौसिंग बोर्ड
मुंबई नं. २२

* तुमचा देवावर विश्वास आहे, का असा प्रश्न कुणी तुम्हाला विचारला तर तुम्ही काय उत्तर द्याल. क्षणभर तुम्ही विचारात पडाल. मी मात्र सांगते होय. कारण ज्या ज्या वेळी मी संकटात सापडते. काही अडचणीत पडते, त्यावेळी मी प्रथम देवालाच साकडं घालते. ज्यावेळी मी साईबाबांचा फोटोही पाहिला नव्हता त्यावेळी श्रीगणपती व श्रीराम याप्रमाणेच श्रीसाईबाबाही देव आहेत या समजुतीने श्रीबाबांनाही साकडे घालीत असे. गेल्या वर्षी ८० साली मार्च, एप्रिल या महिन्यात मी पोटदुखीने अतिशय त्रासले होते. अनेक चांगल्या डॉक्टरांची औषधे तपासणी करून झाली. पण पोटदुखीवर थोडाही आराम पडेना. अनेकदा वाटे या पोटदुखीवर एकादे जालीम औषध घेऊन शेवट करावा. पण दुसरा विचार येई. आपल्या नशिबाचा हा भोग आहे. तो मला भोगलाच पाहिजे. मे महिन्यात पोटदुखीने मला पाणीही पिववत नव्हते. रात्रंदिवस पोटदुखीच्या वेदनेने त्रासून गेले. शेवटी माझ्या मोठ्या बहिणीने मला पत्र पाठवून बडोद्याला काही दिवस येऊन इकडे दुसरे उपचार करून बघूया असे सुचविले. कारण तिलाही माझ्या पोटदुखीची कल्पना होती. या पोटदुखीच्या त्रासात मी केव्हातरी मरणारच. मग बहिणीकडे जाऊन मेले तर अधिक चांगले कारण इथे माझी तिन्ही मुले लहान आहेत. मृत्यू म्हणजे काय याची त्यांना कल्पना नाही. दुसरे म्हणजे आईच्या मागे ह्या तिन्ही मुलांचे कसे होईल ही मला एक काळजी होतीच. म्हणून मी मोठ्या अरुणला घेऊन बडोद्याला बहिणीकडे ११ जून ८० ला दुपारी १२ वाजताच्या गाडीने निघालो ते रात्री आठच्या सुमारास बहिणीकडे पोचलो. तिथे मी पंधरा दिवस होते. त्या पंधरा दिवसात मी श्री बाबांना सारखी प्रार्थना करीत होते. माझे जे काही व्हायचे असेल तर इथे बहिणीच्या घरीच होऊ दे. कारण मरणापेक्षाही पोटदुखीच्या यातना मी सहन करीत होते. निदान हात पाय उठेपर्यंत मरण यावे, परंतु तेवढे भाग्य नशिबी नव्हते. त्या पंधरा दिवसात पोटदुखी थोडीफार कमी जास्त प्रमाणात होतीच. परंतु तिकडच्या वातावरणात मानसिक स्थिती थोडीशी सुधारली. औषधे चालूच होती. रात्री प्यायची इच्छा झाली, तर बाबांची उदी टाकून पित असे. पंधरा दिवसांनी

मी परत घरी आले. परत औषधे चालू ठेवली. सारा जीवनमरणाचा भार बाबांवर टाकला. रोजचे जीवन रहाट चालू झाले, आज मी हा सर्व सारांश लिहिताना ते १५ दिवस आठवतात आणि बाबांवरील श्रद्धा अधिक मनामध्ये उत्पन्न होते. आता एकच इच्छा आहे. मृत्यूपूर्वी एकदा शिर्डीला बाबांच्या दर्शनाला जाऊन यायचे. श्री साईनाथांची तेवढी कृपा माझ्यावर असेल तर मी मनात म्हणते–

'ये मृत्यू केव्हाही ये मी मोकळी आहे.'

## कोजागिरी पौर्णिमेचा ५१ वा वार्षिकोत्सव

डॉ. के. ब. गव्हाणकर शिरडी कोजागरी उत्सव मंडळातर्फे सोमवार दि. १२ ऑक्टोबर १९८१ रोजी एकावन्नावा वार्षिक उत्सव मोठ्या उत्साहाने शिरडी येथे साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाच्या पहिल्या सत्रात रात्री ८ ते १० पर्यंत सौ. अलका रिसबावकर व श्री. शशिकांत पुसाळकर ह्यांचे गायन, श्री. रमेश घनवडे ह्यांचे भजन व सौ. पद्मजा सहस्त्रबुद्धे ह्यांचे नाथ-चरित्रावर किर्तन ह्यांचा समावेश होता.

मध्यरात्री चंद्रपुजा आटोपल्यानंतर माननीय रिसीव्हर श्री. काकरेसाहेब ह्यांच्या हस्ते कोजागरी मंडळाच्या 'गौरविके' चे प्रकाशन झाले. मंडळाचे चिटणीस श्री. चंद्रकांत सामंत ह्यांनी उपस्थितांचे स्वागत केले व डॉ. अण्णासाहेब गव्हाणकरांनी आभार प्रदर्शन केले. ह्या गौरविकेचे संपादन श्री. सदानंद चेंदवणकर व चंद्रकात सामंत यांनी केले आहे.

कार्यक्रमाच्या दुसऱ्या सत्राला रात्री १२-३० वा. सुरवात झाली व मुंबईहून खास आलेल्या श्री. मधू कड्डू व त्यांच्या साथीदारांनी सकाळी ६ वा. पर्यंत श्रोतृवृंदाला जागच्याजागी खिळवून ठेवले. पोवाडे, लावण्या, गायन, वादन, सवाल जवाब इ. विविधरंगी करमणूकीचे कार्यक्रम वाढत्या श्रेणीने रंगत गेले. नेहमीप्रमाणे श्री. अप्पा सामंत ह्यांची ढोलकीची साथ सर्वच कार्यक्रमाला होती. दुसऱ्या दिवशी मंडळाने आयोजित केलेल्या प्रसाद भोजनात श्री. काकरेसाहेब व त्यांच्या सहकाऱ्यांनी भाग घेतला होता.

–श्री. चंद्रकांत सामंत

# श्रीसाईगीत तुषार

याचा तो अनुभव सद्गुरु वाचोनि कळेचिना

खरोखर गुरु शिवाय सारे व्यर्थ म्हणूनच नामदेवांनासुद्धा विसोबा खेचरांना गुरु करून घ्यावे लागले. उपासनींची अवस्था म्हणजे पूर्णात पूर्ण मिलनाची, आणि अशा अवस्थेतून बाहेर पडण्यासाठी श्री साईंना गुरु करून घ्यावे लागले. गुरु आज्ञेवरून चार वर्षे खंडोबाच्या देवळात खडतर तपश्चर्येनंतर साकोरीला स्मशानात जाण्याच्या विचाराने निघाले, आणि त्या स्मशानात एक झोपडी बांधली, व त्या झोपडीत एक पिंजरा बनवला. त्यात चौदा महिने स्वतःला कोंडून घेतले. कन्याश्रम काढला. यज्ञयाग सुरू केले. गोदावरी मातेला शिष्य केले. व स्वतः तयार केलेला हा व्याप योग्य तऱ्हेने मार्गी लावून श्री उपासनी समाधीस्थ झाले.

## मच्छींद्राच्या सतकार्याला—(२१)

मच्छींद्राच्या सत्कार्याला गोरक्ष लाभला
श्री साईंच्या चरणा पाशी उपासनी हा आला ॥ धृ० ॥

तीन लग्ने पुत्र न झाला
गुरु चरणांचा ध्यास लागला
शिरडी जाऊन गुरु भेटला
साई चरणी लीन झाला
गुरु शिष्याच्या भेटीने हा पर्व सुरू झाला ॥ १ ॥

चार वर्षे बसे तपाला
पावन होईल जीवन उद्याला
नंदनवन ते साकोरीला
जाऊन बनवि क्षेत्र तयाला
सन्मार्ग हा दावि सारा, क्षेत्र साकोरीला ॥ २ ॥

स्मशान होते साकोरीला
त्यात झोपडे बांधी स्वतःला
पिंजरा करूनी स्वःदेहाला
चौदा महिने त्यात राहिला
गोदावरीला शिष्य करोनी, मार्ग नवा घडविला ॥ ३ ॥

कन्या सान्या करुनी गोळा
व्याप वाढवी करुनी पसारा
एक मुखाचा दत्त केला
कन्या कुमारी केली भक्तीला
झोपडीमध्ये यज्ञ सोहळा, रोज सुरू झाला || ४ ||

साई कृपेने आज जहाला
कन्या आश्रम जगा वेगळा
उपासनीचे क्षेत्र जहाले
भक्त तेथे येऊ लागले
उपासनींनी दिव्य घडविले, आज साकोरीला || ५ ||

श्रीसाई पायात चाळ बांधून भक्ता सोबत मनसोक्स नाचत. बागडत, गाणी गात असत. ते जसे मोठ्या भक्तांच्या बरोबर वागत तसेच ते मुलांबरोर वागत. मुले म्हणजे साक्षात् परम पवित्र ईश्वराचे दूत. आणि मुलांसोबत गोकुळ अष्टमीला गोविंदा खेळत आपले देवपण पूर्ण विसरून जात. असे हे साई जसे मुलांचे. तसेच ते फुलांचे होते. अतिशय परीश्रमाने त्यांनी एक सुंदर बाग स्वतःच्या हाताने लावली. आज ती लेंडीबाग म्हणून प्रसिद्ध आहे. बुटी नावाच्या भक्ताला राधाकृष्णाच्या मंदिरास परवानगी दिली. त्या सोबत मी येईन रहावयास हे वचन पण दिले आणि ते आपल्या समाधी नंतर पूर्ण केले.

### लेंडीबाग ही साई बांधली—(२२)

लेंडीबाग ही साई निर्मिली, वृंदावन साकार
फुलामुलांचे साई अमुचे हेच प्रभु ओंकार || धृ० ||

साई प्रभू शिरडी वसले
भाव भक्तीचे नाते जुळले
प्रेम भराने साई नाचले
जन्मोजन्मीचे ऋण संपले
साईरुपे विठ्ठल बोले, पंढरी साकार || १ ||

माय लक्ष्मी भोजन दिधले
साई भक्तीचे पूर्ण भुकेले

भक्ता मध्ये साई रंगले
देवपणाचे बिरुद त्याले
द्वारकामाई मशिद जहाली करी अग्नी स्वीकार ॥ २ ॥

दहिकाल्याला गोप जमविले
कृष्ण सारथी साई जहाले
बाला संगे साई खेळले
कृष्ण जन्मी तल्लीन झाले
दही दुधाचे माठ फोडले, गोकुळचा झंकार ॥ ३ ॥

बुटी नामक भक्त जहाले
मंदिर बांधेन म्हणू लागले
राधा कृष्ण मुरलीवाले
मंदिर सुंदर शिरडी जाहले
साई माऊली येवून वसली, करी भाष्य अधिकारी ॥ ४ ॥

–श्री. सुहास देसाई
सी. बी. एस. कॉलनी, बिल्डिंग नं. १९०
ब्लॉक नं. १९४०, अँटॉप हिल, मुं. ३७

# शिरडी–वृत्त माहे सप्टेंबर सन १९८१

या महिन्यात श्रींच्या दर्शनासाठी भक्तांची गर्दी नेहमीप्रमाणे होती. रविवार, गुरुवार व सुट्टीचे दिवशी बरीच गर्दी होती. काही कलाकारानी श्रींच्या पुढे हजेरी दिली ती खालील प्रमाणे—

**कीर्तन** : १) संस्थान गवई काव्यतीर्थ श्री. ग. वि. जोशी शास्त्री यांची कीर्तने नेहमीप्रमाणे एकादशीचे व महत्वाचे दिवशी झाली.
२) ह. भ. प. छगनबुवा बारटक्के मु. गोरटे जि. नांदेड.
३) ह. भ. प. श्रीकृष्णबुवा वामनराव थट (सिन्नर महाराज) नासिक
४) ह. भ. प. लोटांगण महाराज. इस्लामपूर जि. सांगली.

**प्रवच** : १) ह. भ. प. लक्ष्मणबुवा वाकचौरे शिर्डी.
ह. भ. प. कुल्कर्णी महाराज, पंढरपूर.

**भजन, गायन, वादन वगैरे** : १) सर्वश्री. जयवंत कुलकर्णी आणि पार्टी, मुंबई. २) अंजली जोशी ३) चंद्रकांत जाधव ४) मनोहर कदम ५) प्रताप रात ६) उज्ज्वल वढावकर ७) काटकर ८) प्रदीप दळवी ९) जे. सेमार १०) कुमारी श्रीकला ११) बाळ साठे १२) वाघमारे १३) जी. मल्लेश १४) श्रीकला पा. हतंगडी १५) जय–विजय ॲण्ड ऑर्केस्ट्रा मुंबई, विजय ल. धोपावकर. १६) श्री. विजयकुमार वि. आठवले १७) विजयकुमार पोतले १८) सतीश चंदनशीव १९) भास्कर गोडांबे २०) सोमनाथ जी. गुरव २१) मधू भवर २२) सौ. वैशाली विजय आठवले २३) रतन-कुमार २४) किशोरकुमार सारसर २५) विनोद कुमार २६) जु. हेलन २७) गोपाळ गिरधर गुरव २८) निवृत्ती संभाजी पगारे २९) शिरीष वसंत कीर्तने ३०) संजय घनःश्याम कासले ३१) सुधीर शिवाजी चव्हण ३२) रामचंद्र व्यंकटेश कुलकर्णी ३३) सतीश वसंत कीर्तने ३४) सुनील अरविंद राव ३५) कल्पना म्युझीकल नाईट पुणे, त्रिंबक डी. नाईक ३६) आशा किंजरे ३७) किसन खैरे ३८) श्रीमती रेणूका मोरे ३९) श्रीमती कमल पाटील ४०) श्रीमती सुमन किंजरे ४१) अल्का खैरे ४२) श्री किसनराव जाधव ४३) एम. एस. माने ४४) रामचंद्र लोलरा ४५) श्रीरंग तेलवड ४६) शंकर पाटील ४७) श्रीमती शशीकला मोहोळकर ४८) रंगनाथ कसबे ४९) जी.

शांताराम ५०) जयभवानी कोल्हापूर, उषा दांडेकर ५१) नागेश पुणेकर ५२) सीनेस्टार राजशेखर ५३) सीने तारका माधूरी कर्नाटकी ५४) संगीत दिग्दर्शक महादेव पवार ५५) शंकरराव धुमाळ ५६) कासम मुल्ला ५७) भालचंद्र कदम ५८) सुनंदा वाळवेकर ५९) पुष्पलता ६०) रमेश महागांवकर ६१)पी. आनंद ६२) दिग्दर्शक बाबुराव माने ६३) मंदाकीनी नागणे ६४) म्युझीअम ऑफ म्युझीक पुणे, मोहनकुमार भंडारी ६५) विकास पुरंदरे ६६) श्रीपाद सोलापूरकर ६७) सुरेश मोकाशी ६८) जगदीश वैष्णव ६९) अमनकुमार तांबे ७०) शाहीर प्रेम भोसले कोल्हापूर. ७१) शाहीर आनंद सावंत आणि मंडळी मुंबई. ७२) शशीकांत पोकळे ७३) चंद्रकांत पांचाळ ७४) विठ्ठल महाडेश्वर ७५) नामदेव दळवी ७६) सुभाष सावंत ७७) वामन कदम ७८) गोविंद हर्चेकर ७९) मनोहर पवार ८०) कांबळी ८१) मनोहर दळवी ८२) पवार ८३) दत्ता केरकर मुंबई. ८४) सौ. आनंदी दत्ता केरकर ८५) नारायण चिमण खडे ८६) सुनिल हंसराज बोर्डे ८७) रघुनाथ नारसिंह मराठे, बार्शीकर ८८) शिवाजी तुकाराम धुमाळ, शिरडी. ८९) शिवराम खंडागळे, कोपरगाव. ९०) आप्पा रघुनाथ भोसले पंढरपूर ९१) ह. भ. प. श्री. काकासाहेब दिक्षीत, आकोला. ९२) रामचंद्र जाधव, सोलापूर. ९३) साई भजनी मंडळ, काकीनाडा आंध्रप्रदेश ९४) ह. भ. प. दत्तात्रय बाळासाहेब नडवे ९५) प. पु. स्वामी साईबाबा मंदिर कर्नूल. ९६) मधूकर रामचंद्र लोखंडे, अहमदनगर.

**हवापाणी–** शिरडी येथील हवापाणी उत्तम असून रोगराई काही नाही. पाऊस चांगला पडला. त्यामुळे पाणी पुरवठ्याबाबत काळजी काही प्रमाणात दूर झाली. ☆

